INTRODUCTION.

THE BRAHMA-SÛTRAS OR VEDANTIC SYSTEM OF BÂDARAYANA

We have arranged to enlarge the size of our "studies in Indian philosophy by adding eight pages to each monthly part We have been asked by scholars of eminence to undertake the interpretation and explanation of the sûtras or aphorisms of Bâdarayana which are the basis of Indian Vedantism or Pantheism We should have certainly begun our series by preferring Vedantism or the system of Bâdarâyana to Karma Mîmânsâ or the system of Jaimini But such a procedure would have subverted chronological order, which is the essence of historical sequence No event or series of events or no philosophical *situation* is isolated It has its antecedents from which it results The system of Bâdarayana as well as that of Jaimini is the inevitable consequence of an important historical revolution The doctrines—which mould the conduct of a modern Hindu, which tinge his political aspirations, which constitute the essence of the religious system he has developed in modern times and which determine the nature of the social institutions and the principles of the united family system obtaining at present in India—are the result of two polities which can be characterized from an historical stand point as Vaidika and Buddhistic or more correctly as Aryan and re actionary

We must enter on a short historical sketch to show the bearing of the two polities on one another

that the doctrines known by the comprehensive name of Vedantism may be properly interpreted and explained—the proper interpretation of a system of philosophy is that which carefully investigates the *situation*, with its surroundings, with its under currents, with its logic which seeks to justify it to its opponents—logic to be distinguished from its causes which, though carefully concealed by the actors on the historical stage from the masses of the people necessitate the growth of a philosophical system by their feelings being moved, and by their intellect being roused

We will take the Âryan or Vaidika polity first The Âryas entered India at least about four thousand years before the Christian era They were only a tribe in Ariâna—a tribe left behind in the progress of the united Âryas in civilization They occupied the north eastern corner of Ariâna The country—from the valley between the Oxus and the Jaxartes in the north to the valleys of the seven rivers of the Panjab and Cabul in the south and from the plateaus of the Hindu Kush and Paropamisan ranges in the east to the valleys of the Euphrates and the Tigris in the west—was occupied to the Âryan tribes About the time, the Âryans moved *en masse* towards India, the Âryas in Ariâna were passing through an important social, religious and political revolution It is only now a days that a distinction can be made between social, religious and political movements But through the oceanic currents of history, such a distinction cannot be marked Whenever a nation is moved, and begins to put forth new energies its activities are many sided—activities, whether social, religious or political, being mixed up and inseparable from one another This was, however, especially true in the case of all ancient nations Th[illegible]

Âryan tribes in the country, the boundaries of which we have indicated, had to pass from the pastoral into the agricultural condition of life for every-where settled life began to be appreciated: agricultural operations were commended: directions for the preservation of the agricultural enclosure were specially given: the confederacy, and the kingdom were religiously respected: the idea of a council with a president characterized the highest religious conceptions: Ahura-mazda (Asura medhis*t*a) was the name of God himself—Asura being the deity of life and the means of its sustenance—the holder of *asu* (life) while two spirits Shpento-mainyus and A*n*ra-mainyus were opposed to each other. The first was the good spirit, and the last, the evil spirit—the former meaning white thought (Shveta-manyus) and the latter, non-Âryan thought (Anârya-manyus). The council of gods under the presidency of Shpento-mainyus was a reflection of a regular political council in the country—a council which represented the power of the confederacy of tribes. By way of contradistinction, A*n*ra-mainyus also had a council of his own. Vohumano (Vasu-manas) who ruled over the passions, appetites, affections, desires, and thoughts of man also had a council. His opponent Akem-mano (Ak*s*ema-manas) led whatever is evil in every individual man. This picture of society is drawn in the Zend-avesta, the historical value of which as throwing a great deal of side-light on the Vedas of the Indian Âryas is very great. The contrast of the Mazdayasnian or the Iranian Âryas with the Indian Âryas illustrates the social and political condition of the latter. There is no mention made in the Vedas of any council. The confederacy is not alluded to as pastoral life predominated. The wild warriors marched

into India, fell on the aborigines and settled as they pleased It is significantly seen that these wild warriors still betrayed predilections for nomadic life as they seized a wild bison, roasted him alive and despatched his flesh. Yet agriculture was pursued by the followers of these warriors, whose ambition was gratified by hunting expeditions These warriors were also bards whose genius was fired by the scenery of the Indian forests, and of the valleys of Indian rivers, and by the stupendous ranges of Indian mountains, and who invoked their gods in new strains instinct with warm poetical feelings All the hymns of Indra portray the feelings of the war like Indian Âryas the Mazdayasnians detested Indra, and set him down as a demon,—as a member of the council of Anra mainyus The bards of the Indian Âryas praised their gods as they invoked them at the time of their sacrifices, the essential feature of which was the representation of the pastoral mode of life—milking their cows, tying their calves, bringing a bundle of fuel, ropes made of rush, and a kind of grass for seats from the forest, marking and arranging rude utensils of cooking, preparing the materials of a cake to be baked on potsherds, offering it into fire and eating it, clarified butter being plentifully used The gods came as they were invited The bard also was a priest, at first there being only one—the Brahmâ—the increaser—the bard of the threshing floor Yet the ideas of personal sin (Pâpmâ) as opposed to good knowledge (Sanjnâna) the Indian Âryas realized though not so vividly as the Iranian Âryas did The Indian Âryas, that is, their leaders developed a sort of feudal system which is the distinguishing feature of the Vaidika social, religious and political polity which originated in the settle-

ment of the Âryas in India and in the formation of small kingdoms, each acting for itself, each developing its power, and each ambitiously increasing and economising its resources,—the Vaishyas or the peasantry quietly looking on, and taking a part in a revolution as followers whose opinions and feelings could not be ignored, but who were under the guidance of those who could undertake the onerous and responsible functions of leaders worthy of respect and obedience The warrior chiefs had their courts, their seraglios, their halls of justice, their police, their schools, and *Rita*—their immutable unwritten code of morals—so often mentioned in the *Rig* Veda. The society, consisting of hundreds of chiefs devoted to chivalrous pursuits and cherishing chivalrous aspirations, moved on, cultivating peaceful arts, performing religious ceremonies, developing their style of life, bringing new tracts under cultivation, exploring the courses of rivers, and delighting in poetry as recited at their annual assemblages

The warriors are well qualified for leading a community, marching in search of new homes, exposed to frequent dangers, ever involved in war fare, and ever desirous of a permanent settlement

As soon as a permanent settlement is formed, the energies of the leaders slacken their hold on the minds of their followers is weakened, their pride giving offence and their pretensions to superiority awakening jealousy Of such circumstances and of such a popular feeling, the priest is not slow to take advantage The chaplain of the feudal mansion gradually usurps power his dictates as religiously binding on society are enthusiastically obeyed The political leadership belongs *de jure* to the king or the duke, but it is exercised by the chaplain who has spiritual power over the wives

and children of the lord of the castle, as the basis of the power of the chaplain of the feudal mansion is theology

Thus when theology was encouraged, and when the priest came to be respected the Aryas in India had passed through an important revolution The *Risi* period had passed away the Brahmavadi period came The period of conquest of expansion of adventures, and of new hymns had passed way the period of a permanent settlement, of the peaceful enjoyment of luxuries and of the interpretation of the old hymns came The period of military glory and military prowess had passed away the period of vain glorious demonstration of the past military glory, of the narration of battles and of success already achieved came This period is depicted with remarkable fidelity in the Vaidika works known as Brâhmana literature the essential feature of which is the celebration of a sacrifice which flattered the vanity of a rich householder, which presented to his mind a picture of military glory, and of social importance, and which led him to believe that he had propitiated his gods, but which really increased the power of the priest and established his prestige This state of things however, could not last long A reaction came in time—a reaction that threatened the over throw of the Vaidika polity Two classes of society—the conformists or Vaidikâchâryas and dissenters or Bouddhâchâryas—began a conflict fraught with remarkable consequences to mankind We will briefly sketch their bearings on one another

These two sections grew out of the Âryas and the aborigines of India being thrown together for centuries Intermarriages though condemned by Âryan legislators took place between the two sections Class

es resembling the American mulattos, quadroons, and octoroons, came into existence These classes naturally sought to be admitted to the privileges of the genuine Âryas who, in their turn, resented and attempted to suppress their pretensions The story of Kavasa Ailûsa is an illustration in point The two sections of the Âryan society pulled on together, though their interests often jarred Learned and influencial genuine Âryas often espoused the cause of the Âryanized aborigines until at last the forces that created the opposition between the two classes were organized. Suppressed and ignored, the Âryanized aborigines, known as the crowd or multitude(Sangha), dissented from the genuine Âryas, known as the upper classes (Udgha) Similar causes have produced similar phenomena in modern India We have the genuine Pathân whose superior physique and hauteur distinguish him from the spurious Pathan of mixed blood who aspires to be considered a genuine Pathan, and disdains the familiar approaches of the mass of the Indian Mohammedans

We have called the Âryanized aborigines dissenters and non conformists because their tenets differed essentially from those of the genuine Aryas The one believed in the stability and permanence of the world the other looked upon the world as a mere illusion The one believed in the existence of Heaven, its happiness, and its attainment the other believed that its three fold misery– spiritual physical, and that caused by gods recurred perpetually, their souls transmigrating from body to body to endure new pains The one believed in the efficacy of sacrifices and considered it their exclusive privilege to perform them as the direct means of all worldly pleasures nay of Heaven

itself the other believed the sacrifices to be the means of evil. The one sought children, cattle and wealth the other preferred austerities, and willingly enduring them, delighted in the name of Shramana or labourer The one gloried in the acquisition of knowledge as the means of worldly happiness and insisted upon the Vedas being the revelation from God the other preferred contemplation and retirement into a convent The one valued active life (Karma) and inculcated it systematically upon the students in its schools the other traced all its miseries to the power of its activites (Karma and Upâdâna) The one worshipped elemental gods, such as Indra, Vâyu, and Agni the other worshipped the relics of their leaders and thus paved the way for modern idolatry The one boasted of its prestige and privileges and considered caste to be the essential element of their social polity the other, taking a higher position, preferred truth and righteousness to caste The women of the one delighted in worldly glory and participated with their husbands in the performance of sacrifices the women of the other became nuns and abandoned the pleasures of the world To the one their gods, nature, and spirit, appeared to be the source of cheerfulness and pleasure to the other, gods nature, and spirit, appeared malevolent powers The one could understand and realize only class-interests the other openly preached universal benevolence The one kill every day lower animals for food as well as for nces fices the other gloried in Ahinsâ or total abst gs on from the use of flesh The one considered it its lege to lord it over the whole world the other belie nd that man and lower animals were equally entitled en the use of what the earth produced The one boasted in its intellectuality the other delighted in faith The o s

aspired after the pleasures of this world or the world to come: the other aspired after Nirvâna or the utter annihilation of the individual existence of man. Thus the tenets of the conformists or the genuine Âryan society contrasted in every respect with those of the non-conformists or Âryanized aborigines The former constituted the Vaidika polity: the latter, the Buddhistic polity. Both these polities exercise a great influence on the modern Hindu society.

The Vaidika polity is explained and defended in the Pûrva-Mîmânsâ or the system of Jaimini Bâdarâyana in the Uttara-Mîmânsâ or Brahma sûtra systematizes the Buddhistic polity and explains its bearings. The system of Jaimini still exercises its influence by means of the precepts of the Purânas, which inculcate a variety of religious rites or Vratas still devoutly performed by every Hindu. The system of Bâdarâyana supplies the intellectual want of the whole of India It is interpreted in different ways Shankarâchârya's interpretation, however, approaches the Buddhistic stand-point more than the interpretations of Madhvâchârya or Râmânuja. The system of Shankarâchârya, however, is eclectic so far as it permits the slaughter of animals for sacrificial purposes, and thus commends the Vaidika polity. The interpretation of Madhvâchârya accepts the Vaidika polity, but rejects it so far as the slaughter of animals for sacrificial purposes is concerned, and thus commends the Buddhistic doctrine of Ahinsâ Râmânuja occupies a position between the Vaidika and the Buddhistic polities. The interpretation of Vallabha is a necessary growth. We have procured copies of Shankarâchârya's, Madhvâchârya's Râmânuja's, and Vallabha's interpretations, and will place them side by side and offer our

interpretation when necessary to the reader Every philosophical system is conversant with the discussion of a variety of problems arising from the five fold conception of man—his* conception of the phenomenal existences in relation to himself, his conception of their genesis in relation to the first cause, his conception of the relation between the one and the other, his conception of powers within himself and powers without him, and of their reciprocal relation, and his conception of supreme happiness or of emancipation or of salvation. The point of view of the Karma Mîmânsâ is entirely different from that of Brahma Mîmânsâ. What causes produced the difference of the points of view, we have attempted to show The variety of problems arising from the five fold conception of man are discussed in the body of the philosophical systems, and we indicate the particular sûtras in the short summaries we offer to our readers Before we conclude, we must add that the examination of the Pûrva Mîmânsâ and the Uttara-Mîmânsâ will elucidate the Vaidika and the Buddhistic polities, the historical importance of which can not be exaggerated.

प्रस्तावना.

ब्रह्मसूत्र म्हणजे बादरायणकृत वेदांतदर्शन.

प्रत्येक अंकांत आठ पृष्ठें अधिक घालून आमची षड्दर्शन-चिंतनिका वाढवावी असा आमचा बेत आहे. वेदांतशास्त्राचें मुख्य बीज म्हणजे बादरायणकृत ब्रह्मसूत्रें यांच्या अर्थाची फोड करून विवेचन करावें असें कांहीं प्रख्यात पंडितांनीं आम्हांस सुचविलें. आणि आम्हींहि ज्ञानमीमांसेचें विवेचन प्रथम सुरू केलें असतें. पण असें केलें असतां कालक्रम बिघडतो असें आम्हांस वाटतें. कारण इतिहासाचें रहस्य कालक्रम आहे. हें स्पष्ट आहे कीं, ऐतिहासिक मोठमोठया गोष्टी किंवा स्थितिसंधान तुटक तुटक कधींहि नसतें. त्यांचा परस्पराशीं नित्य संबंध आहे. अर्वाचीन गोष्टी आणि प्राचीन गोष्टी यांचा परस्पर कार्यकारणसंबंध आहे. बादरायणकृत दर्शन आणि जैमिनिकृत दर्शन हीं दोन्हींहि ऐतिहासिक मोठ्या मन्वंतराचे परिणाम आहेत. ज्या मतांपासून आम्हां अर्वाचीन हिंदूंचें अमुकच आचरण असावें असें निष्पन्न होतें, ज्या मतांवरून आमचे मोठमोठे कारस्थानी उद्देश अमुकच असा रंग दिसतो, ज्या मतांपासून आम्हां अर्वाचीन हिंदूंच्या धर्मसिद्धांतांचीं तत्वें निघतात आणि अलीकडील हिंदुस्थानांतील संसृष्टि किंवा सामाजिक आचार यांचें अमुकच स्वरूप असावें असें सिद्ध होतें, अशीं जीं मतें तीं आलीं तरी कोठून ! हीं सर्व मतें दोन सिद्धांतांपासून उत्पन्न झालीं आहेत. इतिहासदृष्टया या दोन सिद्धांतांचीं नांवें वैदिकपरंपरा आणि बौद्धपरंपरा किंवा आर्यपरंपरा आणि अनार्यपरंपरा अशीं ठेवावीं असें आम्हांस वाटतें.

बहुसंग्राहक वेदांतदर्शनाचा अर्थ नीट रीतीनें ध्यानांत व विवेचन व्हावें म्हणून वैदिक आणि बौद्ध परंपरांचा परस्पर संबंध काय हें दाखविलें पाहिजे. आणि हें दाखविण्याकरतां इतिहासाचा थोडा विचार केला

पाहिजे. कोणत्याहि शास्त्रीय सिद्धांताचा नीट अर्थ करणें म्हणजे काय ! मोठ्या काळजीनें शास्त्रीय स्थितिसंधानाचा शोध केला पाहिजे, त्याच्या आजूबाजूस काय आहे तें पाहिलें पाहिजे, आणि त्याच्या पोटामध्यें कोणकोणच्या प्रकारचे पीळ आहेत हेंहि पाहिलें पाहिजे. पंडितांनीं आपल्या शास्त्रीय सिद्धांताचें मंडन करण्याकरता प्रतिपक्षापुढें कोणकोणते विषय मांडले हेंही दाखविलें पाहिजे पंडितांनीं प्रतिपक्षाचें खंडन करतांना जे जे उपाय योजले ते ते उपाय त्या शास्त्रीय स्थितिसंधानाचें कारण नव्हे. शास्त्रीय स्थितिसंधान उत्पन्न होण्याचीं कारणें भिन्न आहेत तीं कारणें वादविवाद करणारे लोक जनसमाजाच्या दृष्टीस पडू देत नाहींत. तथापि जनसमाजाच्या बुद्धीमध्यें स्फुरण होऊन त्याच्या मनोवृत्तीला चेतना होऊन त्यापासूनच शास्त्रीय स्थितिसंधान उत्पन्न होतें ही गोष्ट समजण्याजोगी आहे. या गोष्टीची फोड पुढील विचारावरून होईल.

प्रथम आर्य किंवा वैदिक व्यवस्थेविषयीं विचार करावयाचा. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी चार हजार वर्षांच्या सुमारास आर्य लोक हिंदुस्थानात शिरले सर्व आर्य लोकांच्या स्थितीकडे पाहिलें असता दुसऱ्या आर्य-लोकांइतके हिंदुस्थानात येणारे आर्य सुधारले नव्हते. मूळ आर्यदेशांत रहाणारे लोक आपल्या देशास आर्यदेश असें म्हणत. हिंदुस्थानात येणारे आर्यलोक या देशाचे ईशान्य कोपर्‍यात रहात असत. त्या देशाची चतुःसीमा येणेंप्रमाणें —उत्तर दिशेस उक्स आणि यक्सार्त या नद्यांमधील प्रदेश. दक्षिण दिशेस काबूल आणि पंजाब या देशांतल्या नद्यांमधील प्रदेश. पूर्वेकडे हिंदुकुशाचीं पाठारें. आणि पश्चिमेकडे युफ्राता आणि तीग्री या नद्या. सहकुटुंब सहपरिवार जेव्हां आर्यलोक हिंदुस्थानात शिरले, तेव्हां आर्यदेशांतील आर्यलोकांमध्यें मोठी सामाजिक, धार्मिक आणि राजकीय उलटापालट होऊन मन्वंतर फिरत होतें. सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय गोष्टी भिन्न आहेत, असें आतां मात्र म्हणतां येतें. परंतु इतिहासाचा ओघ सागराच्या ओघासारखाच आहे. सामर्थ्यें अनु-

क राजकीय, अमुक धार्मिक आणि अमुक सामाजिक असा भेद करतां येत नाहीं. जेव्हां जेव्हां एखाद्या देशांत हालचाल होऊं लागते, आणि लोकांमध्ये बुद्धीचे आणि शक्तीचे नवे नवे तरंग उठूं लागतात, तेव्हां तेव्हां त्या लोकांमध्ये नाना प्रकारची गडबड चालते. अशा प्रसंगीं त्या गडबडीची विल्हेवारी करतां येत नाहीं. निवळ सामाजिक गडबड इतकी, धार्मिक गडबड इतकी, आणि राजकीय गडबड इतकी असें म्हणतां येत नाहीं. सामाजिक व्यवस्था करूं इच्छिणाऱ्या लोकांच्या पोटांत धार्मिक किंवा राजकीय गडबडीचे उमाळे फुटत असतात. म्हणून अशा प्रकारचे सारे उद्योग एकमेकांत गुंतले असल्यामुळें त्यांचा भेद करतां येत नाहीं. प्राचीन काळीं जे जे लोक होऊन गेले, त्या सर्वांस हा सिद्धांत विशेष लागू पडतो. ज्या देशाच्या चतुःसीमेचें आम्हीं पूर्वीं वर्णन केलें आहे, त्या देशांतील लोक पूर्वीं केवळ गोपाळ होते. त्यां-च्यापाशीं गुरेंढोरें पुष्कळ असत. त्यांना रानांकुरणांत चारीत फिरवून ते लोक दुधदुभत्यावर आपला निर्वाह करीत. त्यांना शेतकी म्हणजे काय हें ठाऊक नसे. ही स्थिति जाऊन ते आतां हळूं हळूं शेतकी करूं लागले. जेथें धनगरी तऱ्हा असते, तेथें शेतकी नसते. शेतकी समजूं लागली म्हणजे हळूं हळूं धनगरी तऱ्हा नाहींशी होते. या कुर-णांतून त्या कुरणांत गुरें चारीत फिरण्यापेक्षां या आर्य लोकांस एके ठिका-णीं शेतकी करीत रहाणें बरें वाटूं लागलें व शेतकीसंबंधी निरनिराळे धंदे बरे असें ते म्हणूं लागले. कुपणामधील शेतांचें योग्य रक्षण व्हावें म्हणून शास्त्रार्थ निघूं लागले. जमात आणि राज्य यांविषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न होऊन धार्मिक भाव वाटूं लागला. या वेळचे अति उत्तम धार्मिक विचार कोणते? तर परिषद् असावें आणि त्या वरती अध्यक्ष असावा असें त्यांस वाटत असे. पार्शी लोकांमध्यें अहुरमझ्द् हें ईश्वराचें नांव आहे. संस्कृतांतील अहुर मज्द् याचें असुर मेधिष्ट हें रूप,—असुर म्हणजे जीवनाची देवता—जीवनं रक्षण करण्याचें साधन, आणि असु म्हणजे

जीवन. असु धारण करते ती असुरदेवता. झंद्-अवस्था पुस्तकांत दोन प्रकारच्या जीवांचें वर्णन केलें आहे--एकाचें नांव स्पेंतोमैन्युः, आणि दुसऱ्याचें नांव अंग्रमैन्युः. या दोन जीवांचें परस्पर वैमनस्य आहे. स्पेंतोमैन्युः म्हणजे श्वेतमन्युः (शुभ्र विचार). ही सुबुद्धि उत्पन्न करणारी शक्ति आहे. अंग्रमैन्युः म्हणजे अनार्यमन्यु (अनार्य विचार). ही कुबुद्धीची देवता आहे. देशामध्यें जें राजकीय परिषद् असे, त्या परिषदाचेंच प्रतिबिंब असें एक देवतांचें परिषद् आहे असें पार्शी लोक मानीत. आणि त्या परिषदाच्या अध्यक्षस्थानीं स्पेंतोमैन्युः आहे, असें ते समजत. देशांतील राजकीय परिषद् म्हणजे काय? सर्व जातीच्या जमातीचा अधिकार चालवणारी एक सभा असे. स्पेंतोमैन्युः अध्यक्षस्थानीं असून जसें सुबुद्धीचें परिषद् तसेंच कुबुद्धिनायक अंग्रमैन्युः ज्यांत अध्यक्ष आहे असें दुसरें परिषद् आहे असें प्राचीन पार्शी लोक मानीत. ही देवलोकाची व्यवस्था झाली. आतां मनुष्य लोकीं प्रत्येक प्राण्यामध्यें दोन प्रकारची शक्ति आहे.--एकीचें नांव वोहुमनो (वसुमनः), आणि दुसरीचें नांव अकेममनो (असेममनः) अशीं नांवें ठेवलीं असत. वोहुमनो अध्यक्षस्थानीं असून मनुष्याच्या मनांत याचें परिषद् आहे. त्याचा अधिकार मनुष्याच्या विचारावर, प्रीतीवर, इच्छांवर, कलांवर, अनुरागावर चालतो. अकेममनो या शक्तीच्या अधिकाराखालीं मनुष्याची दुर्बुद्धि व दुर्गुण आहेत. पार्शी लोकांच्या धर्मपुस्तकामध्यें अशा प्रकारें लोकसमूहाचें वर्णन केलें आहे. या पार्शी लोकांच्या धर्मपुस्तकापासून हिंदुस्थानांतील आर्य लोकांच्या वेदांतील पुष्कळ गोष्टींची फोड होते,. म्हणून पार्शी लोकांच्या धर्मपुस्तकाची योग्यता इतिहासदृष्ट्या मोठी आहे. -मझदयण्णी किंवा इराणी आर्य यांची आणि भारतखंडीय आर्य यांची तुलणा केली असतां वैदिक धर्म आचरणाऱ्या आर्य लोकांची राजकीय आणि सामाजिक स्थिति कशी होती हें कळून येतें. ऋग्वेदामध्यें कोठेंहि परिषदाचें नांव नाहीं. लोकसंस्था म्हटली म्हणजे जिकडे तिकडे

गोपालांच्या तऱ्हेची होती. आणि ह्याच लोकसंस्थेचा मुख्य प्रचार असे. म्हणजे राजेरजवाड्यांच्या जमातीचा प्रचार पडला नव्हता. स्वेच्छाचारी योद्धे हिंदुस्थानांत चाल करून आले. त्यांनीं एतद्देशीय मूळ रहिवाशी लोकांवर हल्ला केला, आणि मनास गोड वाटेल त्याप्रमाणें हिंदुस्थानांत वसाहती केल्या. रानामध्यें भटकत असतां ज्या ज्या गोष्टींची त्यांना संवय लागली होती, त्या त्या गोष्टींची आवड असून त्यांना आठवण होत असे. उदाहरणार्थ, ते गौ धरीत, त्याला भाजीत, आणि त्याचें मांस भक्षण करीत. तथापि असें असतांहि जरी योद्धे शिकारीच्या कामीं गुंतले असत, आणि शिकार करण्यांतच मोठें महत्व मानीत असत, तरी त्यांचे अनुयायी लोक शेतकीचा धंदा करीत. हे योद्धे मोठे कवि असत. हिंदुस्थानांतील अरण्यें किंवा मोठमोठ्या नद्यांचीं पात्रें किंवा बुद्धि गुंग करणारी पर्वतांची ओळ हीं पाहिलीं म्हणजे यांच्या स्वरूपाच्या योगानें त्यांच्या बुद्धीस स्फुरण चढत असे. आणि ज्यामध्यें अंतःकरणास सद्गदित करणारा रस आहे अशीं नवीं नवीं काव्यें करून ते आपल्या देवतांचीं आवाहनें करीत असत. हिंदुस्थानांतील युद्धधुरंधर आर्यांच्या मनोवृत्ति कशा होत्या, हें ऋग्वेदांतील इंद्रसूक्तें पाहिल्यानें समजतें. इराणांतील मझ्दयष्णी आर्य इंद्राची निंदा करीत, आणि इंद्र पिशाच आहे असें ते समजत. कुबुद्धिनायक अग्रमैन्युः याच्या सभेंतील एक सभासद इंद्र आहे असें ते समजत. हिंदुस्थानांतील आर्य लोकांचे कवि यज्ञप्रसंगीं इंद्राची स्तुति करीत आणि त्याचें आवाहन करीत. यज्ञ म्हणजे काय? त्यांतील मुख्य तत्त्व इतकेंच आहे कीं, गोपालांच्या तऱ्हेची जी जनसंस्था असते, तिचा उल्लेख करावयाचा. म्हणजे गाईंची धार काढावयाची, त्यांच्या वासरांना एकीकडे बांधावयाचें, रानांत जाऊन समिधांची मोळी आणावयाची, कुशाचे दोर आणावयाचे, आसनाकरतां दर्भ आणावयाचे, स्वयंपाकाचीं आवडंधोबड पात्रें ठाकून ठोकून नीट मांडावयाचीं, पुरोडाशाचें सामान तयार करा

याचें, विटकराच्या तुकड्यांच्या केलेल्या कपालांवर तो भाजायाचा, मग अंशतः तो अग्नीस अर्पण करायाचा सर्व यज्ञभर जिकडे तिकडे तुपाचा उपयोग फार. ज्या रीतीनें देवाला आमंत्रण करीत त्या रीतीनें देवहि येत असत. जो कवि तोच ऋत्विज् आणि ऋत्विज् तोच कवि, अशी स्थूलरचना असे. आणि पूर्वी यज्ञामध्यें एकच ऋत्विज् असे. त्याचें नांव ब्रह्मा. ब्रह्मा म्हणजे वर्धन करणारा, म्हणजे स्तव्यावरती गाणारा कवि. संज्ञान म्हणजे काय, आणि तें पुरुषरूपी पापाच्या विरुद्ध कसें आहे हे विचार वैदिक आर्यांस पूर्ण माहीत होते खरे. तथापि इराणी आर्यां इतके ते त्याच्या पुढें ढळढळीत वागत नसत. हिंदुस्थानांतले आर्य म्हणजे त्याचे पुढारी यांच्या मध्यें मांडलिक राजमंडलरचना उत्पन्न झाली, आणि वेदाच्या वेळच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय व्यवस्थाचें तेथून मूळ निघालें. ही संस्था कशी उत्पन्न झाली असें विचारलें तर हिंदुस्थानात जेव्हा आर्यलोक आले आणि त्यांनी वसाहती केल्या तेव्हा प्रत्येक प्रत्येक योध्यानें आपापलें राज्य साधून घेतलें. आपल्याच उत्कर्षाकरता तो झटूं लागला. आपल्याच त्याणें अधिकार वाढविला. आणि जितकी आपली ताकद तितकी आपली योग्यता वाढावी म्हणून प्रत्येक वीरपुरुष युद्धास प्रवृत्त झाला. वैश्य किंवा स्थल लोक हे स्वस्थ राहिले आणि काय होतें तें पाहूं लागले. राज्यक्रांति होऊं लागली म्हणजे त्यांचें म्हणणें काय, व त्यांच्या मनांत काय आहे याचा विचार सहज होत असे, आणि जरी त्याच्या म्हणण्याचा विचार होत असे, तरी ते राजे लोकाचे अनुयायी इतकीच त्याची योग्यता असे. आणि हे ठीकच आहे. ज्या वीर लोकाची योग्यता मोठी त्याच्यावर पुढारीपणाची जबाबदारी पडे. त्याच्यावर पुढारीपणाचें ओझें पडे, म्हणून वीर लोकाच्या संधानानेंच हे लोक वागत. व जसे वीर लोक वागत तसें वैश्य लोक करीत. या क्षत्रिय वीराचीं दरबारें असत, त्याचे जनानखाने असत, त्यांचीं न्यायाधिकरणें असत, चोरीचपाटीची चौकशी करण्याकरिता

शिपाई असत, त्यांच्या राज्यांत शाळा असत, व ज्या नियमाप्रमाणें त्यांचा व्यवहार चाले त्याचे नांव ऋत असे. हे नियम लिहिलेले नसत, तथापि ते नित्य आहेत असे ते समजत. ऋग्वेदामध्यें या ऋताचें वारंवार वर्णन केलेलें आहे. देशांत असे क्षत्रिय राजे शेंकडो असत. आपण मोठे योद्धे अशी जेणेंकरून प्रख्याति होईल तें त्यांचें मुख्य काम. त्यांनीं शिकारी कराव्या व रूपवान् व श्रीमान् स्त्रिया आपल्या शौर्यानें स्वयंवराच्या वेळीं साध्य करून घ्याव्या असा त्यांचा उद्योग असे. आणि दिवसभर अशाच कामीं त्यांचें मन गुंतलें असे. अशा प्रकारें आर्यजनसमूहाचा ओघ चालला होता. कलाकौशल्य प्रगल्भ दशेस आणण्याकरतां ते झटत असत, धर्मकृत्यें करीत असत, प्रपंचाची व्यवस्था सुधारीत असत, नव्या नव्या देशांमध्यें शिरून त्या देशांत लागवड करीत असत, नदीचा प्रवाह कोणीकडे जातो आहे याचा शोध लावीत, आणि वार्षिक सामाजिक यज्ञ होत असतां कवि एका ठिकाणीं जमून जीं गाणीं गात तीं गाणीं ऐकून त्यांस मोठा आल्हाद वाटत असे.

वसाहतीकरतां नवे नवे देशांचे शोध लागत आहेत, नेहेमी नेहेमी नवीं संकटें प्राप्त होत आहेत, नेहमी युद्धप्रसंग चालला आहे, परंतु कोठें तरी देश सांपडावा आणि त्यांत स्वस्थ राहतां यावें अशी मनाची धांव आहे अशा प्रसंगीं योद्धे लोकांकडे सहजच पुढारीपणा येतो, आणि ते जसें सांगतात तसें सहजच सर्व लोक ऐकतात. ह्मणून क्षत्रियांचें वर्चस्व असतें.

पण एकदां वसाहत होऊन जिकडे तिकडे स्वस्थता झालीना झाली कीं, क्षत्रिय लोकांचा अंमल ढिला पडतो, त्यांचें वजन कमी पडतें, व आपल्या अनुयायांवर त्यांचा पगडा बरोबर बसत नाहीं. कारण स्वस्थतेच्या वेळीं आपल्या वर्चस्वाचा जो डौल क्षत्रिय लोक घालतात, तेणेंकरून दुसरे लोकांस वाईट वाटतें, व क्षत्रिय लोकच कोण मोठे येवढा डौल मिळवणार असें त्यांस वाटून त्यांचा हेवा होऊं लागतो. अशी

क्षत्रियांची स्थिति झाली आणि लोकांस वाईट वाटूं लागलें म्हणजे धर्मप्रवर्तक लोकांस संधि फावली. ब्राम्हण पुढें सरसावले. शौर्याची गरज नाहीं म्हणून क्षत्रिय मागें पडले, हळूं हळूं सारी सत्ता राजोपाध्यायाच्या स्वाधीन झाली, लोक उपाध्यायाच्या नादीं लागले, व उपाध्येबोवा धर्म असा आहे आणि धर्म तसा आहे म्हणून जें लोकांस सांगूं लागतात त्याचाच पगडा लोकांच्या मनावर बसतो आणि तेंच चांगलें असें लोकांस वाटूं लागतें. बाह्यदृष्ट्या सर्व सत्ता राजाच्या स्वाधीन खरी, परंतु अंततः सारी सत्ता उपाध्यायाच्या स्वाधीन होऊन जाते. कारण राजाच्या स्त्रिया आणि मुलें यांना उपाध्येबोवांच्या म्हणण्याप्रमाणें चालावें लागतें. कारण नित्यकर्माची व धर्माची गुरुकिल्ली उपाध्येबोवांच्या स्वाधीन असते आणि अशा स्थितीमध्यें धर्माचेंच प्राबल्य फार असतें.

याप्रमाणें जेव्हां धर्माचें प्राबल्य झालें आणि त्या प्राबल्यास लोक अनुसरूं लागले, आणि जेव्हां धर्मप्रवर्तकांची देशामध्यें प्रतिष्ठा वाढली, तेव्हां भरतखंडांतील आर्यलोकांमध्यें मोठें स्थित्यंतर होऊन चुकलें होतें. ऋषिजनांचा काल गेला होता, ब्रह्मवादिजनांचा काल आला होता. ज्या काळीं आर्य लोकांनीं दुसऱ्यांचा पराजय केला, आपलें सामर्थ्य वाढविलें, व मोठमोठे पराक्रम केले आणि नवीं नवीं सूक्तें गाइलीं तो काल पार निघून गेला होता. आर्य लोक स्वस्थ स्थाइक वसाहती करून राहिले होते. देशामध्यें जिकडे तिकडे स्वस्थता आणि शांति आहे, ऐष आरामीचा उपभोग होत आहे, नवीं सूक्तें करण्याबद्दल जुन्याच सूक्तांचा अर्थ करण्यांत पंडितजन गुंतले आहेत. ज्या वेळीं मोठें शौर्य आणि युद्धपराक्रम होत होते तो वेळ निघून गेला, आम्हीं पूर्वीं असे असे पराक्रम केले, असे असे संग्रामप्रसंग गुजरले, असें असें यश मिळविलें, अशा कथा सांगून व्यर्थ ढोल मिरविण्याचा काळ आला. या काळाचें उत्तम वर्णन ब्राह्मणनामक वैदिक ग्रंथांत केलें आहे. या ब्राह्मणग्रंथांचें मुख्य स्वरूप तें काय आहे ! श्रीमंत यजमानाला नादीं लावून त्याला व्यर्थ

फुगवावें, त्याच्या मनांत पूर्वीच्या युद्धपराक्रमाचें यश केवढें हें भरवून द्यावें, आपली लोकांत मोठी प्रतिष्ठा आहे असें त्यांस वाटवावें, आपल्यावर देवाची कृपा झाली आहे असें त्यांस भासूं लागावें, आणि यजमानाच्या मनाची अशी स्थिति होत असतां धर्मप्रवर्तकांची सत्ता वाढावी असें यज्ञसमारंभाचें स्वरूप आहे. तथापि ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. लोकांच्या बुद्धींचा प्रवाह फिरला, आणि त्या प्रवाहाच्या लोंढ्यांत वैदिक व्यवस्था वाहून जाते कीं काय असें वाटूं लागलें. वैदिक परंपरेस अनुसरणारे लोक म्हणजे वैदिकाचार्य आणि त्यांच्या उलट वाद करणारे बौद्धाचार्य, अशा दोन प्रकारच्या आचार्यांमध्यें वादविवाद होऊं लागले, आणि वैमनस्य उत्पन्न झालें. या वादापासून व वैमनस्यापासून जे परिणाम घडून आले, ते जगतांतील सर्व लोकांस लागू पडतात. वैदिकाचार्य आणि बौद्धाचार्य असे दोन तट झाले, हे एकमेकांशीं कसे वागले याचें आम्हीं संक्षेपतः वर्णन करतों.

ह्या दोन्ही तटाचे लोक आले कोठून? ह्या दोन्ही तटाचे लोक बाहेरून आलेले विजयी आर्य आणि या देशांतील मूळचे लोक यांच्यांतून उत्पन्न झाले. हे दोन तट उत्पन्न होण्याचें कारण असें आहे कीं, हिंदुस्थान देशांत आर्य लोकांचा आणि अनार्य लोकांचा शेंकडों वर्षें समागम झाला. जरी आर्यधर्मप्रवर्तकांनीं परस्परांमध्यें लग्नें होऊं नयेत असा वारंवार नियम केला, तरी आर्यांचे आणि अनार्यांचे शरीरसंबंध झालेच झाले. अमेरिकेमध्यें जशा पहिल्या पाहिरीच्या, चवथ्या पाहिरीच्या व आठव्या पाहिरीच्या मिश्र जाति उत्पन्न झाल्या, तशाच मिश्र जाति प्राचीन भरतखंडांत उत्पन्न झाल्या होत्या. या मिश्र जातींच्या लोकांच्या मनांत असें सहजच येऊं लागलें कीं, आपले शुद्ध आर्यांच्या इतके अधिकार असावेत, शुद्ध आर्यांमध्यें आपण मोडावें. शुद्ध आर्यलोक या मिश्र जातींच्या तिटकारा करूं लागले, आणि त्यांचें म्हणणें मोडून काढून त्यांस दाबून टाकण्यास प्रवृत्त झाले. दृष्टांतार्थ

रितां कवष ऐलूषाची कथा पहावी." जरी या दोन तटांच्या लोकांचे तंटे होत होते तरी कसे बसे ते एके ठिकाणीं राहिले. ज्यांची विद्वत्ता मोठी व अधिकार मोठा असे शुद्ध आर्यलोक केव्हां केव्हां आर्यांप्रमाणें वागणाऱ्या अनार्यांचा पक्ष स्वीकारीत. असें होतां होतां दोन्ही तट आवेशास चढले आणि एकमेकांचा पाडाव करण्यास प्रवृत्त झाले. आर्यांप्रमाणें वागणारे मिश्र ज्ञातीचे लोकांचा वारंवार हानि होई, त्यांना कोणींच पुसत नसत, आणि काय ती प्रतिष्ठा शुद्ध आर्यांचीच, असें झाल्यानें दोन्ही तटांचें वैमनस्य पेटलें. शुद्ध आर्य आपणांस उद्‌घ किंवा वरच्या प्रतीचे लोक असें म्हणवीत, आणि मिश्र जातीच्या व आर्यांप्रमाणें वागणारांस संघ किंवा खालच्या प्रतीचे लोक असें म्हणत. अशा प्रकारची जातिव्यवस्था अलीकडेहि हिंदुस्थानांत उत्पन्न झाली आहे, आणि तिचीं कारणेंहि अशींच आहेत. मुसलमान लोकांत अस्सल पठाण म्हणून लोक आहेत. आपणांस उगीच पठाण म्हणवणाऱ्या मिश्र जातीच्या पठाणांपेक्षां त्यांचा शरीराचा बांधा बळकट आणि कुर्रा मोठा. आपण कसें तरी करून अस्सल पठाणांत मोडावें अशी मिश्र जातीच्या पठाणाच्या मनाची धाव असते, आणि तो हिंदुस्थानांत जे पुष्कळ मुसलमान आहेत त्यांच्या बरोबर सलगीनें वागत नाहीं. अस्तु.

मिश्र जातीचे आर्य व आर्यांप्रमाणें वागणारे अनार्य यांचा एक तट आणि शुद्ध आर्यांचा दुसरा तट असे दोन तट पडले. या दोन्ही तटांच्या मतांमध्यें मोठा भेद असे. शुद्ध आर्य असें मानीत कीं जग सत्य आहे आणि तें स्थाइक आहे; अशुद्ध आर्य असें मानीत कीं, जग मायारूपी आहे. शुद्ध आर्य असें म्हणत कीं, स्वर्ग आहे, त्यातील सौख्य आहे, व तें मनुष्यास प्राप्त होतें; अशुद्ध आर्य असें म्हणत कीं, जगतामध्यें तापत्रय आहे. तें तापत्रय तीन प्रकारचें —आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक. हें तापत्रय हात धुवून मनुष्याच्या पाठीस लागलें आहे, आणि नवीं नवीं दुःखें भोगण्याकरितां पुनर्जन्म होतो. शुद्ध आर्य असें मानीत कीं, यज्ञापासून फल उत्पन्न होतेंच होतें, यज्ञ हें ऐहिक सुखाचें साधन आहे; इतकेंच काय! पण यज्ञाचे योगानें स्वर्गादि प्राप्त होतो, आणि हा यज्ञ करण्याचा अधिकार आम्हासच आहे, आणि अशुद्ध आर्य असें मानीत कीं, यज्ञापासून दुःख उत्पन्न होतें. शुद्ध आर्य आपणांस पशु प्राप्त व्हावे,

धन प्राप्त व्हावे म्हणून झटत; अशुद्ध आर्य लोकांस वैराग्य बरें वाटे आणि ते स्वेच्छेनें क्लेश भोगीत, आणि आपणांस श्रमण किंवा श्रम करणारे म्हणण्यांत संतोष मानीत. ऐहिक सुखाचें साधन ज्ञान आहे असें समजून तें प्राप्त करून घेण्यांत शुद्ध आर्य भूषण मानीत आणि ते असा हट्ट धरून बसत कीं वेद हे ईश्वरप्रणीत आहेत; अशुद्ध आर्यलोकांस ध्यान करणें बरें वाटे, आणि ते संन्यास घेऊन मठांत वास करीत. शुद्ध आर्यांचा कर्ममार्गावर किंवा प्रवृत्तिमार्गावर भर असे, आणि ते आपल्या विद्यार्थ्यांस तो जपून व्यवस्थित रीतीनें शिकवीत; अशुद्ध आर्य लोक प्रवृत्तीपासून सर्व दु.खें उत्पन्न होतात असें मानीत. इंद्र, वायु आणि अग्नि अशा तात्विक देवतांची शुद्ध आर्य लोक पूजा करीत; अशुद्ध आर्य आपल्या मतप्रवर्तकाच्या कांहीं शेषाची पूजा करीत. (शेष म्हणजे नख, दांत, केश इत्यादि.) यापासून प्राचीन मूर्तिपूजेची प्रवृत्ति झाली. शुद्ध आर्यलोक आपल्या वर्चस्वाची प्रतिष्ठा मानीत, आपले अधिकार मोठे असें मानीत, आणि सामाजिक व्यवस्थेचें मुख्य तत्व जातिभेद आहे असें मानीत; अशुद्ध आर्य यापेक्षां उत्तम व्यवस्था करून जातीपेक्षां सत्य आणि धर्म यांची योग्यता मोठी असें मानीत. शुद्ध आर्यांच्या स्त्रिया ऐहिक भूषणें मिळाल्यानें संतोष मानीत, आणि आपल्या पतिसहवर्तमान यज्ञ करण्यामध्यें विराजमान होत; अशुद्ध आर्यांच्या स्त्रिया वैरागिणी होत आणि ऐहिक सुखाचा त्याग करीत. शुद्ध आर्यांस सृष्टि, देव आणि आत्मा हें आनंदाचें आणि सुखाचें आगर आहे असें वाटे; अशुद्ध आर्यांस सृष्टि, देव, आणि आत्मा ह्या कोणी दुःख कारक शक्ति आहेत असें वाटे. शुद्ध आर्यांस जात्याभिमान फार असे आणि फक्त स्वजातींचें हिताहित त्यास समजत असे; अशुद्ध आर्य स्पष्ट रीतीनें असें म्हणत कीं सर्वभूतीं दया करावी आणि प्रीति करावी हा धर्म आहे. शुद्ध आर्य नित्यश. यज्ञाकरितां आणि भक्षाकरितां पशु मारीत; अशुद्ध आर्य "अहिंसा परमो धर्मः" असें ढौलानें म्हणत. शुद्ध आर्य असें समजत कीं, सर्व जगतावर आपली सत्ता असणें हा आपला अधिकार आहे; अशुद्ध आर्य असें मानीत कीं मनुष्य आणि इतर प्राणी यांची योग्यता सारखीच आहे, आणि पृथ्वीमध्यें जें जें

उत्पन्न होतें, त्याचा उपयोग घेण्यास दोहोंसहि सारखा अधिकार आहे. शुद्ध आर्य आपण बुद्धिवान् आहों असा अभिमान बाळगीत; अशुद्ध आर्यांस भक्ति हेंच भूषण वाटे. शुद्ध आर्य अशी इच्छा करीत कीं आपणांला प्रापंचिक आणि स्वर्गाचीं सुखें प्राप्त व्हावीं; अशुद्ध आर्य अशी इच्छा करीत कीं आपणांस निर्वाणावस्था प्राप्त व्हावी. निर्वाणावस्था म्हणजे काय ? जिवाचें स्वातंत्र्य नष्ट होऊन तो कांहींएक नाहीं अशी स्थिति. असा उद्‌य आणि संघ यांमध्यें भेद होता. शुद्ध आर्यांचीं मतें एक तन्हेचीं पडत आणि मिश्र आर्यांचीं आणि अनार्यांचीं मतें दुसऱ्या तन्हेचीं पडत. शुद्ध आर्यांच्या धार्मिक आणि सामाजिक धर्मसंस्थेचें नांव वैदिक धर्मसंस्था. मिश्र आर्यांच्या आणि अनार्यांच्या धर्मसंस्थेचें नाव बौद्ध धर्मसंस्था. अर्वाचीन हिंदूंच्या मनावर या दोन्ही धर्मसंस्थांचा इतका दृढ संस्कार आहे कीं ते कांहीं अंशीं बौद्ध सांप्रदाय आचरतात, आणि कांहीं अंशीं वैदिक सांप्रदाय आचरतात असें म्हटलें तरी चालेल. पूर्वमीमांसेमध्यें वैदिक धर्मसंस्थेचें निरूपण केलें आहे, आणि तिचें मंडन केलें आहे. पूर्वमीमांसाशास्त्राचा कर्ता जैमिनि हें सांगण्यास नको. उत्तरमीमांसेमध्यें बौद्ध लोकांच्या मुख्य मतांचा संग्रह आहे, आणि त्या मतांच्या संबंधाचें निरूपण आहे. परंतु इतकेंच लक्षांत ठेवायाचें कीं बौद्धाचार्य वेदाचा त्याग करीत असत, आणि वेदांतवादी वेदाचा स्वीकार करतात. जैमिनिकृत शास्त्राचा अंमल अजून चालतो आहे. पुराणामध्यें ज्या व्रतांचें वर्णन केलें आहे, तीं व्रतें अंशतः यज्ञच आहेच. आणि हीं व्रतें सर्व हिंदु लोक अजून करतात. बादरायणशास्त्राचा सर्व हिंदुस्थानभर प्रचार आहे, आणि ज्ञानगोष्टी केल्यानें बहुतेक हिंदूंच्या मनांचें समाधान होतें. या बादरायणशास्त्राचे निरनिराळ्या सांप्रदायाचे लोक निरनिराळ्या रीतीनें अर्थ करतात. तथापि बौद्ध लोकांच्या मताच्या कलावर अद्वैतवादी शंकराचार्यांचे सिद्धांत आहेत. असा प्रकार मध्वाचार्यांचा किंवा रामानुजाचा नाहीं. तथापि शंकराचार्यांच्या सिद्धांतामध्यें भेसळ आहे. कारण स्मार्त लोक यज्ञाकरितां पशु मारतात, आणि या रीतीनें वैदिक परंपरेस अनुसरतात. मध्वाचार्यांनीं वैदिक परंपरेचा स्वीकार केला आहे, परंतु

यज्ञामध्ये पशु मारणें एकीकडे टाकून पिठाचा पशु आंत घुसडून बौद्ध संप्रदायाच्या अहिंसा धर्माचा स्वीकार केला आहे. रामानुज बौद्ध लोकांचा मार्ग एकिकडे सोडतो, आणि वैदिक मार्ग एकीकडे सोडतो, आणि मध्येंच विशिष्टाद्वैत सिद्धांताचें प्रतिपादन करतो. अशा गडबडीमध्यें वल्लभसांप्रदाय उत्पन्न होणें हें आवश्यकच आहे. शंकराचार्यांच्या, मध्वाचार्यांच्या, रामानुजाच्या आणि वल्लभाचार्यांच्या भाष्यांच्या प्रति आम्हीं मिळविल्या आहेत आणि त्यांतील मुख्य मुख्य इंग्रिलाशीं वचनें वाचकांपुढें आम्ही मांडूं, आणि आवश्यक असल्यास आमचें म्हणणें काय हेंहि वाचकांस कळवूं. प्रत्येक शास्त्रामध्यें निरनिराळ्या सिद्धांतांचें विवेचन केलेलें असतें. हे सिद्धांत मनुष्याच्या पांच प्रकारच्या मनोगतापासून उत्पन्न होतात. १. आपल्या सभोंवतीं जें जड दिसत आहे, आणि तत्संबंधीं चराचर संसार चालला आहे, याचा आपला संबंध तरी काय ? हें पहिलें मनोगत. २. ह्या चराचर संसाराची उत्पत्ति कशी झाली, आणि तिचें मुख्य कारण काय हें दुसरें मनोगत. ३. ह्या चराचर संसाराचें आणि मुख्य कारणाचे संबंध कोणते हें तिसरें मनोगत. ४. मनुष्याच्या अंतर्यामीं नानाशक्ति आहेत हें स्पष्टच आहे. आणि अंतरिक्षीं, आकाशीं, वायूमध्यें, अग्नीमध्यें निरनिराळ्या शक्ति आहेत हेंहि स्पष्टच आहे. यांस पंडितजन आध्यात्मिक आणि आधिदैविक अशीं नांवें देतात. हें चौथें मनोगत. ५. आणि परम सुख तें काय, मुक्ति ती काय, निर्वाण तें काय ? हें पांचवें मनोगत आहे. या पांची मनोगतांचा विचार केला असतां ब्रह्ममीमांसा आणि कर्ममीमांसा यांमध्यें अतिशय अंतर आहे. असें अंतर कसें पडलें हें दाखविण्यास आम्हीं यत्न केला आहे. पांचींहि मनोगतांच्या संबंधानें जे निरनिराळे सिद्धांत उत्पन्न होतात, त्यांचें विवेचन शास्त्रामध्यें विशेष केलेलें असतें. ज्या सूत्रांमध्यें हे सिद्धांत बांधलेले असतात, तीं सूत्रें आम्ही वाचकांच्या पुढें मांडूं. ही प्रस्तावना पुरी करण्यापूर्वी इतकें सांगितलें पाहिजे कीं पूर्वमीमांसेचा विचार केल्यानें वैदिक आणि बौद्ध सांप्रदायाचें स्वरूप नीट कळून येईल. आणि इतिहासदृष्ट्या ह्या गोष्टीची योग्यता केवढी आहे हें सांगण्याच नको.

अथोत्तरमीमांसा ॥

ब्रम्हसूत्रम् ॥

प्रथमाध्यायस्य प्रथमः पादः ॥

अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥ १ ॥

पदार्थः । अथ=अनन्तरम् । अतः=एतस्मात् कारणात् । ब्रह्मजिज्ञासा=ब्रम्हणो जिज्ञासा । जिज्ञासा=ज्ञातुमिच्छा ।

वाक्यार्थः । अनन्तरमेतस्मात् कारणाद् ब्रह्मणो जिज्ञासा ॥

भावार्थः । कर्मज्ञानानन्तरं वेदवाक्यविचारद्वारा ब्रह्म जिज्ञासितव्यम् । किं नाम ब्रह्मेत्युत्तरेषु सूत्रेषु परीक्ष्यते । नाना वेदान्तमार्गाः सन्ति । तत्र ब्रह्मस्वरूपनिरूपणं भिद्यते । यथा । अद्वैतवादिनो वदन्ति शुद्धबुद्धमुक्तस्वभावं निर्गुणं निराकारात्मस्वरूपमात्माभिन्नं ब्रह्मेति । द्वैतवादिनस्त्वात्मभिन्नः सगुणः सर्वज्ञो मुक्तिदाता जगत्कर्ता मनुष्यैः सेव्यः परमेश्वरो ब्रह्मेति । विशिष्टाद्वैतवादिनो रामानुजानुयायिनो वदन्ति सगुणो जगत्कर्ता सर्वज्ञो मुक्तिदाता पुरुषोत्तमो ब्रह्म । पुनर्जीवोऽपि सगुणो मुक्त्यवस्थायामीश्वरस्य स्वरूपतां प्राप्नोति । ईश्वरो जगत्कर्तृत्वेन विशिष्यत इति । वल्लभमतानुयायिनस्तु जडजीवरूपसर्वात्मकं ब्रह्म । तदश्नुते सर्वान् कामान् । तेन विविधभोगचतुरेण ब्रह्मणा सह जीवो मुक्त्यवस्थायां सर्वान् कामानश्नुते इति । एतेषां मतानामग्रे तारतम्येन निरूपणं करिष्यते ब्रम्हस्वरूपं निर्णेष्यतेच । तत्र

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नुते सर्वान् कामान् सह ब्रह्मणा विपश्चिता । उ० ब्र० १ ॥ ब्रह्मविदाप्नोति परम् । उ० ब्र० १. ॥ सर्वं खल्विदं ब्रह्म । उ० छां० ३.१४,१, ॥ नेह नानास्ति किञ्चन । तत् त्वमसि । उ० छां० ६.८,४. ॥ ब्रह्माहमस्मि । ब्रह्मविद् ब्रह्म भवति ॥

बादरायणकृत वेदान्त-दर्शन.

१. आतां येथून ब्रह्मविचार.

१ चार वेदांतमतांचा विचार करून बादरायणसूत्रांच्या अर्थांचा निर्णय करावा असा आमचा हेतु आहे. तीं चार वेदांतमतें कोणतीं? प्रथम, ज्याचें शंकराचार्यांनीं प्रतिपादन केलें, व जें उत्तर हिंदुस्थानांत पुष्कळ प्रचारांत आहे, तें अद्वैतवेदांतमत. दुसरें विशिष्टाद्वैत सिद्धांत रामानुजानें स्थापन केला त्याचा प्रचार कावेरीतीरीं आणि तिरुपति म्हणजे व्यंकोबाचा गिरी व त्याच्या सभोंवताल प्रांत यांत आहे. तिसरें, मध्वाचार्यांनीं स्थापन केलेला द्वैतसिद्धांत मुख्यत्वें करून कर्नाटकांत आढळतो, परंतु भरतखंडांत सर्व ठिकाणीं या मताचे लोक थोडेबहुत आहेत. चवथें, पुष्टिमार्गप्रतिपादन करणाऱ्या वल्लभाच्या मताचा प्रचार गुजराथेंत आहे. प्रत्येक मताचा पांच प्रकारचा विचार करायाचा असें आम्हीं प्रस्तावनेंत सांगितलें आहे. बादरायणाच्या ज्या ज्या सूत्राच्या धोरणानें शंकराचार्यादि आचार्य आपआपल्या मतांचें प्रतिपादन करतात, त्या सूत्राचा अर्थ करते वेळीं त्या मतांचें निरूपण आम्हीं करूं. या प्रथम सूत्रीं ब्रह्म हा शब्द विचार करण्याजोगा आहे. शंकराचार्यांचे मताप्रमाणें ब्रह्म ज्ञानमय, आनंदमय, आणि चैतन्यस्वरूप आहे. तें निर्गुण आणि निराकार असून पुरुषविशेष

THE BRAHMA SÛTRA

1 Now then the investigation of Brahma

1 We purpose to examine the four systems of Vedânta and fix the interpretation of the sûtras of Bâdarayana. What are these four systems of Vedânta? The first is the Advaita Vedanta which Shankarâcharya propounds and which has many adherents in Northern India. The second is the Vishistâ dvaita which is propagated by Ramânuja and which prevails in the country about Tirupati the shrine of Vyankatesha known as the Vyankatesha giri and on the banks of the Kaveri. The third is the Dvaita system which Madhvacharya inculcated and which is more or less known in all parts of India and is specially studied in the Carnatic. The fourth is the Pushti mârga a form of Epicureanism which predominates in Gujarath. We have stated in the introduction that each of these systems deserves an examination from five different points of view. We will discuss the doctrines as laid down by any of the four schools when we examine that sûtra of Badarâyana on which Shankarâchârya and other Âchâryas base their statements. The term in the above sûtra which calls for special examination is Brahma. According to Shankarâchârya the form of Brahma is knowledge happiness and spirituality, it is without any quality and shape and is not a person, it alone is real and all else is

सूत्राणि.

जन्माद्यस्य यतः ॥ २ ॥

पदानि । जन्मादि, अस्य, यतः ॥

वाक्यार्थः । यतो जन्मादि अस्य (तस्य नाम ब्रम्ह) अस्य प्रत्यक्षस्य चिन्त्यस्य च उत्पत्तिस्थितिलयं यस्मात् कारणात् तद् ब्रम्ह ॥

भावार्थः । द्वैताद्वैतविशिष्टाद्वैतवल्लभमतानुयायिनां स्वमतानुरोधेनास्य सूत्रस्यार्थः कर्तुं शक्यते । अद्वैतमते जीवब्रह्मणोरभेदः चैतन्यरूपं ब्रम्ह सत्यं । जगत् मिथ्या । द्वैतमते तयोर्भेदः ब्रम्ह सत्यं । जगदपि सत्यम् । विशिष्टाद्वैतमते सगुणं ब्रम्ह सत्यं । जगत् मिथ्या । सगुणजीवस्य सगुणब्रम्हणश्चाभेदः । वल्लभानुयायिनां तु यत् प्रत्यक्षं जडात्मकमिदं जगत् तदेव ब्रम्ह नित्यं सत्यं च । जन्म लयश्च केवलमाविर्भावतिरोभावौ ॥

उपनिषद्वाक्यान्यनुसन्धेयानि

यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रम्हेति । उ० भृ० १. ॥ आनन्दाद्धेव खल्विमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि जीवन्ति आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति । उ० भृ० ६. ॥

संस्कृतामध्यें जीं वेदावली आणि उपनिषन्मालीं वाक्यें दिलीं आहेत, आणि ज्यावरून वेदांतवादी लोक आपआपल्या मताचे सिद्धांत बांधतात, आणि ज्यावरून वेदांतांत मोठा वाद उत्पन्न होतो, त्या वाक्यांचें आम्हीं भाषांतर करतों. "ब्रह्म (हें) सत्य, ज्ञान, आणि अनंत (आहे) हृदयरूप, उत्तम आकाशरूप गुहेमध्यें ठेवलेलें (जे तें) जो जाणतो." "चतुर ब्रह्मासहवर्तमान तो सर्व

Brahma becomes Brahma" We shall have ample opportunities of pointing out in the sequel the different interpretations of these texts as insisted upon by different schools of Vedântic teachers

२. ज्यापासून ह्याचें उत्पत्यादि होतें.

मोग अनुभवितो" ब्रह्म जाणणाराला उत्तम तें मिळतें" "हें सर्व निश्चित ब्रह्म" "येथें कांहींच नाना प्रकारचें नाहीं", 'तें तू आहेस" "मी ब्रह्म आहें." ब्रम्ह जाणणारा ब्रह्म होतो." हीं वाक्ये घेऊन वाद करताना वेदांतवादी कसा अर्थ करतात, याचें प्रसंगवशात् आम्ही पुढें वर्णन करू.

२. ज्यापासून म्हणजे ब्रह्मापासून, ह्याचें म्हणजे आपल्या सभोंवती जें प्रत्यक्ष दिसतें त्या सर्वांचें, उत्पत्यादि म्हणजे उत्पत्ति, स्थिति, आणि लय, असा ह्या सूत्रातील पदाचा अर्थ आहे भिन्नभिन्न मताचे वेदांती पंडित आपआपल्या रीतीनें या सूत्राचा अर्थ लावतात आणि असें करणें सोपें आहे अद्वैतवादी असें म्हणतात कीं, "हें जगत केवळ भ्रमात्मक आहे. ब्रम्हावरती एक भ्रमाचें किंवा मायेचें आच्छादन पडलें (अशा आच्छादनास ते आवरण असें म्हणतात.) आणि मग अशा स्थितींतील ब्रम्हापासून सर्व जगताची उत्पत्ति झाली. अशा या उपत्तीस अद्वैतवादी विवर्त असें म्हणतात. शुद्ध चैतन्याचें आवरण करावें अशी एक शक्ति आहे आणि मग सर्व ब्रम्हांड आपल्या पुढे उभें राहिलें आहे, असें भासतें" पुन द्वैत मताचे लोक असें म्हणतात कीं,-"सर्व जगत हें मळ्यासारखें आहे आणि ब्रम्ह म्हणजे पुरुषोत्तम परमेश्वर, हा माळ्यासारखा त्याचा कर्ता आहे. तो या जगाचें

2 Whence of this the origin and the rest

2 The terms *whence* signifies *from Brahma* · *Of this*—of the phenomenal seen about us. *The origin and the rest*—the origin, the existence, and the destruction Different schools of the Vedânta thinkers interpret this sûtra—each in his own way—an intricate procedure The Advaita-school asserts that every phenomenon is a delusion, that the Brahma is covered over with ignorance,—a form of delusion, such a covering is styled by them (*Âvarana*) the phenomenal originates in Brahma thus covered over The origination of the phenomenal is called by them *Vivarta* There is a power which can cover and conceal the pure intelligence—a power which produces the delusion of the creation being actually perceived The Dvaita school, on the contrary, holds that the creation is like a garden, and Brahma—the highest personal God—works in it like a gardener He protects this world and occasionally chastises the human soul, which, according to its merits or demerits, transmigrates and suffers misery All the Vedânta-schools as well as Buddhism recognise the doctrine of the transmigration of the human soul The followers of Râmânuja hold that Brahma possesses qualities, and assert that this sûtra demonstrates its power of creation The followers of Vallabha declare that Brahma is real and eternal and its form is the phenomenal seen about us When asked to explain the production or destruction of natural substances as

नाहीं आणि हें ब्रह्मच काय तें ज्ञान आहे, आणि बाकी सर्व वस्तुमात्र मिथ्या निर्वाणावस्थेचें बौद्धलोकहि असेंच वर्णन करतात तथापि शंकराचार्यांच्या अद्वैतसिद्धांतामध्यें आणि बौद्धांच्या निर्वाण सिद्धांतामध्यें भेद आहे त्या भेदाचें निरूपण पुढें करूं पुन, विशिष्टाद्वैतसिद्धांतवादी रामानुजाचें असें म्हणणें आहे कीं परमेश्वर पुरुष आहे तो सगुण आहे, जगत्कर्ता तो आहे, आणि मुक्तिदाताहि तो आहे मनुष्याचा जीवहि सगुण आहे, आणि तो मुक्त झाला म्हणजे सर्वथैव ईश्वरतुल्य होतो परंतु जगत् उत्पन्न करण्याची शक्ति मात्र त्याला नाहीं पुन, द्वैतसिद्धांत असा आहे कीं ब्रह्म पुरुषविशेष आहे, तो जगत्कर्ता आहे, जगन्नियंता आहे, सर्वथैव सेवा करण्यास तो योग्य आहे जीव कधींहि त्याच्या योग्यतेस पावणार नाहीं जीवानें नित्य आता किंवा मुक्ति प्राप्त झाल्यानंतर परमेश्वराची सेवाच करावी इतका त्याचा अधिकार आहे पुन वल्लभमतानुयायी लोकांचें निराळेंच मत आहे जड आणि जीव असें ब्रह्माचें रूप आहे, तें ब्रह्म सर्व प्रकारच्या भोगाचा अनुभव घेतें मुक्ति प्राप्त झाल्यानंतर जीवहि ब्रह्मासहवर्तमान सर्व भोगाचा अनुभव घेणार अशा चार मताच्या अनुरोधानें निरनिराळ्या मताचे लोक ब्रह्मशब्दाचा अर्थ बसवितात परंतु द्वैतसिद्धांताचा अर्थ आम्हास समर्पक दिसतो कारण बादरायणाच्या लेखावरून त्वरित असाच अर्थ निष्पन्न होतो, असें आम्हास

false In the first stage of the development of Buddhism, the condition of Nirvâna is described in the same way There is, however, a distinction between the form of Brahma as recognized by the Advaita school and the Nirvâna of Buddhists—a distinction which will be considered in the sequel According to Râmânuja, the promulgator of the Vishistadvaita system, Brahma is a person, possessing qualities the creator of the world and saviour The human soul also possesses qualities and when saved, is like Brahma in every respect, except the power of creating the world According to Madhvâchârya the first known teacher of Dvaita philosophy, Brahma is personal the creator and the ruler of the world, and in every way deserves to be worshipped the soul never being capable of rising to equality with God, is entitled only to serve Him now in this world and when saved and in Heaven The followers of Vallabha differ from all these they believe that all the material and the spiritual is Brahma which is capable of all fleshly enjoyments. The soul when saved, is to secure all enjoyments along with Brahma. The term Brahma is then interpreted in their own way by all these four schools so as to suit the doctrines they preach But we believe the interpretation of the Dvaita school to be reasonable because we think that the sûtras of Bâdarâyana sanction it. We will now indicate generally the topics discussed in the system of Bâdarâyana so that the reader may find it easy to see its scope The Brahma sûtra consists of four books in the first, Bâdarâ-

यांतें अस्तु बादरायणाच्या ब्रह्मसूत्रांत किती विषय आला आहे याचें थोडें येथें दिग्दर्शन केलें पाहिजे, म्हणजे वाचकास विचार करण्यास बरें पडेल ब्रह्मसूत्राचे चार अध्याय आहेत. त्यांत पहिल्या अध्यायांत वेदांतील आणि उपनिषदांतील वाक्यें घेऊन ब्रह्मशब्दाचा अनुरूप अर्थ असें दाखविण्याकरितां बादरायणानें उद्योग केला आहे दुसऱ्या अध्यायामध्यें आपल्या मताशीं दुसऱ्या मताचा जितका विरोध यतो तितका दुसऱ्या मताचें खंडण केलें आहे तीं दुसरीं मतें कोणतीं। सांख्य वैशेषिक, आणि बौद्ध इत्यादि तिसऱ्या अध्यायामध्यें वैराग्य म्हणजे काय याचा विचार आहे चौथ्या अध्यायामध्यें जीव मुक्त झाला म्हणजे त्याची स्थिति कशी होते, आणि मुक्तीचें स्वरूप काय आहे याविषयीं विचार आहे या सर्व गोष्टींचें महत्त्व धर्मदृष्ट्या राहिलें, पण इतिहासदृष्ट्या केवढें आहे हें सांगावयास नको युनानी देशांतील झीनो, एपिक्युअर, प्लेटो, आणि साक्रेटीस यांच्या मतांचा विचार करण्याचा प्रचार या देशीं पर्यंत चालला आहे पण निदान त्यांच्या इतके प्रबळ विचार करणारे पंडित या भरतखंडीं झाले, असें भरतखंडांतील लोकांस ठाऊक नसावें हें निदान आम्हांस तरी आश्चर्यकारक वाटतें भरतखंडीय आणि युनानी आर्यांच्या मताचा भेदाभेद दाखविल्यानें असें आश्चर्य वाटण्यास किंचित कारण आहे, हें वाचकांच्या लक्षांत सहजच येईल

yana quotes a variety of passages from the Vedas and Upanisads, and attempts to fix the sense of the term Brahma in the second he refutes the doctrines of such schools of philosophy as Bouddha, Sankhya, Yoga and Vaisheshika when they are in any way opposed to his system in the third, the nature and the conditions of Vairâgya—self abnegation—are investigated and in the fourth, the condition of the soul when saved, is examined and spiritual emancipation is enlarged upon. We need not mention that the importance of the study of these systems is great from a historical, if not from a religious point of view. We study the systems of Zeno, Epicure, Socrates and Plato The ignorance of our countrymen of the doctrines of thinkers, equally profound and sound, if not more, excites at least our surprise, the grounds of which the reader will perceive when the distinctions and identity of Indian and Hellenic thought are pointed out We will translate the texts from the Vedas and Upanisads which we have quoted in the Sanskrita portion of our work, on which the statements of Vedântic teachers are based, and the signification of which is discussed to adapt them to the doctrines of a particular school "Brahma is truth, knowledge, and happiness" "(He) who knows that which is placed in the cavity of the heart —in the highest heaven" "He enjoys all enjoyments along with skilful Brahma" "(He) who knows Brahma obtains the highest" "All this (is) indeed Brahma" "Any thing here is not various" "That thou art" "I am Brahma." "He who knows

सूत्राणि.

जन्माद्यस्य यतः ॥ २ ॥

पदानि । जन्मादि, अस्य, यतः, ॥

वाक्यार्थः । यतो जन्मादि अस्य (तस्य नाम ब्रम्ह) अस्य प्रत्यक्षस्य चिन्त्यस्य च उत्पत्तिस्थितिलयं यस्मात् कारणात् तद् ब्रम्ह ॥

भावार्थः । द्वैताद्वैतविशिष्टाद्वैतवल्लभमतानुयायिनां स्वमतानुरोधेनास्य सूत्रस्यार्थः कर्तुं शक्यते । अद्वैतमते जीवब्रह्मणोरभेदः चैतन्यरूपं ब्रम्ह सत्यं । जगत् मिथ्या । द्वैतमते तयोर्भेदः ब्रम्ह सत्यं । जगदपि सत्यम् । विशिष्टाद्वैतमते सगुणं ब्रम्ह सत्यं । जगत् मिथ्या । सगुणजीवस्य सगुणब्रम्हणश्चाभेदः । वल्लभानुयायिनां तु यत् प्रत्यक्षं जडात्मकमिदं जगत् तदेव ब्रम्ह नित्यं सत्यं च । जन्म लयश्च केवलमाविर्भावतिरोभावौ ॥

उपनिषद्वाक्यान्यनुसन्धेयानि

यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रम्हेति । उ० भृ० १.॥ आनन्दाद्धेव खल्विमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि जीवन्ति आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति । उ० भृ० ६. ॥

संस्कृतामध्यें जीं वेदांतलीं आणि उपनिषदांतलीं वाक्यें दिलीं आहेत, आणि ज्यावरून वेदांतवादी लोक आपआपल्या मताचे सिद्धांत बांधतात, आणि ज्यावरून वेदांतांत मोठा वाद उत्पन्न होतो, त्या वाक्यांचें आम्हीं भाषांतर करतों "ब्रह्म (हें) सत्य, ज्ञान, आणि अनंत (आहे) तद्रूप, उत्तम आकाशरूप गुहेमध्यें ठेवलेलें (जे तें) जो जाणतो," "चतुर ब्रह्मासहवर्तमान तो सर्व

Brahma becomes Brahma" We shall have ample opportunities of pointing out in the sequel the different interpretations of these texts as insisted upon by different schools of Vedântic teachers

२. ज्यापासून ह्याचें उत्पत्त्यादि होतें.

भोग अनुभवितो" ब्रह्म जाणणाराला उत्तम तें मिळतें" "हें सर्व निश्चित ब्रह्म" "येथें काहींच नाना प्रकारचें नाहीं", 'तें तू आहेस" "मी ब्रह्म आहें." ब्रह्म जाणणारा ब्रह्म होतो" हीं वाक्यें घेऊन वाद करताना वेदांतवादी कसा अर्थ करतात, याचें प्रसंगवशात् आम्ही पुढें वर्णन करू.

२. ज्यापासून म्हणजे ब्रह्मापासून, ह्याचें म्हणजे आपल्या सभोंवती जें प्रत्यक्ष दिसतें त्या सर्वांचें, उत्पत्त्यादि म्हणजे उत्पत्ति, स्थिति, आणि लय, असा ह्या सूत्रातील पदांचा अर्थ आहे. निरनिराळ्या मतांचे वेदांती पंडित आपआपल्या रीतीनें या सूत्राचा अर्थ लावतात आणि असें करणें सोपें आहे. अद्वैतवादी असें म्हणतात कीं, "हें जगत् केवळ भ्रमात्मक आहे. ब्रह्मावरती एक भ्रमाचें किंवा मायेचें आच्छादन पडलें (अशा आच्छादनास ते आवरण असें म्हणतात.) आणि मग अशा स्थितींतील ब्रह्मापासून सर्व जगताची उत्पत्ति झाली. अशा या उत्पत्तीस अद्वैतवादी विवर्त असें म्हणतात. शुद्ध चैतन्याचें आवरण करावें अशी एक शक्ति आहे आणि मग सर्व ब्रह्मांड आपल्या पुढें उभें राहिलें आहे, असें भासतें" पुन द्वैत मताचे लोक असें म्हणतात कीं,–"सर्व जगत् हें मळ्यासारखें आहे आणि ब्रह्म म्हणजे पुरुषोत्तम परमेश्वर, हा माळ्यासारखा त्याचा कर्ता आहे. तो या जगाचें

2. Whence of this the origin and the rest

2 The terms *whence* signifies *from Brahma* *Of this*—of the phenomenal seen about us. *The origin and the rest*—the origin, the existence, and the destruction Different schools of the Vedânta thinkers interpret this sûtra—each in his own way—an intricate procedure The Advaita-school asserts that every phenomenon is a delusion, that the Brahma is covered over with ignorance,—a form of delusion, such a covering is styled by them (*Âvarana*) the phenomenal originates in Brahma thus covered over The origination of the phenomenal is called by them *Vivarta* There is a power which can cover and conceal the pure intelligence—a power which produces the delusion of the creation being actually perceived The Dvaita school on the contrary, holds that the creation is like a garden, and Brahma—the highest personal God—works in it like a gardener He protects this world and occasionally chastises the human soul, which, according to its merits or demerits, transmigrates and suffers misery All the Vedânta-schools as well as Buddhism recognise the doctrine of the transmigration of the human soul The followers of Râmânuja hold that Brahma possesses qualities, and assert that this sûtra demonstrates its power of creation The followers of Vallabha declare that Brahma is real and eternal and its form is the phenomenal seen about us When asked to explain the production or destruction of natural substances as

सारक्षणादि करतो, कारणपरत्वें जीवास दुःखहि करतो, आणि पापपुण्यानुसार पुनः पुनः जीवास जन्ममरणादि क्लेश भोगावे लागतात." सर्व वेदान्तमताप्रमाणें पुनर्जन्म गृहीत आहे. बौद्धांसहि पुनः पुनः जन्म आणि पुनः पुनः मरण हें मान्य आहे. रामानुज असें मानतात कीं, ब्रह्म सगुण आहे, आणि त्यामध्यें कर्तृत्वगुण आहे, असें या सूत्रानें दाखवितात. वल्लभ मताप्रमाणें ब्रह्म सत्य आणि नित्य असून हें जें प्रत्यक्ष दिसतें हाच त्याचा आकार आहे. आतां कांहीं पदार्थ उत्पन्न होतात हें कसें तर ते केवळ मनुष्यास दिसूं लागतात इतकेंच. यास ब्रह्मानुयायी लोक आविर्भाव असें म्हणतात. पुनः कांहीं पदार्थांचा नाश होतो हें कसें? तर ते पदार्थ कधीं दिसेनासे होतात. यास ब्रह्मानुयायी लोक तिरोभाव असें म्हणतात. पुनः कारणें दोन प्रकारचीं आहेत. मातीं हें मडक्याचें कारण आहे आणि कुंभार हेंहि मडक्याचें कारण आहे. पहिल्या प्रकारच्या कारणास उपादान असें म्हणतात, आणि दुसऱ्यास निमित्तकारण म्हणतात. अद्वैतसिद्धान्ताप्रमाणें ब्रह्म हें जगताचें उपादान कारण आहे. द्वैतसिद्धान्ताप्रमाणें ब्रह्म म्हणजे पुरुषोत्तम हें जगताचें निमित्तकारण आहे. रामानुजाच्या मताप्रमाणें जीवापेक्षा ब्रह्म म्हणजे पुरुष यांत कर्तृत्वशक्ति अधिक आहे. बाकी मुक्त झालेले जीवहि सगुण आणि ब्रह्महि सगुण हीं दोन्हीं सारखींच आहेत. आतां, सगुण जीवाला

seen in this world, they state that it is a case " of mere appearance or disappearance which are respectively called Âvirbhâva or Tirobhâva. Again, there are two kinds of causes—a cause of an earthen vessel is mud as well as a potter. The first is called Upâdâna, and the last—Nimitta. They are material and efficient causes respectively. According to the Advaita-school, Brahma is the material cause of the phenomenal. According to the Dvaita school, on the contrary, Brahma or the highest person is the efficient cause. According to Râmânuja, Brahma possesses a quality more than the human soul: the one can create while the other cannot. The human soul when saved and Brahma possess otherwise the same qualities. While in this world the human soul does not perceive its identity with Brahma, though both are personally identical. The cause of the first believing itself to be different from the last, is ignorance. According to Vallabha, the phenomenal is Brahma. Hence according to the Advaita and Vallabha schools, Brahma is the material cause of the phenomenal, but the first perceives the human soul to be different from Brahma from its being covered, and on account of ignorance, while they are not really so and the last does not particulary mention ignorance delusion, and the power of covering Brahma. Suffice it to state that all these distinctions will be examined as occasion arises—distinctions which often baffle attempts at formal statement. We will translate the texts elsewhere quoted " Verily know that from

सगुण ब्रम्हाचे ऐक्यदर्शन होत नाहीं सगुण ब्रम्ह निराळें आणि आपण तिराळे असें जिवास मान होतें, याचें कारण अविद्या आहे अस्तु. तसेंच वल्लभमतप्रमाणेंहि हें जें जड जगत् दिसतें तेंच ब्रम्ह. तेव्हां अद्वैतवादी आणि वल्लभ या दोघाच्या मताप्रमाणें ब्रम्ह हें जगताचें उपादानकारण आहे, परंतु अद्वैत मताला अविद्या, माया, आवरण यामुळें ब्रम्ह आणि जीव भिन्न दिसतात, वास्तविक ते भिन्न नाहींत, असें उपपादन करावें लागतें. वल्लभमतामध्यें अविद्या, माया, आणि आवरण याचा विशेष विचार नाहीं. अस्तु. या सर्व गोष्टींचें प्रसंगवशात् विशेष वर्णन होईल आपआपल्या मतास प्रमाण दाखवण्याकरता वेदांतवादी लोक जीं वेदांतलि व उपनिषदांतील वाक्यें घेतात त्याचें आम्ही भाषांतर करून दाखवतों तैत्तिरीय आरण्यकांतील भृगूपनिषदांतलि हीं वाक्यें आहेत. "खरें ज्यापासून हीं भूतें उत्पन्न होतात, व ज्याच्यायोगानें उत्पन्न झालेलीं जगतात, ज्याप्रत जातात, ज्यामध्यें शिरतात, असें तें तू जाण. तें ब्रम्ह." "खरेंच आनंदापासून हीं भूतें उत्पन्न होतात, आनंदाच्या योगानेंच उत्पन्न झालेलीं जगतात, आनंदाकडे जातात, आणि (त्यात) शिरतात असें." आता हीं वाक्यें द्वैतसिद्धांतास विरुद्ध आहेत, पण त्याची ब्रम्हावसानमुक्ति मानून द्वैतवादी व्यवस्था करतात • याचा विचार पुढें करू.

which these existences are produced, by which (they when) produced subsist, to which they go (and which) they enter: that is these existences are verily produced from joy (Ânanda), by joy, (they when) produced, subsist, and go to and enter joy." Now, it will be seen that these texts do not support the Dvaita system of Vedânta which adjusts them by propounding a plan of what is called Brahmâvâsâna-Mukti consisting in getting into the closest influence of God. This will be explained in the sequel

सूत्राणि

शास्त्रयोनित्वात् ॥ ३ ॥

पदानि । शास्त्र योनिर्यस्य तत् शास्त्रयोनि । किंवा शास्त्रस्य योनि शास्त्रयोनि । तस्य शास्त्रयोनित्वम् ।

वाक्यार्थः । शास्त्रस्य वेदादे कारण ब्रह्म तस्माद् ब्रह्मलक्षण पूर्वसूत्रे निरूपितम् । अथवा शास्त्रमस्य ब्रह्मण प्रमाणम् । कथं शास्त्र ब्रह्मण प्रमाणमित्युत्तरस्मिन् सूत्रे दर्शयति शंकराचार्य । चातुर्वेदातमतानुरोधेनास्य सूत्रस्यार्थ कर्तुं शक्यते । द्वैतम तानुवादिनामर्थ सुलभ प्राप्नोति ॥ तत्र यदि शास्त्र ब्रह्मण प्र माण तर्हि तत् प्रमाणस्य किं रूप के प्रकाराश्चेति विवेक्तु युज्यते ॥ किं तर्हि तत्र प्रमाण । न तावत् प्रत्यक्ष । तद् द्विविध । इंद्रियस मव योगसभवचेति । इंद्रियसमवच बाह्यसभवमांतरसभवचे ति द्विविध । इत्येव रामानुज प्रमाण परीक्षते ॥ मध्वाचार्यस्तु पौराणिकेन श्लोकेन शास्त्र परिमिमीते । ऋगुयजु सामाथ र्वाश्च भारत पचरात्रक मूलरामायण चैव शास्त्रमित्यभिधीयत इति ॥

॥ उपनिषद्वाक्यान्यनुसंधेयानि ॥

॥ अस्य महतो भूतस्य निश्वसितमेतदृग्वेद ॥

३. शास्त्राचें कारण ब्रह्म, अथवा शास्त्र हें ब्रह्माचें प्रमाण आहे, म्हणून (ब्रह्म .स्वतंत्र आणि मुख्य.)

3. Brahma is the source of (all) the Shâstra or the Shâstra (supplies) the evidence of Brahma. Therefore, (Brahma is independent and principal).

३. दुसऱ्या सूत्रापासून ब्रह्माचा लक्षणविचार चालला आहे. ब्रह्म म्हणजे काय हें दाखविण्याकरतां हें सूत्र घेतात. या सूत्रांत मुख्य पद "शास्त्रयोनित्वात्" हें आहे त्याचा अर्थ शास्त्रयोनि या शब्दावरून शास्त्रयोनि हें समासघटित पद आहे. त्याचा दोन प्रकारचा अर्थ करतात. षष्ठीतत्पुरुष केल्यानें शास्त्राची योनि शास्त्रयोनि, आणि बहुव्रीहि समास केल्यानें शास्त्र ज्याची योनि आहे तें असे अर्थ होतात योनिशब्दाचा अर्थ कारण किंवा प्रमाण असा आहे वेदांतवादी असें म्हणतात कीं, शास्त्र म्हणजे ऋग्वेदादि ग्रंथ "या महाभूताचा जो उच्छ्वास तो ऋग्वेद" म्हणून ब्रह्म हें महाभूत आहे

3. The definition of Brahma is given in the second sûtra The nature of Brahma is explained in this sûtra The principal term in the sûtra is Shâstra-Yonitva which signifies either the Yonitva (source) of the Shâstra or the Shâstra being the Yonitva (evidence) of Brahma, because *Shâstra-Yoni* is a compound word which is analysed in two ways—the first is the *Sasthi*tatpurusa and the second sense is determined by the Bahuvrihi The term Yoni is said to have two meanings—source or evidence The Vedântins state sacred literature, such as the *Rig* Veda, to be the Shâstra, and quote the text—" *Rig*-Veda is the breath of the Great Being" Brahma, therefore, is the Great Being

सूत्राणि.

तत् तु समन्वयात् ॥ ४ ॥

पदार्थः । तत्=ब्रह्म । तु=न । समन्वयः=वेदवाक्यानि सङ्घीकृत्य तेषामनुगमद्वारेण विचार. ॥

वाक्यार्थः । न । समन्वयेन ब्रह्मलक्षण सिध्यति ॥

भावार्थः । पूर्वपक्षकारो ब्रवीति तृतीयसूत्रे यत् प्रमाण दत्त तन्न । यतो वेदवाक्यानां कर्मप्रकाशकत्वं न तु ब्रह्मप्रकाशकत्वमिति । आचार्य उत्तरयति तन्न । वेदवाक्यानां समन्वये कृते ब्रह्मलक्षण सिध्यतीति ॥

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

सदेव सौम्येदमग्र आसीत् । एकमेवाद्वितीयम् छां० उ०(६.२,१.) आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् । ऐत० (४.२१.) ॥ तदेतद् ब्रह्मापूर्वमनपरमनन्तरमबाह्यम् । श० (१४.६,८.)॥ अयमात्मा ब्रह्म सर्वानुभू । बृ० आ० (४.५.) ॥ ब्रह्मैवेदममृतं पुरस्तात् । मु० उ० (२.२,११.)॥ तत्त्वमसि । छा० उ० (६ ८,४.) ॥ आत्मा वा अरे द्रष्टव्यः । बृ० आ० श० (१४.५,६.) ॥ आत्माऽपहतपाप्मा । छा० उ० (८.७,३.) सोऽन्वेष्टव्य स विजिज्ञासितव्य । छा० उ० (८.७,३.) आत्मेत्येवोपासीत । शत० (१४.४,२,१८.) ॥ आत्मानमेव लोकमुपासीत । बृ० आ० (४.१५.) ॥ नित्य सर्वज्ञ सर्वगतो नित्यतृप्तो नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव. ॥ विज्ञानमानन्द ब्रह्म ॥ अशरीर शरीरेष्वनवस्थेष्ववस्थितम् । महान्तं विभुमात्मान मत्वा धीरो न शोचति । कठोप० (२.२२.) ॥ अप्राणो ह्यमना. शुभ्र. । मु० उ० (२.१,२.) असगो ह्यय पुरुष. । बृ० आ० (६.३,१५.)॥ अन्यत्र धर्मादन्यत्राधर्मादन्यत्रास्मात् कृताकृतात् । अन्यत्र भूताच्च भव्याच्च । कठ० उ० (२.१४.) ॥ भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसशया ॥ क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे । मु० उ० (२.२,८.) ॥ आनन्द ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कुतश्चन । (तै० ब्रा० उ० (९.) अभय वै जनक प्राप्तोऽसि । बृ० आ० (१४.६,१०)॥ तदात्मानमेवावेत् । अह ब्रह्मास्मीति । बृ० आ० (४.५.) ॥ तत्र को मोह. क शोक एकत्वमनुपश्यत । ईशा० (१.७.) ॥ तद्वैतत् पश्यन्नृषिर्वामदेव प्रतिपेदेऽह मनुरभव सूर्यश्च । ऋ० (४.२६.) बृ० आ० (४.१०.)॥ त्व हि न पिता योऽस्माकमविद्याया पर पार तारयसि। प्र० उ० (६.८.) श्रुत ह्येव मे भगवद्दृशेभ्यस्तरति शोकमात्मविदिति । सोऽह भगव शोचामि त मा भगवाञ्छोकस्य पार तारयतु । छा० उ० (७.३.) ॥ तस्मै मृदितकषायाय तमस पार दर्शयति भगवान् सनत्कुमार । छा० उ० (७ २६.) ॥ यथानन्त वै मनोऽनन्ता विश्वे देवा अनन्तमेव स तेन लोक जयति । बृह० (५.१,९.) ॥ मनो ब्रह्म । छां० उ० (३.७.) छा० उ० (७.२,३)॥ आदित्यो ब्रह्म । छा० उ० (३ १९.) ॥ अयमात्मा ब्रह्म । मु० उ० (२.२,८.) ॥ ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति॥ अन्यदेव तद्विदि

तादयोऽविदितादधि । के० उ०(३.)॥ येनेदं सर्वं विजानाति तं केन विजानीयात् । बृ० आ० (१४.७,३,२५.) ॥ यद्वाचाऽनभ्युदितं येन वागभ्युद्यते तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते । के० उ० (१.४.) ॥ यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः । के० उ० (२.३.) ॥ अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् । के० उ० (२.३.) ॥ न दृष्टेर्द्रष्टारं पश्येर्न श्रुतेः श्रोतारं शृणुया न विज्ञातेर्विज्ञातारं विजानीयाः । बृ० आ० (१४.६,१.) ॥आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः । क० उ० (३.४.) ॥ एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा । कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च । श्वे० (६.११.) ॥ स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरं शुद्धमपापविद्धम् । ई० उ० (१.८.) यस्यै देवतायै हविर्गृहीतं स्यात् तां ध्यायेद्वषट् करिष्यन् ॥ इदं सर्वं यदयमात्मा । शा० बृह० उ० (१४.६,७.) ॥ यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत् तत् केन कं पश्येत् तत् केन कं विजानीयात् । विज्ञातारमरे केन विजानीयात् । बृ० आ० (७.३,२५.) ॥ आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः । किमिच्छन् कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् । बृ० आ० (१४.७,१६.) ॥ स एष नेति नेत्यात्मा । बृ० आ० (१४.६,६.) ॥ पुरुषान्न परं किञ्चित् सा काष्ठा सा परा गतिः । क० आ० (१.३,११.) ॥ तन्त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि । बृह० (५.९,२६.)॥ प्रजापतिरकामयत प्रजायेयेति । ऐ० ब्रा० (९.३२.)

४. तें नव्हे. समन्वयावरून (ब्रह्माचें ज्ञान होतें.)

४. या सूत्रात विचार करण्याजोगा शब्द समन्वय हा आहे निरनिराळीं वाक्यें घेऊन, तीं एकत्र मांडून, त्यांचा परस्पर संबंध पाहून त्यापासून ज्या पद्धतीनें अनुगम म्हणजे व्यापक सिद्धांत काढावयाचा तिचें नाव समन्वय आहे या सूत्राचीं दोन दलें पडतात-एक, तसें नव्हे. "तसें नव्हे" म्हणजे काय? "कोणी पूर्वपक्षकार असें म्हणतात कीं –"वेदा

4 Not that From collation (of Vaidika passages), (Brahma is to be known)

4 The important term in the sūtra is *Samanvaya* When different passages from some recognized literature are collected and placed side by side, when their relation to one another is examined, and when a generalization is based on them, such a process is called Samanvaya which we have rendered into English by collation. The sūtra consists of two parts The first

क्रियापुन कर्म करावें असें सिद्ध होतें वेदादिकांत ब्रह्माचें लक्षण नाहीं." त्यास बादरायणाचार्य उत्तर देतात कीं, "तसें नव्हे वेदांतरात ब्रह्माचें लक्षण आहे" दुसऱ्या दलामध्यें या उत्तराचें कारण दिलें आहे तें असें कीं, वेदवाक्याचा समन्वय केल्यानें त्यात ब्रह्मलक्षण आहे असें सिद्ध होतें. ज्या वाक्याचा समन्वय करावयाचा त्याचें आम्हीं येथें भाषांतर देतों "हे सौम्य, सत् हेंच पूर्वीं होतें, एकच अद्वितीय" "अरे, आत्मा हें एकच पूर्वीं होतें." "ते हे ब्रह्म अपूर्व, असें दुसरें नाहीं ज्याला आतल नाहीं, ज्याला बाहेरचें नाहीं" 'हा आत्मा ब्रह्म सर्वांचा अनुभव घेणारा" "पूर्वीं पासून हें न नाश पावणारें (अमृत) ब्रह्मच." "तें तू आहेस" "अरे बा, आत्मा पहायाचा, ऐकायाचा चिंतायाचा, आणि त्याचा निदिध्यास करायाचा" "ज्यानें पापरूप पुरुषाचें हनन केलें आहे, असा जो आत्मा तो सोधायाचा, तो जाणण्याची इच्छा करायाची" 'आत्म्याचा अशीच उपासना करावी" "आत्मलोकाचीच केवळ उपासना करावी" "नित्य, सर्वज्ञ, सर्व स्थळीं असणारा, नित्य तृप्त ज्याचा स्वभाव नित्य शुद्ध, नित्य जागृत, नित्य मुक्त" "विशेष ज्ञान आणि आनंद (हें) ब्रह्म." "शरीराच्या ठिकाणीं ज्याला शरीर नाहीं तें, आणि न रहाणाऱ्या पदार्थामध्यें रहाणारा, महान्, व्यापक (असा) आत्म्याचें मनन करून ज्ञा-

refutes those philosophers who state that the Vedas sanction only the performance of sacrificial rites, and that they do not make any mention of Brahma. In the first part of the sûtra, Bâdarâyana remarks that the philosophers are wrong and emphatically asserts—*not that*. The second part of the sutra supplies the ground of the first statement by mentioning that the Vedas can be proved to explain Brahma by the process of Samanvaya or *collation*. We will translate some of the passages to be collated "Oh Soumya, *the sat*—*the existing* or the true—alone first was' "Oh, Âtmâ or spirit first was" "This Brahma has no equal. it is unprecedented (apûrva). it has no inside and no outside" 'Such a spirit is *the* Brahma which experiences all things '"This Brahma is from the beginning free from decay (Amrita)" "It is thou" "Oh, the spirit is indeed to be seen, to be heard, to be meditated upon, and to be constantly contemplated ' "That which has killed personal sin (Pâpmâ)—such spirit is to be sought, and its knowledge is to be desired" "The spirit is only to be adored thus.' 'The region of the spirit only is thus to be adored" "Eternal omniscient, omnipresent, ever satisfied, naturally ever pure, ever awakened, ever free" "Special knowledge and joy (is) Brahma" "In a body without a body, existing in things not to exist, great, engrossing—(such) a spirit when the wise contemplate they cease to be sorry" 'He who does not breathe and has no mind, and who is white, (pure)" "Who is above sensual appetites-He is the *Person* (God)'

नीं पुरुष खेद मानीत नाहींत" "ज्याला प्राण नाहीं (श्वासोच्छ्वास नाहीं.) ज्याला मन नाहीं, जो शुभ्र" "ज्याला (विषयादि) इच्छा नाहीं तो हा पुरुष" "धर्मापासून दुसरीकडे, अधर्मापासून दुसरीकडे, या केलेल्या न केलेल्यापासून दुसरीकडे, भूतकालापासून दुसरीकडे, भविष्यकालापासून दुसरीकडे." "हृदयांतील गाठ तुटते, सारे संशय फिटतात, आणि तो दूरचा आणि जवळचा पाहिला असता, त्याचीं कर्में सरतात." "ब्रह्मानंद जाणणारा कशालाहि भीत नाहीं" "हे जनक, तुला खास अभय प्राप्त झालें" "मी ब्रह्म आहे असें (त्यानें) आत्म्यालाच जाणलें" "तेथें काय मोह, काय शोक? एकपणा पाहता झाला" "असें पाहून वामदेव ऋषीनें असें प्रतिपादन केलें (कीं) मी मनु झाला, मी सूर्य झालों" "जो (तू) आमच्या अज्ञानातून पैल तीराला तारून नेतोस, (तोच) तू आमचा पिता." "आत्म्याला जाणणारा शोकांतून तरतो, असें मीं आपणासारख्यापासूनच ऐकलें आहे खर तो मी हे भगवान्, शोकांत आहें म्हणून मला भगवान् शोकांतून पार नेओ" "ज्यानें पापाचें मर्दन केलें आहे, त्याला तमोरूप अंधकाराच पैल तीर दाखवितात भगवान् सनत्कुमार." "जसें मनच अनंत, विश्वेदेव अनंत तो तेणेंकरूनच अनंत लोक जिंकतो." "मन ब्रह्म" "आदित्य ब्रह्म." "मी ब्रह्म आहें" "हा आत्मा ब्रह्म" "ब्रह्म जाणणा-

"He who is beyond a religious duty, beyond irreligiousness, beyond what is done or not done, beyond the past, and beyond the future" "The knot in the heart is broken all doubts are torn away and all activity ends when he—the distant and the near—is seen" "He who knows the joy of spirituality (Brahma) is not afraid of any body" "Oh, Janaka, thou hast, indeed, secured freedom from fear" "He knew that he was Brahma' "There what delusion? there what sorrow? He saw oneness' 'Seeing this, the Risi Vâmadeva states —I became once Manu, once the sun' Thou art our father who carries us accross (the stream of) ignorance.' "I have heard from great persons like you that he who knows the spirit indeed gets over sorrow I grieve, Oh Bountiful May the Bountiful carry me over from sorrow' 'He who has destroyed Sin, to him the other shore (of the stream) of darkness is shown by Sanat-Kumâra.' "As thought is infinite the Vishvedevas are infinite, he overcomes the infinite regions in this way" "Thought is Brahma" "The sun is Brahma.' "I am Brahma." "This spirit is Brahma" "It (Brahma) is distinct from the known and the unknown.' "How is that to be known by which all this is known?' "That which is not described by speech, (but) which specially describes speech —know that Brahma" That which is adored by the people is not this "He who (does not pretend to) know it, knows it He who (pretends to) know it, knows it not" "The knowing (one) knows it not the unknowing

सूत्राणि.

ईक्षतेर्नाशब्दम् ॥ ५ ॥

पदानि । ईक्षतेः, न, अ शब्दम् ॥

वाक्यार्थः । ईक्षधातुप्रयोगात् तद् ब्रह्म शब्दाविषयं नास्तीति न ॥

भावार्थः । पूर्वपक्षकारो ब्रवीति केवल निर्गुणं ब्रह्म । अतस्तन्न शब्दवाच्यम् । निर्वाणावस्थायां शून्यं तच्चक्षुन्येत्वनानुभूयते । यत् माध्यमिकानां बौद्धानां मतं तत् सत्यमिति ॥ अत्राचार्यो ब्रवीति । वेदवाक्येषु ईक्षधातोः प्रयोगाः प्राप्नुवन्ति तस्माद् ब्रह्म शब्दविषयं भवतीति ।

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

तदैक्षत बहु स्यां प्रजायेय । तत्तेजोऽसृजत । छां० उ० (६.२.) ॥ आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् नान्यत् किञ्चन मिषत् स ऐक्षत लोकान्नुसृजा इति । स इमाल्लोकानसृजत । ऐ० आ० (४.२१.) ॥ स ईक्षाञ्चक्रे स प्राणमसृजत । यः सर्वज्ञः सर्वविद् यस्य ज्ञानमयं तपः ॥ तस्मादेतद् ब्रह्म नामरूपमन्नं च जायते । मुं० (१.९.) ॥ न तस्य कार्यं करणं च विद्यते न तत् समश्चाभ्यधिकश्च दृश्यते । परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च । श्वे० (६.८.)॥ अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः । स वेत्ति वेद्यं न च तस्य वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम् । श्वे० (३.१९.) ॥ नान्योतोऽस्ति द्रष्टा नान्योतोऽस्ति विज्ञाता । बृ० आ० (७.२३.) ॥ तत्तेज ऐक्षत । ता आप ऐक्षन्त । छां० उ० (६.२.)

त्या प्रत्यक्ष होता " " जाणलेल्या पासून ते दुसरेंच, न जाणल्यापासून तें निराळें " " ज्यानें हें सर्व आम्ही जाणतों, ते कशानें जाणावें ?" ' ज वाचेनें वर्णिलें नाहीं, ज्यानें वाचेच विशेष प्रगट होतें, तच ब्रह्म तू जाण " ज्या साक्षी है और उपासना करतात ते है नव्हे " ज्यानें (तें) जाणलें नाहीं

(one) knows it " "Do not see that which sees the seen do not hear that which hears the heard. Do not know that which knows the known " ' He enjoys that to which the spirit, the senses and mind are joined—this is what the learned say " " One God is mysteriously seen in all that exists, omnipresent, the inner spirit of all that exists, the president of all actions (religious

५. पहाणें या धातूचा प्रयोग आहे, म्हणून ब्रह्म अमुक असें शब्दानें वर्णितां येतें.

5. Because (in sacred texts) the verbal root *to see* occurs, Brahma is not indescribable in words.

ज्यानें (तें) जाणलें. आणि ज्यानें (तें) जाणलें, तो तें जाणीत नाहीं." "जाणणाराला तें शकत नाहीं, न जाणणाराला तें शकत आहे " "पाहिल्याचें पहाणारें (असें तें) पाहूं नको, ऐकल्याचें ऐकणारें (असें तें) ऐकूं नको जाणल्याचें जाणणारें (असें तें) जाणूं नको" "आत्मा, इंद्रिय, आणि मन यानीं युक्त झालेलें तें तो भोगणारा, असें पंडितजन म्हणतात." "एक देव सर्व भूतमात्राच्या ठिकाणीं गुप्त, सर्वव्यापी, सर्व भूताचा अंतरात्मा, सर्व कर्माचा अध्यक्ष, सर्व भूतांचें अधिष्ठान, साक्षी, जाणणारा (दुसऱ्याच्या साहाय्यावाचून) एकटा आणि निर्गुण." "तेजस्वी, शरीररहित, न तुटलेलें, स्नायुरहित, शुद्ध पापानें न पेंधलेलें असें तो सर्व व्यापिता झाला" "ज्या देवतेला हवि दिला असतो, त्या देवतेचें वषट्कार करून ध्यान करावें" "हें सर्व जें हा आत्मा" "जेथें झाला सर्व आत्माच झाले, मग कोणीं कोणाला पहावें, आणि कोणीं कोणाला जाणावें?" "अरे, विशेष जाणणाराला कोणीं जाणावें?" "मी हा आहें असें जर कोणीं पुरुषानें आपल्याला जाणलें, (मग) तो कशाची इच्छा करून कोणाच्या सुखाकरिता शरीराला संताप करील?" "तो हा नव्हे, तो हा नव्हे, असा आत्मा जाणावा" "पुरुषाहून दुसर

duties or rites), the substratum of all that exists, omniscient, knower, one alone without any second (to aid him)" "Of (excessive) light, without a body, not broken, without flesh (muscles), pure, not touched by sin, such he occupied the whole" "All this is the spirit" "That deity is to be contemplated, to whom an offering with Vasatkâra is made." "There where to the thinker (to him) all is spirit, there who is to see whom? And who is to know whom? Oh who is to know him who knows specially" "If a person knows such a spirit I am—then for whose pleasures and from what desires will he tease his body? The spirit is to be known thus—that is not it that is not it There is nothing except the Person that is the limit—that is the highest state' 'I ask about the Person described in that Upanisad.' Prajâpati desired that he should produce In such texts the Upanisad literature specially abounds When they are collated, Brahma can be defined European scholars specially use the method of collating passages or facts according as they have to fix the interpretation of a passage or to generalize the facts observed Because the argument based on samanvaya or collation is advanced in the sûtra against those who state that Brahma is not mentioned in the Vedas, the sûtra is historically important It may be observed that the starting point of the Upanisad or ra-

कांहीं नाहीं. ती सीमा, ती उत्तम गति" "त्याच उपनिषदांत वर्णिलेल्या पुरुषा विषयीं मी विचारतों" "प्रजापतीनें इच्छा केली कीं मी प्रजा उत्पन्न करा व्या" अशीं उपनिषदांतील व वेदांतील अनेक वाक्यें आहेत तीं एका ठिकाणीं आणलीं म्हणजे समन्वय होतो, आणि ब्रह्माचें लक्षण बांधता येतें वाक्यांचा किंवा अर्थाचा समन्वय करण्याच्या पद्धतीचा उपयोग युरोपी पंडितास उत्तम करता येतो, म्हणून त्यांच्या शास्त्राचें वैभव, त्यांच्या ऐश्वर्याचें वैभव, आणि मानसिक वैभव आहे हें आमच्या लोकानीं लक्षांत ठेवावें

५. माध्यमिक म्हणून एक बौद्ध लोकाचा संप्रदाय असे त्या संप्रदायाचे लोक असें म्हणत कीं, जेव्हा मनुष्याला निर्वाणावस्था प्राप्त होते तेव्हा सर्व कांहीं शून्यच शून्य मग ब्रह्म म्हणजे अमुक असें म्हणायाला जागा राहिली कोठें? असें पूर्वपक्षाचें म्हणणें पडलें त्यावर बादरायण असें म्हणतात कीं असें नव्हे वेदांत आणि उपनिषदांत ब्रह्माचें निरूपण आहे तें निरूपण करताना पहाणें या धातूचा व तत्संबंधी क्रियेचा प्रयोग आढळतो ज्ञानावांचून पहाणें कसें संभवेल? याकरता अनंत ज्ञान असें जें ब्रह्माचें निरूपण आहे तें सयुक्तिक आहे। निरनिराळ्या वेदांतसिद्धांताचा या सूत्राविषयीं वाद नाहीं, कारण तें सर्वांस सारखेंच साधक आहे आता, जीं वेगळ्यें आम्हीं संस्कृतप्रकरणीं दे-

ther the Âranyaka literature is totally different from the Vedas consisting of Sanhitâs and Brâhmanas The Âranyakas inaugurate a new social polity

5 The Mâdhyamika school of Buddhists is well known It states that any man while living and *in the state of emancipation* called Nirvâna sees every thing *to be non-entity (shûnya)* Hence Brahma can not be described in words this is the way the opponent argues Bâdarâyana in reply states that it is not so. Brahma is described in the Vedas and Upanisads, and in this connection, the verbal roots like *to see* are used in reference to Brahma There can be no seeing without any knowledge Hence the description that Brahma possesses infinite knowledge is reasonable The different schools of Vedântins interpret this sûtra in the same way, because *it equally supports their systems* Now we will translate the texts we have quoted in the Sanskrit portion. 'That (so) saw (that it) might be many and be born That created light.' "Oh, one spirit indeed was in the beginning nothing else moved he *thought (saw)—let me create regions* He created these regions" He saw that he (had) created life (breath) " (He) who is omniscient, who knows every thing, whose austerity (tapas) is full of knowledge, from him this Brahma and food having a form and a name are produced" He has no body and no senses. There nothing is seen to match or excel him. His power is heard (to be) excellent and varied (His) knowledge, power, and activity (are) natural (Though) without hands

श्रुती आहेत, त्यांचें भाषांतर. "तें (असें) पहातें झालें (कीं मी) बहु व्हावें, आणि उत्पन्न व्हावें तें तेज उत्पन्न करतें झालें" "अरे, एक आत्मा हेंच पूर्वी होतें गतिविशिष्ट दुसरें कांहींच नव्हतें" "तो पहाता झाला (कीं) लोक उत्पन्न करूं तो हे लोक उत्पन्न करता झाला तो विचार करता झाला, तो प्राण उत्पन्न करता झाला" "जो सर्वज्ञ, जो सर्व जाणणारा, ज्याचें ज्ञानयुक्त तप, त्यापासून हें ब्रह्म नामरूप रूपवान् आणि अन्न होतें" "त्याला शरीर किंवा त्याला इंद्रिय नाहीं त्याच्या सारखें किंवा त्याच्यापेक्षा अधिकहि कांहीं दिसत नाहीं, त्याची उत्तम आणि नानाप्रकारचीच शक्ति असें ऐकतें, आणि त्याच ज्ञान, त्याचें बल, आणि त्याचे व्यापार स्वभाविक च" "हात न धरता धरतो, पाय नसून वेगवान् आहे, नेत्र नसून पहातो, आणि कान नसून ऐकतो, जाणीत जागतो, त्याला जाणणारा नाहीं, त्याला पंडित मूळ पुरुष आणि महा (पुरुष) म्हणतात" "त्याशिवाय दुसरा पहाणारा नाहीं, याशिवाय दुसरा जाणणारा नाहीं" "तें तेज पहातें झालें" "तीं जल पहातीं झालीं" या वेदवाक्या वरून ब्रह्माचें निरूपण उपनिषदादि प्रधान कसें आहे, हें वाचकांच्या लक्षात येईल, व हीं वचनें द्वैतसिद्धांतास साधक आहेत कीं, अद्वैतसिद्धांतास साधक आहेत. हेंहि कळेल सांख्यशास्त्रामध्ये पुरुष आणि प्रकृति असे पदार्थ मानले आहेत रजोगुण, तमोगुण, आणि स

he catches (though) without legs, he is swift though without eyes, he sees (though) without ears, he hears He knows the knowable None knows him. They call him the first—the Person—the great" "There is none that knows or sees except him That light saw those waters saw" Our readers will easily perceive how Brahma is described in the Upanisads and determine for themselves whether the texts translated support the doctrine of Dvaita or Advaita philosophy The Sânkhya system of philosophy recognizes a duality—the Person or God and the original (Prakriti) which consists in the equilibrium of the three properties of *light, darkness and truth* (rajastamassatva) The original Prakriti is seen in two conditions—the distinct and the indistinct—the former as seen in all phenomena and the latter—in their substratum The distinct nature (Prakriti) is phenomenal the indistinct is noumenal The last is called the Great or the Principal The Sânkhyas state that the Great is *Brahma*. *Badarâyana refutes this* doctrine of the Sânkhyas. Hence Brahma is not nonentity as the Madhyamikas state nor is it noumenon or the original indistinct Prakriti The term Brahma points to *the highest Person*, the Creator of the world Our readers will be easily able to collate for themselves the texts we have quoted and translated

सूत्राणि.

गौणश्चेन्नात्मशब्दात् ॥ ६ ॥

पदानि । गौण, चेत्, न, आत्म शब्दात् ॥

वाक्यार्थः । ईक्षधातुप्रयोगप्रतिपादितो य स गौण इति न वक्तव्यम् । कुत । तत्सम्बन्धेनात्मशब्दप्रयोगो वर्तते ॥

भावार्थ । पूर्वपक्षकारो ब्रवीति । सत्य । ईक्षधातुप्रयोगप्रतिपादितो यो वेदवाक्येषु वर्तते स तु गौण । अतस्तत्प्रतिपाद्य ब्रह्मापि गौणमिति । आचार्यो ब्रवीति । यत्पूर्वपक्षकारेणोक्त तन्न न । किं तर्हि । ब्रह्म मुख्यम् । कुत । ब्रह्म आत्मा इत्युक्तत्वादिति ॥

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

सदेव सोम्येदमग्र आसीत् छा० उ० (६.१.) । तदैक्षत । तत्तेजोऽसृजत । छां० उ० (६.२.) सेयं देवतैक्षत । हन्ताहमिमास्तिस्रो देवता अनेन जीवेनात्मनाऽनुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणि । छां० उ० (६ ३,२.) स य एषोऽणिमा । एतदात्म्यमिदं सर्वं तत् सत्य स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो । छा० उ० (६.८,७.) ॥

त्रिगुण हे सम असले म्हणजे त्या स्थि
तीस प्रकृति असें म्हणायाचें ही प्रकृति
दोन प्रकारें अनुभवास येते जडात्मक
जी प्रकृति दिसते ती व्यक्त आणि या
व्यक्त प्रकृतीस आधार जी ती अव्यक्त
प्रकृति त्या अव्यक्त प्रकृतीस प्रधान किंवा
मुख्य म्हणतात सांख्यपंडित ब्रह्म म्हणजे
सांख्यमतांतील प्रधान असें प्रतिपादन करू
लागतात ईहि सांख्य पंडितांचें म्ह
णणें बरोबर नाहीं असें वरील उपनिष
द्वाक्यावरून वाचकांस कळेल तेव्हां
बोध्य मताचे भाष्यामिर सांप्रदायाप्रमाणें
ब्रह्म म्हणजे मुख्य नव्हे पुन, स्रा

६. गौण म्हणावा तर नाहीं. (कां?) आत्मशब्दाचा प्रयोग आहे म्हणून.

6. He If subordinate, no; because of the term spirit (being used in reference to him)

एयमनाप्रमाणें अचेतन, प्रधान, किंवा प्रकृति ब्रह्म नव्हे असें सिद्ध होतें. ब्रह्मशब्दाचें पर्यवसान पुरुषोत्तम किंवा परमेश्वर जगत्कर्ता यातच होतें या गोष्टीचा विचार जीं वेदवाक्यें आम्हीं दिलीं आहेत, त्याचा समन्वय करून वाचकांनीं करावा

६. पहाणें या धातूच्या योगानें ज्याचें निरुपण होतें तो गौण आहे, मुख्य नव्हे, असें सांख्यपंडितादि प्रतिपादन करतात तें जमा धरून बादरायण उत्तर देतात कीं —"पहाणें या धातूचा ज्याच्या संबधानें प्रयोग आहे तो गौण नव्हे, तो मुख्यच आहे कारण वेदात आणि उपनिषदात त्यास आत्मा असें म्हटलें आहे" या सूत्राचीं दोन दलें पडतात. प्रथम दलात पूर्वपक्षकाराचें म्हणणें वर्णिलें आहे दुसऱ्या दलात बादरायणानीं त्यास उत्तर दिलें आहे या वादाची सरणी वाचकाच्या लक्षात यावी म्हणून इतकें सांगितलं म्हणजे पुरे कीं प्रत्येक सूत्रीं बौद्ध सिद्धांतास किंवा सांख्यसिद्धांतास अनुलक्षून त्याचें खंडन होईल इतक्या पुरतें परमेश्वराच्या नव्या नव्या गुणाचें बादरायण निरुपण करतात या निरुपणाचा आधार काय म्हटला तर वेदांतील आणि उपनिषदांतील वाक्यें. असा कांहीं वाक्यांचें आम्ही भाषांतर करून दाख

6 The Sânkhyas state that he to whom the verbal roots like *to see* point is only subordinate and is not the principal agent, so far as the creation, sustenance and government of the world are concerned In this sûtra Bâdarâyana seeks to refute them, and states that he to whom the verbal root *to see*, as used in the Upanisads, points, is principal, because he is also styled the spirit in the Vedas and Upanisads The sûtra consists of two parts The first part cites the statement of the Sânkhya opponent. That the method of this controversy may be perceived, it is necessary to state that in every sûtra Bâdarâyana mentions such additional attributes of Brahma as are not recognized by the Buddhists or the Sânkhyas and builds his arguments on them, but the statement of the attributes themselves is based on the texts of the Vedas and Upanisads. Thus in one sense, the question comes to turn on the theory and principles of interpretation. We will now translate a few texts already quoted in the Sanskrit portion.

Oh Somya, this *sat* (existing or real), was in the beginning it saw it created light.' "That this deity saw ' "Ha! having entered these three deities by means of this life—this spirit, I develop a form and a name." "That this which is the minuteness—this is the spirit—all this, that is truth—that is

सूत्राणि.

तन्निष्ठस्य मोक्षोपदेशात् ॥ ७ ॥

पदानि । (न गौणम्) तत्-निष्ठस्य, मोक्ष-उपदेशात् ॥

पदार्थः । तस्मिन् (ब्रह्मणि) निष्ठः=तन्निष्ठः तस्य ॥ मोक्षोपदेशात्= मोक्षनिरूपणात् ॥

भावार्थः । ये ब्रह्मनिष्ठाः पुरुषास्ते मोक्षं प्राप्नुवन्तीति वेदे सिद्धान्तितम् । कथं तर्हि सचेतनस्य पुरुषस्याचेतनाप्रधानेन ब्रह्मणा सम्बन्धो भवितुमर्हति । तस्माद् ब्रह्म चेतनं मुख्यं च । न गौणम् ॥

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

तत्त्वमसि श्वेतकेतो । छां० उ० (६.१२,३.) ॥ आचार्यवान् पुरुषो वेद । तस्य तावदेव चिरं यावन्न विमोक्ष्ये अथ सम्पत्स्य इति । छां० उ० (६.१८,२.) ॥

त्तितों. "सौम्य, सत् हेंच पूर्वी होतें, तें पहातें झालें, तें तेज उत्पन्न करतें झालें " "तीही देवता पहाती झाली" "अरे हे या जीवात्म्यानें या तीन देवतामध्यें मी शिरून नाम आणि रूप स्पष्ट करतों " "तो हा जो अणिमा, हें आत्मस्वभि (आत्म्य) हें सर्व, तें सत्य, ता आत्मा अरे, श्वेतकेतु, म्हणून तू आहेस " अशा या उपनिषद्वाक्यामध्यें ब्रह्मास आत्मा म्हटलें आहे त्यावरून ब्रह्म म्हणजे परमेश्वर, तें गौण नव्हे, मुख्य आहे म्हणजे प्रकृतीचें वाचक नव्हे, परमेश्वराचें वाचक आहे

spirit. Oh Shvetaketu, then thou art" Thus it will be seen that in these texts, Brahma is characterized as the spirit. It is, therefore, not the name of noumenal nature which has not the power of creating, and which is subordinate, but of God himself.

७. त्याच्या ठायीं जो निष्ठ त्याला मोक्ष प्राप्त होतो अशा वर्णनावरून, (ब्रह्म गौण नव्हे).

७. सूत्रांत तन्निष्ठ असें पद आहे, त्याचा अर्थ ब्रह्मनिष्ठ असा समजावा ब्रह्मनिष्ठ पुरुषाचा मोक्ष होतो असें जर प्रतिपादन आहे, तर सचेतन जीवाचा मोक्ष अचेतन प्रकृतीच्या हातून कसा संभवेल? याकरितां ब्रह्म म्हणजे प्रकृति म्हणणें संभवत नाहीं. अशा रीतीनें बादरायणाचार्यांनीं बौद्धसांख्यमतानुयायिपण्डितांस उत्तर दिलें हें उत्तर विचार करण्याजोगें आहे कारण वेदवाक्याची व्यवस्था करतांना निरनिराळ्या स्थलीं ब्रह्माचें निरूपण कसें केलें आहे, हें पाहून ब्रह्मपदाचा अर्थ बसविला पाहिजे. ब्रह्मनिष्ठ झाला म्हणजे मोक्ष मिळतो असें या सूत्रांत ब्रह्मसंबन्धानें विशेष वर्णन झालें आहे आतां उपनिषदांतील वाक्यांचें भाषांतर "तो आत्मा आहे हे श्वेतकेतु, म्हणून तूं आहेस." "ज्याला गुरु (आचार्य) आहे तो पुरुष जाणतो. जोंपर्यंत मी चिर न मुक्त होईन मग संपादीन तोंपर्यंत ते (त्याचें)" या उपनिषद्वाक्यावरून ब्रह्मनिष्ठाला मुक्ति प्राप्त होते हें कळतें

7. From a Vaidika precept, that emancipation (is) his who is devoted to it (Brahma)

7. The term—Tannistha—is used in the sûtra It signifies one who is entirely devoted to that which represents Brahma Because a person who is devoted to Brahma is emancipated, and because a person is a rational and an intelligent being, therefore, a rational and an intelligent being can not be emancipated by an irrational and unintelligent agency But the noumenon or the original Prakriti is irrational and unintelligent. Hence it is fair to argue that Brahma is not Prakriti. Bâdarâyana thus attempts to refute the Sânkhya and Buddhistic philosophers. The reply deserves to be considered, because the sense of the term is to be fixed by collating passages as they occur in the ancient Sanskrit literature recognized as sacred The argument is wholly based on collation of passages as enunciated in the fourth sûtra which opens the controversy Brahma is characterized in this sûtra as the emancipator of those who are devoted to it. We will translate the texts as usual. "He is the spirit." "Oh Shvetaketu, then thou art" "He who has a preceptor knows (this)" "So long as I am not permanently emancipated, (it is his), then I will obtain it (Brahma)" Such texts in the Upanisads are quoted to show that they mention the Creator of the world, and the emancipation of man

सूत्राणि.

हेयत्वावचनाच्च ॥ ८ ॥

पदार्थः । (न गौणम्) हेयत्वं=त्याज्यत्वम् । अवचनात्=अनिरूपणात् ॥

वाक्यार्थः । त्याज्यत्वेन ब्रह्मणो निरूपणं कुत्रापि नास्ति।अतस्तत् प्रधानम्

भावार्थः । यद् गौणं तत् त्याज्यम् । यन् न त्याज्यं तन् मुख्यम् । तस्माद् ब्रह्म मुख्यम् ॥

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

तमादेशमप्राक्ष्यो येनाश्रुतं श्रुतं भवत्यमतं मतमविज्ञातं विज्ञातमिति । कथं नु भगवः स आदेशो भवतीति । यथा सोम्यैकेन मृत्पिण्डेन सर्वं मृण्मयं विज्ञातं स्याद् वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यं । छां० उ० (६.१,४.) एवं सोम्य स आदेशो भवतीति । छां० उ० (६.१,६.) ॥ तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुञ्चथ अमृतस्यैष सेतुः । मुं० उ० (२.५.) ॥

स्वाप्ययात् ॥ ९ ॥

पदानि । (न गौणम्) स्व-अप्ययात् ॥

पदार्थः । स्व = आत्मनि । अप्ययः = गमनम् ॥

वाक्यार्थः । आत्मनि पुरुषो गच्छति तस्माद् ब्रह्म न गौणम् ॥

भावार्थः । पूर्वपक्षकारो ब्रवीति ब्रह्माचेतनं गौणंचेति । तन् न । कुतः । स्वानुभवात् । पुरुष सुषुप्त्यवस्थायामात्मसुखं प्राप्नोति । कथम् । आत्मनि निलीयते तस्मादात्मा चेतन इत्यद्वैतवादिनां सिद्धान्तः । द्वैतमते तु स्वशब्देन परमात्मा गृह्यते । परमात्मन्येव लीयत इति वेदे निरूपणात् ॥

न हि गौण आत्मनि निर्देशस्य (ब्रह्मण) स्व । इति भाष्य ॥

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

यत्रैतत् पुरुष स्वपिति नाम सता सोम्य तदा सम्पन्नो भवति स्वमपीतो भवति तस्मादेनं स्वपितीत्याचक्षते स्व ह्यपीतो भवति। छां० उ० (६.८,१.)॥ स वा एष आत्मा एवायपुरुष हृदि तस्यैतदेव निरुक्त हृदयम् छां० उ० (६.१०,३.) । अय पुरुषः प्राज्ञेनात्मना सम्परिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नान्तरम् । बृ० आ० (३.२१.) ॥ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते । बृ० आ० (७.१.) ॥

८. पुनः, त्यजावें असें ब्रह्माचें निरूपण कोठेंच नाहीं, (म्हणून ब्रह्म मुख्य आहे).

8. Again, because of there being no statement or text (which speaks of Brahma) as deserving to be abandoned, (Brahma is principal and intelligent)

९. आपल्या स्वतःचे ठायीं आत्मा जातो, म्हणून ब्रह्म गौण नव्हे.

9 The spirit enters itself, therefore, Brahma is not subordinate (nature)

८ जे मुख्य तें प्रथम स्वीकार करण्याजोगें असतें हे सांगावयास नको वेदवाक्याची ओढाताण करून ब्रह्म म्हणजे प्रकृति असा अर्थ घेऊन तें गौण म्हणणें समंजस नाहीं उपनिषद्वाक्याचे भाषांतरावरून सूत्रार्थ अधिक स्पष्ट होईल "अरे, आत्मा काय असा प्रश्न तूं विचारलास ज्याच्या योगानें न ऐकलेलें ऐकण्यांत येतें, न मनात आलेलें मनात येतें, न जाणलेलें कळतें (तो)." "अहो भगवान्, ज्याचा उपदेश केला तो कसा असतो? हे सोम्य, जसा एका मातीच्या गोळ्यानें सर्व मातीचें म्हणून केलेलें जें तें कळतें, वाणीनें ठरलेलें (आरंभलेलें) जें नाव, तो विकार (उगीच), मृत्तिकाच काय ती खरी, याप्रमाणें, हे सोम्य, ज्याच्या विषयीं उपदेश केला आहे तो आत्मा भासला" "त्याच एकाला जाणा, आणि दुसऱ्या गोष्टी सोडून द्या अमृतत्वाचा हा पूल आहे."

8 It is not necessary to state that what is principal is to be first accepted in preference to what is merely subordinate It is not proper to strain Vaidika passages and their interpretation, to force the term Brahma into signifying Prakriti or nature and then to assert that Brahma as used in the Upanisad literature is the Prakriti as recognized by the Sânkhyas The translation of the passages themselves of the Upanisad literature will fully elucidate the sûtra. "Oh, thou hast asked the question—what is the spirit? It is (that) by which the unheard of is heard, the unperceived is perceived, (and) the unknown is known.' "Oh Lord, how is that about which instruction is given? Oh, Somya, as a ball of mud shows the nature of whatever is made of it, the name (is) as given by human speech, (the name is) the modification (which) is groundless the mud only is real, such, Oh Somya, is the spirit about which instruction is given." "Know that only, and let other things alone it is the bridge of immortality."

९ सूत्रामध्यें दोन शब्द विचार करण्याजोगे आहेत—एक, स्व आणि दुसरा, अप्यय अद्वैतवादी आत्म्याच्या ठायीं अ

9 There are two terms in the sûtra deserving examination—the one is *Sva* and the other,

हा समासघटित स्वपदाचा अर्थ करतात. द्वैतवादी स्वपदाचा अर्थ परमेश्वर समजतात. सर्व व्यवहारास ब्रह्म सोडून नाहीं असें या सूत्रावरून वल्लभ स्थापन करतात. या सूत्राचा अर्थ करतांना स्वस्थ निद्रेचा दृष्टांत मध्वाचार्यांखेरीज सर्व वेदांतवादी देतात. अद्वैतवादी म्हणतात कीं, ज्या वेळेस आत्म्यास सुषुप्ति प्राप्त होते, त्या वेळेस आत्म्याच्या ठायीं आत्मा निमग्न होतो, आणि मनुष्याचा आत्मा ब्रह्मस्वरूपच आहे, तेव्हां ब्रह्म गौण नाहीं. द्वैतवादी असें म्हणतात कीं, परमात्मा आपल्याच ठायीं निमग्न होतो, तेव्हां सहजच ब्रह्म गौण नाहीं. निद्रेच्या वेळीं जीव ब्रह्मांत जाऊन मिळतो आणि जागृत झाला म्हणजे त्याचा आविर्भाव मात्र होतो असें वल्लभाचें मत आहे. रामानुज स्वशब्दाचा अर्थ जीव असा करतात. जीव निद्रावस्थेच्या वेळीं आणि प्रलयावस्थेच्या वेळींहि परमेश्वराच्या ठायीं निमग्न होऊन जातो. अशी हें सूत्र लावण्याची निरनिराळ्या पंडितांची निरनिराळी रीति आहे, आणि ज्याचें आम्हीं पुढें भाषांतर दिलें आहे, त्या वेदवाक्यावरून ते आपआपल्या मताचें मंडन करतात. "जेथें हा पुरुष निजतो, म्हणजे त्या वेळीं हे सौम्य, सत् म्हणून काय जें तें त्याला प्राप्त होतें. स्वत मत तो गेलासा होतो, म्हणून याला पंडित जन सुषुप्त असें म्हणतात" या वाक्यास स्वपिति शब्द घेऊन पदच्छेद केलें आहे, आणि त्याचा अर्थ वल्लभाचार्य

Apyaya. The Advaita school of philosophers consider *Sva* and *Apyaya* as parts of a compound term. The Dvaita school on the contrary, interprets *Sva* into God head itself. Vallabha seeks to establish by means of this sûtra that Brahma is concerned in all human affairs and transactions. All commentators, except Madhva, the well known Dvaita or dualist, however, unanimously explain the sûtra by means of the same illustration. The Advaita school declares that the spirit is absorbed into itself when man completely and thoroughly sleeps. Because the human spirit is Brahma itself, therefore, Brahma is not subordinate nature. The force of this argument is that during complete sleep the human body is inactive because the spirit is absorbed into itself, the spirit is, therefore, the active principle as distinguished from the body which embodies the powers and forces of nature, but which is only subordinate to, or rather dependent on, the spirit. The Dvaita school declares that God is absorbed into himself, and, therefore, God or Brahma is not subordinate. It discards the illustration we have mentioned. Vallabha declares that during complete sleep the human spirit is absorbed into the universal material essence or Brahma, and on waking it only reappears. The Ramanuja school interprets *Sva* into the human spirit. Both during complete sleep and at the time of the universal destruction of the world and its system, the human spirit is absorbed into God himself. The various schools

र्थी अशा करतात "अरे तो हा आत्मा हृदयामध्यें" यावरून हृदयशब्दाच्या अर्थाची फोड होते हृदय म्हणजे काय? तर "हृदयामध्यें हा" (हृदि + अयम्) अशी व्युत्पत्ति दाखविली आहे हें निर्वचन नीट नाहीं असें भाष्यकारच म्हणतात पण ह्या व्युत्पत्तीची व्यवस्था लावण्याकरितां दुसरीं अशींच वेदवाक्यें आहेत असें दाखवितात. जसें "जें खाल्लेलें तें जलेंच नेतात जें प्यालेलें तें तेज नेतें" अशा रीतीनें अशनायाशब्दाची व्युत्पत्ति करतात कारण अशनायाशब्दामध्यें नाय अशीं अक्षरें आलीं आहेत त्याचा संबंध नयति या क्रियेशीं लावतात या संबंधानें पाणिनीचें (७ ४ ३४) सूत्र पहावें तसाच प्रकार हृदयम् याचे व्युत्पत्तीचा आहे ही उपनिषदांतील व्युत्पत्ति मोठी चमत्कारिक आहे "ज्ञानवान् आत्म्यासह वर्तमान विशेष आसक्त होऊन कांहींच आतलें आणि कांहींच बाहेरलें जाणत नाहीं" ही उपनिषद्वाक्यें घेऊन स्वपिति व हृदय याची व्युत्पत्ति करून आणि दृष्टांताकरितां अशनायाशब्दाची व्युत्पत्ति करून या सूत्राचा अर्थ लावतांना वेदान्तवादी पांडित्य करतात वरील सूत्रांतील स्वप्न पदें पहावींत म्हणजे या पांडित्याचें स्वरूप लक्षांत येईल उपनिषद्वाक्यांतील व्युत्पत्ति पाहिल्यानें वरील सूत्राच्या पदाचा अर्थ असा असें लक्षांत येतें खरें तरी सूत्रार्थ स्पष्ट बसला असें म्हणण्यास पुष्कळ अडचणा येतात

of philosophy interpret the sûtra differently—each in its own way, and seek to base their statements on the passage we translate. "Where this Person sleeps, that is, at that time, Oh Soumya, he obtains what is *Sat* (existing or real) Because he, as it were, goes to himself, therefore, the learned call him *Susupta*.' The term *Svapiti* is used in this passage, and a strange etymology is proposed there is punning on the word in the original passage. But Vallabha boldly mentions that *Sarap* *ti* signifies the human spirit, and that it is a noun. Another text is to be translated —' Oh, that spirit is in the heart. This circumstance explains the signification of the term *hridayam* (heart) itself *hridayam* consists of *hridi* and *ayam* that is, this (ayam) is in the heart (hridi) Such an etymology of the term *hridaya* which is incapable of being split up into two parts is attempted in the above passage in an Upanisad. Commentators, though they do not approve of this analysis of the term attempt to support it by quoting similar passages from sacred literature For instance the term *Ashanâyâ* is explained in the following way ' The waters indeed convey what is eaten light indeed conveys what is drunk The term *Ashanâyâ* is split up into two parts *asha* and *nayâ*—the former—being derived from the root *Ash* to eat and the latter, from the root—*Ni* to convey Vide in this connection, the sûtra of Panini (VII 4 34) Thus the etymology of *hridayam* is from analogy as reasonable as the etymology of *ashanâyâ* To us, this method of etymological

सूत्राणि.

गतिसामान्यात् ॥ १० ॥

पदानि । (न गौणम्) गति-सामान्यात् ॥

पदार्थः । गतिः = व्यवस्थितनिरूपणम् । सामान्यात = तुल्यत्वात् ॥

वाक्यार्थः । व्यवस्थितनिरूपणतुल्यत्वं वर्तते तस्माद् ब्रह्म न गौणम् ॥

भावार्थः । वेद उपनिषत्सु च यानि कानिचिद् वचनानि वर्तन्ते तेषां सर्वेषां निरूपणं तुल्यमेव ब्रह्मणि पर्यवस्यति । तस्माद् ब्रह्म न गौणम् । अत्र पुष्टिमार्गीयवादिना वल्लभाचार्येण यदुक्तं मोक्षे सर्वस्यापि भगवता तुल्यत्वादिति तच्चिन्त्यम् ॥

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

प्राणेभ्यो देवा देवेभ्यो लोका । इत्यर्थकम० उ० (६.४.) ॥ तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः सम्भूत. । ब्र० वि० (१) ॥ आत्मत एवेदं सर्वमिति ॥ छां० उ० (७.२६,१) । आत्मन एष प्राणो जायते । प्र० उ० (३.३.) ॥

शंकराचार्य, रामानुज आणि वल्लभ या च्या मतांत जरी भेद आहे तरी जीव आणि ब्रह्म एक असें सिद्ध करणें तिघांसहि सारखेंच इष्ट आहे म वाक्यांत जीव आणि परमात्मा यांचा भेद आहे असें प्रतिपादन करायाचें आहे म्हणून त्यांनीं वरील उपनिषदांतील वाक्य पुढेंच घेतलीं नाहींत, आणि आपल्या मार्गांत निराळ्याच वाक्यांचें अनुसंधान केलें आहे. त्या वाक्याचा हा अर्थ —‘पूर्ण हें (पद्म) पूर्ण असल्यामुळें पूर्ण अधिक होत पूर्णाच पूर्ण घेऊन बाकी पूर्णच रहातें” बृ० आ० (७ १) “तो आपल्यापासून

बादरायण सूत्राचे चार अध्याय आहेत म्हणून पूर्वी आम्हीं वर्णन केलें आहे आणि त्या चार अध्यायांतील विषय कोणते हें सांगितलें आहे प्रथम अध्यायामध्यें ब्रह्माचें निरूपण वस्तुतः वेदांत केलें आहे हें दाखविलें आहे दुसऱ्या अध्यायामध्यें सांख्य पंडितादिकांचें खंडन केलें आहे तिसऱ्या अध्यायामध्यें ब्रह्मविचाराचीं वैराग्यादि साधनें कोणतीं, हें दाखविलें आहे आणि चवथ्यामध्यें मुक्ती कोणती आणि कशी याचा विचार केला आहे अस्तु हें ब्रह्मसूत्र कोणीं लिहिलें आणि केव्हां लिहिलें अशा प्रकारच्या निर्णयाचीं आणि काल निर्णयाचीं साधनें आम्हास वाचकांपुढें एकदम मांडतां येत नाहींत कारण ऐतिहासिक प्रमाणें दोन प्रकारचीं आहेत एक अंतरंग आणि दुसरें बहिरंग वैदिक आर्यजनांच्या इतिहासविचारास बहिरंग प्रमाण बहुधा लागू पडत नाहीं म्हणून अंतरंग प्रमाणावरच सारा भार टाकावा लागतो म्हणून अंतरंग प्रमाणाची योग्यता मोठी आहे परंतु अंतरंग प्रमाणास जीं साधनें लागतात तीं साधनें ब्रह्मसूत्राचा जसा जसा विचार होईल तशीं तशीं उत्पन्न होतील म्हणून सध्यां ब्रह्मसूत्रकार कोण आणि केव्हां झाला हा विचार करतां येत नाहीं

या ब्रह्मसूत्राची योग्यता मोठी आहे हें आम्हास सांगण्यास नको. हिंदु

SUMMARY



We have already stated that the Vedantic system of Bâdarâyana consists of four books (Adhyâyas) and have pointed out what subjects are explained in them The first Adhyaya discusses how Brahma or the Supreme Spirit is propounded in the Veda, the second Adhyâya examines and refutes the doctrines of such schools of philosophy as that of the Sânkhyas, the third Adhyâya enumerates and enunciates the means of realizing Brahma or the presence of the Supreme Spirit such as self abnegation (Vairâgya), the fourth Adhyaya explains the nature of the salvation of man, and how it is to be accomplished We cannot at once and at this stage of our studies place before our readers our conclusions as to who the author of the Brahma sûtra really is and when he flourished, because of the two systems of evidence—the one being based on external and the other on internal evidence the former can seldom apply to the writings of the Vedic Âryas internal evidence is, therefore availed of as much as possible and therefore it is specially important But as we progress in the explanation of the system itself internal evidence will develop and we shall carefully lay it before our readers so that they may verify it and examine it for themselves.

We need not state that the importance of the Brahma sûtra is great The religious thought and spiritual aspirations of all the people of India from the Himâlayas to the cape Comorin are

नदीपरीत अटके पासून तों थेट कन्याकुमारी पर्यंत सर्व भरतखंडभर ब्रह्मसूत्राच्या धोरणानें सर्व लोक विचार करतात पुरुषार्थ म्हणजे काय हें तांच समजणें आवश्यक आहे भरतखंडामध्यें जरी सर्व जनाचा अभिलाष ऐहिक सुखप्राप्ति व्हावी असा आहे आणि ती साधण्याकरितां जरी ते रात्र दिवस झटतात तरी त्यांना विचारलें कीं पुरुषार्थ तो कोणता म्हणजे ते उत्तर देतात कीं सर्वसंगपरित्याग; आम्हास तुमच्या ऐहिक सुखप्राप्तीचीं साधनें नकोत; आम्हास सामाजिक सुखाचीं साधनें नकोत, आम्हास परदेशाशीं समागमसंग नको, आम्हास व्यापार नको, आम्हास कलाकौशल्य नको, आम्हास शेतकी सारखा उद्दीम नको, कर्मांचा क्षय व्हावा म्हणून आम्ही एथें प्रपंचांत सुख दुःख भोगीत आहों, उपाय नाहीं म्हणून उदरनिर्वाहकरितां उद्योग करीत आहों, परंतु संसार माया, प्रपंच व्यर्थ, आणि सर्व जें काहीं आहे तें मिथ्या अशी मनाची पक्की खात्री जमा करणें हाच आमचा परम पुरुषार्थ ह्या साधण्याकरितां धर्म करावा, धर्म आचरावा, द्रव्य संपादन करावें किंवा आपल्या इच्छा पूर्ण कराव्यात परंतु धर्मार्थ काम हा मिथ्या पुरुषार्थ सत्य पुरुषार्थ म्हणजे मोक्ष हे विचार आर्यजनांच्या मनांत इतके दृढ बिंबले आहेत कीं, त्यावाचून त्यांना चैन पडत नाहीं. आणि या विचाराचें प्राबल्य एवढें आहे कीं जे मुसलमान लो-

regulated by the Brahma sûtra, it is essential to know what is considered to be *the* Summum Bonum of life by the people Though the people of India are as worldly minded as possible, and though they always think of nothing but of the means of the pleasures of this life, yet when asked what is the highest end of life, they invariably point to self abnegation and the abdication of *the world* and declare — we ought not to seek the pleasures *of domestic life, or of social life,* war with other neighbouring nations, the development of commerce, or of arts, we cannot follow any industry such as agriculture, we are quietly suffering pain or enjoying pleasure that the accumulated effect of our actions in the previous lives may be annihilated we follow some pursuit for our daily bread, because we cannot help it But we know what our highest duty is—to convince ourselves that the pursuits of the world are vain, and that whatever, exists and is perceived, is a mere delusion To accomplish this alms are to be given purity of conduct is to be attended to, wealth is to be acquired and human desires are to be gratified But attention to religious duties the gratification of desires or the acquisition of wealth is only a delusive object of pursuit. The real object to be sought and secured is salvation These sentiments are so thoroughly ingrained in the minds of the people of India that they can hardly be at ease for a moment without indulging them. The power of these sentiments is so great that the Mohammedans,

गातारखे निर्वाण, ऐहिक सुखाकरिता झटणारे, आणि धर्माभिमानानें दृढ गुंतलेले, त्यांचीं वीरपुरुषांचीं मनें वळलीं, आणि ते ब्रह्मवाद करूं लागले ते आपल्या स्वतास सोफी असें म्हणवूं लागले आणि ब्रह्म सिद्धांत करूं लागले.

असा हा विलक्षण ब्रह्मसिद्धांत उत्पन्न कसा झाला याचा थोडा विचार आम्ही पूर्वी प्रस्तावनेंत केला आहे इतिहासदृष्ट्या हा शोध लावणें आवश्यक आहे. या विषयीं स्वतंत्र विचार केला पाहिजे इतकें सांगणें एथें पुरे कीं, खरा वेदांतसिद्धांत म्हटला म्हणजे बौद्ध पंडिताचा म्हणून मध्वाचार्यादि शंकराचार्यांस प्रच्छन्न बौद्ध म्हणजे छपलेला बौद्ध असें म्हणतात. वेदांताचे निरनिराळे चार प्रकार भरतखंडामध्यें आढळतात कोणी शांकर अद्वैत म्हणजे ब्रह्म मात्र सत्य बाकी सर्व मिथ्या असें मानणारे हे अद्वैतवादी. दुसरे माध्व आहेत परमेश्वर आहे, तो जगत्कर्ता आहे, तो जगन्नियंता आहे, जगत् सत्य आहे संसार सत्य आहे, आणि परमेश्वराचा आणि जीवाचा सेव्यसेवक संबंध आहे हे द्वैतवादी पंडित रामानुज असें म्हणतात कीं, पुरुषोत्तम, नारायण, लक्ष्मीपति यानें जगत् उत्पन्न केलें आणि जीव उत्पन्न केले आणि मुक्ती कालीं या जीवास परमेश्वराला जितका आनंद होतो तितका आनंद होतो, आणि त्याचे सर्व गुण त्याला प्राप्त होतात परंतु जगत्कर्तृत्व आणि ल

—bent as they were on warfare, fired as they were by religious fanaticism, and carried away as they were by worldly pursuits and worldly glory—were early influenced by Pantheistic transcendentalism, and began to indulge the melancholy thought of the vanity of this life, and to cultivate the philosophy which particularly fosters it. They assumed the name of Soophis, and discussed the nature of Brahma.

We have already proposed the problem of the origin of such a system of philosophy in the introduction to this system. It is historically important and necessary to investigate this subject, but it requires independent inquiry. Suffice it to remark in this place that the true and earnest Vedantins were the Buddhists, and that hence the followers of Madhvâchârya characterize Shankarâchârya as a concealed Buddhist. Four systems of Vedânta philosophy predominate in India. Some adopt the non dualistic system and declare that Brahma—the spirit—alone exists and that all else is a mere delusion—a vanity. Some follow the doctrines of Madhvâchârya, and declare that there is a Personal God, that He is the Creator and the Governor of the universe, that the world and this life are real, that the duty of man is to worship his Maker. These are dualists. The followers of Râmânuja state that the Highest Person is Nârâyana, that the lord of Laksmi, Nârâyana, the Highest Person created the universe, and human souls, and in the state of emancipation or salvation, these souls are as capable of happiness

लक्ष्मीपतित्व हें ऐश्वर्य जीवास कधीं प्राप्त होत नाहीं. हे विशिष्टाद्वैतवादी पंडित. शुद्धाद्वैतवादी वाल्लभ असें म्हणतात कीं, "परब्रह्म, जीव, आणि जड, यामध्यें भेद मुळींच नाहीं." भेद जो दिसतो तो केवळ परिणामामुळें. जड हा चैतन्याचाच परिणाम आहे जीव हा जडाचा परिणाम आहे निरंतर जगताची रहाटी चालली आहे, कांहीं एक नवें उत्पन्न होत नाहीं, कशाचाहि नाश होत नाहीं, एखाद्या पदार्थाचा नाश झालासा वाटतो म्हणजे तो पदार्थ दृष्टीआड जातो म्हणजे त्याचा तिरोभाव होतो. एखादा पदार्थ उत्पन्न होतो म्हणजे तो मात्र दृष्टीसमोर येतो म्हणजे त्याचा आविर्भाव मात्र होतो. असें या चार वेदान्तवादी पंडितांच्या सिद्धान्तांनीं सर्व भरतखंड आक्रमून टाकलें आहे. म्हणून यांविषयीं विचार करणें आवश्यक आहे. या चार सिद्धान्तांच्या प्रक्रियेचें विशेष निरूपण आम्ही पुढें करूं. या चारी हि सिद्धान्तांचें मूळ म्हटलें म्हणजे बादरायणकृत ब्रह्मसूत्र आणि चौघांसहि वेद प्रमाण आहेत. मग एका ग्रंथापासून हे चार सिद्धान्त कसे उत्पन्न होतात ही गोष्ट मोठी विचार करण्याजोगी आहे. या संबंधानें या ब्रह्मसूत्राच्या पहिल्या अध्यायामध्यें वेदांतील आणि उपनिषदांतील निरनिराळीं वाक्यें घेऊन त्यांच्या अर्थांचें पर्यवसान परब्रह्माचे निरूपणावर आहे असें बादरायण दाखवितात या वर

as God or Nârâyan himself, and of acquiring all his attributes and powers except the power of creating the world or of possessing Laksmi for wife. These are known as Vishistâdvaita vâdins. The followers of Vallabha style themselves pure non dualists and declare that there is no distinction between the Supreme Spirit, the human soul, and matter, that whatever distinction is perceived springs merely from the one being transformed into the other, that matter is only the spirit transformed, that the universe is eternally worked, that nothing new is created, and that nothing already existing is destroyed, that what appears to be destroyed is merely concealed from human sight, it disappears—it undergoes *Tirobhâva*, that what appears to be created merely presents itself to human sight, it re appears, it undergoes *Avirbhâva*. These four systems of religious thought in one way or other regulate the life of all the people in India. It is, therefore, necessary to discuss and examine these systems. We will explain their distinctive features in the sequel.

But the only source of all these four systems is the work of Bâdarâyana known as the Brahma sûtra which recognizes the Veda as authoritative. The question is interesting and important—how are such discordant systems as those of the Dvaitas and Advaitas derived from the same philosophical work? When Bâdarâyana quotes merely from the Veda and Upanisads, and shows that all his quotations directly point to the Supreme Spirit, Shankarâchârya *declares that the Supreme Spirit,*

ब्रह्मसूत्राचा अर्थ शंकराचार्य आपल्या मतास अनुसरून आहे असें म्हणतात. मध्वाचार्य असे म्हणतात कीं, परब्रह्म म्हणजे वैकुंठ लोकींचा शरीरी विष्णु रामानुज म्हणतात परब्रह्म म्हणजे पुरुषोत्तम, नारायण, लक्ष्मीपति व वल्लभ म्हणतात कीं, चिदचिदात्मक म्हणजे सारे जीव आणि सारें जड वस्तु मात्र परब्रह्माचा परिणाम आहे बादरायणाच्या लिहिण्याच्या एकंदर सरणीवरून या चौघांसहि आपआपल्या मताचें प्रतिपादन करणें सुलभ पडतें परंतु कांहीं कांहीं सूत्रांची व्यवस्था करण्यामध्यें या चौघांसहि अडचण पडते अशा प्रसंगीं आपआपल्या मतावर दृष्टि देऊन सूत्रार्थाची ओढाताण करावी लागते यास दृष्टांत (१ १ १७) हें सूत्र आहे पुनः या चौघांस दुसरी अडचण पडते ती कोणती? कांहीं वेदवाक्य द्वैत सिद्धांतास साधक आहेत कांहीं अद्वैत सिद्धांतास साधक आहेत त्यांची व्यवस्था कशी करायाची? या अडचणी या सर्व वेदान्ती पंडितांमध्यें मोठा वादविवाद उत्पन्न होतो त्या वादविवादास अनुसरून वेदान्तवादी जी व्यवस्था करतात तिचें दिग्दर्शन करून आमच्या मताविरोधी वेदवाक्यांची एकवाक्यता कशी होते हें दाखवून आणि मग हा उपसंहार पुरा करूं

ब्रह्मसूत्राच्या या पहिल्या पादांत जीं सूत्रें गेलीं आहेत त्यावर चारहि प्रकारचा वेदान्तवाद बसविता येतो परंतु कांहीं सूत्रें अशीं आहेत कीं तीं द्वैतवादास

(Paramâtmâ) of Bâdarâyana is the Pantheistic Brahma itself Madhvâchârya, on the contrary, observes that the Supreme Spirit is Visnu—Personal God whose seat is in the Vaikuntha loka Râmanuja interprets the Supreme Spirit mentioned by Bâdarayana into the Highest Person, Nârâyana the Lord of Laksmi Vallabha holds on the authority of Bâdarâyana that whatever is spiritual and material is the same Spirit transformed All these four interpreters find it equally easy to graft their systems on the Brahma sûtra, the general style of which seems at first sight to admit of different interpretations But all these Âchâryas find it hard to offer consistent interpretation of some sûtras Under these circumstances they are compelled to over-strain and to propose far fetched interpretations, for making Bâdarâyana conform to their doctrines This statement is illustrated by such sûtras as (I 1 17) These Âchâryas have also to face a difficulty It is this Some Vedic texts directly support the doctrines of Dualists the followers of Madhvâchârya, while others the doctrines of non dualists or of Shankarachârya The question is—how is this interpretation to be adjusted? In answering this question an intricate and obstinate controversy is developed between different schools of Vedântins We will only indicate the nature of the adjustments and interpretations which Vedântins propose each in favour of his own doctrines and point out how conflicting Vedic texts bear on the same subject and

साधक होतात आणि त्या ठिकाणीं अद्वैतवाद्यास पचाईत पडते. ती पचाईत दूर करण्याकरितां शंकराचार्यांदि अद्वैतवाद्यांनीं बौद्धसंप्रदायाची सामाजिक व्यवस्था स्वीकारली ती व्यवस्था अशी कीं, कोणत्याहि सिद्धांताचें रहस्य, म्हणजे त्यांचें गुह्य सर्व लोकांस समजून घेण्याची योग्यता नाहीं. या गोष्टीविषयीं सामान्य सारे जन अनधिकारी ज्यांना तें गुह्य समजून घेण्याची योग्यता आहे असे थोडे पंडितजन अधिकारी हे त्यांचा वर्गास पोहोचलेले अनधिकारी जन केवळ उपासक अशी सामाजिक व्यवस्था अंगीकारून शंकराचार्य असें म्हणतात कीं, त्या सूत्रांमध्ये परमात्मा आणि जीवात्मा भिन्न असे वर्णन आलें आहे त्या सूत्रांचा तसा अर्थ समजावयाचा नाहीं कारण तो त्या सूत्रांचा वास्तविक अर्थ नव्हे वास्तविक अर्थ असा कीं जीवात्मा आणि परमात्मा एक मग जीवात्म्याचा आणि परमात्म्याचा अभेद असतां सूत्रांत यं भेद का वर्णिला आहे या शंकेचे समाधान हें कीं केवळ उपासक बुद्धीनें जड असतात जीवात्म्याचा आणि परमात्म्याचा ऐक्याविषयीं सिद्धांत गूढ तो त्यांना अधिकार आहे त्यांनीच समजून घ्यावा म्हणून व्यवहारांत रहाणें वर्तन असतां त्यांनीं परमात्मा जीव यांपासून भिन्न असें समजावें याप्रमाणें म्हणजे परमेश्वर त्याचा पूजा करावी भा? ... असावा परमेश्वराचा स्मरण

harmonize with one another, before we conclude this summary. Though the sûtras of the first chapter (Pâda) equally support all the four systems of Vedanta, yet there are some sûtras which are directly favourable to the Dualists, and cause a great difficulty to the Non-dualists. To remove such a difficulty, the Non-dualist thinkers accept the special arrangements of the Bud dhists who divide society into two sections—esoteric and exoteric—the latter not being qualified to be admitted to the secrets of their doctrines—society as a whole being ignorant and incompetent to grasp doctrines explained to it, and there being only a few persons competent to understand the lessons given to them. The last constitutes the esoteric section—a superior class. The mass of society constitutes mere disciples—laymen. Shankarâchârya bases his system upon such a distinction and declares that those sûtras which enunciate a distinction between the human spirit and the Supreme Spirit, really inculcate the identity of the two, because a distinction is not really explained in the sûtras, and that the sûtras really support the doctrine of identity. The question now is—if the Supreme Spirit and human spirit is identical, why do the sûtras directly speak of a distinction between the two? Laymen are naturally slow of apprehension while the doctrine of the identity of the two spirits—human and Supreme is mysterious—a doctrine which a few can comprehend. Hence laymen while engaged in the world ly life, ought to recognize a di

तिष्ठा करावी, व्रतें, उद्यापनें, यात्रा वगैरे कराव्या, कर्मनिष्ठ होऊन ज्ञानी जसें सांगतील तसें वागावें. मनुष्याच्या ज्ञानी आणि उपासक अशा दोन कोटी करून शंकराचार्य परमेश्वर आणि जीवात्मा यांचा भेदनिरूपण करणारीं सूत्रें लावतात. द्वैतवाद्यास अशा बाहेरील कल्पना कराव्या लागत नाहींत. त्यांच्या सिद्धांताच्या धोरणावर हीं सूत्रें सहज जातात. त्यांचा अर्थहि सहज बसतो. या गोष्टीचा वाचकांनीं विचार करावा.

अद्वैतवादी असें म्हणतात कीं, वेदांत आणि उपनिषदांमध्यें अद्वैत सिद्धांतास साधक अशीं वचनें स्पष्ट प्रतिपादक आहेत. तीं अशीं "ज्याच्या योगानें रूप (पुरुष) पहातो किंवा ज्याच्या योगानें शब्द ऐकतो किंवा ज्याच्या योगानें गंधाचें ग्रहण करतो किंवा ज्याच्या योगानें नाना नावें ठेवितो जें हें हृदय तेंच प्रधानाचें नांव—प्रधान ब्रह्म" "मी ब्रह्म आहे, असें ज्यानें जाणलें" "श्वेतकेतु तें (ब्रह्म) तूं आहेस" "हा आत्मा ब्रह्म" या चार वाक्यांस अद्वैत वेदांतवादी महावाक्यें असें म्हणतात. हीं चार वाक्यें क्रमानें चार वेदांच्या उपनिषदांत आलीं आहेत आणि अशा प्रकारचीं वाक्यें क्वचित् क्वचित् निरनिराळ्या वेदांच्या संहितेंत आणि ब्राह्मणांत आढळतात. या वाक्यांत ब्रह्म आणि जीवात्मा एक आहे असें वर्णन आहे. या वर्णनाची गति काय? अशीं हीं वाक्यें तर आहेत. म्हणून अद्वै

tinction between the Supreme Spirit and human spirit, to worship the former as God, to have faith and to practise devotion, to make images of God and to establish in them the Spirit (Prâna Pratista), to undergo penances and to observe fasts. The esoteric philosophers bid them to direct all their activities in this way. Thus making a distinction between exoteric and esoteric sections of society between laymen and clergymen between philosophers and fools, Shankerâ hârya adjusts the interpretation of the sûtras. The Dualists are not compelled to make artificial social distinctions —the sûtras naturally and easily supporting their doctrines and their interpretation being naturally and adequately proposed. The reader may examine for himself this subject in this connection. Again the non dualists affirm that there are Vedic and Upanisad texts which directly support their system. These are — By which a person sees a form or by which he hears a sound or by which he knows a smell or by which he gives names to objects—that this heart or spirit is the name of the pre eminent knowledge. The Pre eminent knowledge being the Supreme Spirit. I am Brahma (the Supreme Spirit). He who knows this—Sveta ketu that Brahma thou art. 'This spirit or soul is Brahma.' These four texts which occur regularly in the Upanisads of the four Vedas are characterized by non Dualists or Pantheists as important (Mahâvakyas). Similar texts also occur though rarely in the Sanhita as well as Brahmana

त सिद्धांताचें स्थापन होतें असें अद्वैतवादी म्हणतात. हें अद्वैतवाद्यांचें म्हणणें ऐकिलें, आणि हीं महावाक्यें पाहिलीं, म्हणजे द्वैतवाद्याचा सारा धीर सुटतो. त्यास कांहीं सुचेनासें होतें. तथापि ते धैर्य धरून या वाक्याचा आपल्या सिद्धांतास अनुकूल असा अर्थ करूं पहातात परंतु असा अर्थ करतांना त्यास पुष्कळ झटापटी घ्याव्या लागतात, आणि ओढाताण करावी लागते. आणि इतकें करून त्यांनीं केलेला अर्थ पाहिला म्हणजे त्यांत कांहीं सामर्थ्य नाहीं, पण उगीच गडबड आहे असें दिसतें. आतां पुढें करायाचें कसें? वेदामध्यें थोडीं वचनें अद्वैत सिद्धांतास साधक अशीं आहेत. बाकी सर्व वचनें द्वैत सिद्धांतास साधक आहेत. जोंवर या थोड्या वचनांची व्यवस्था झाली नाहीं तोंवर द्वैतसिद्धांताचें ग्रहण करतां येत नाहीं. या थोड्या वचनांची द्वैतवादी जी व्यवस्था करतात ती आम्हांस मान्य नाहीं. तथापि या महावाक्यांचें आम्हांस भय वाटत नाहीं. अद्वैतवादी या वाक्यांचा जसा अर्थ करतात तसा अर्थ केला असतां हीं वाक्यें द्वैतवादास साधक आहेत असें आम्हांस वाटतें. हें कसें? द्वैतसिद्धांताचें रहस्य म्हटलें म्हणजे भक्ति. भक्ति करीत असतांना चित्ताचे दोन प्रकारच्या होतात. एक तुम्ही मजनीं पाठ्या सेवेस लहू. त्यास जें जें प्रिय तें तें साधायाचें व त्यास जें जें इष्ट तें तें अर्पण करायाचें, त्याची जी जी आज्ञा ती ती पाळायाची अशा प्रकार

texts of the four Vedas—*texts* which directly propound the *identity of* the human and the Supreme Spirits. How are these Vedic texts to be explained and adjusted? The non Dualists or Pantheists, therefore, declare that the Vedas and Upanisads *directly inculcate Pantheism.* In view of these texts and of the propositions based upon them by the Pantheists the Indian Theists or Dualists are necessarily confounded. They feel at a loss what to propose against the texts. They attempt to propose some interpretation and to harmonize the texts with their own doctrines. They are compelled to make strenuous efforts to establish their interpretation, and *to overstrain the sense of the texts.* Notwithstanding all this, the interpretation which the Dvaitas propose cannot bear an examination, because the texts evidently do not admit of it. All they say is simply beside the mark. What is to be done? There are doubtless a few texts in the Veda which support Pantheistic views. Most, however, *support the Theistic principles.* But so long as Pantheistic texts are not explained, the proposition that the Vedas do not teach Pantheism cannot be accepted. Again the adjustment and interpretation of these proposed by the Theists can not be accepted, because of their being far fetched and forced. But we do not see how the few Pantheistic *texts come in the way of Theism,* because we believe that though they be interpreted as the Pantheists do, yet they support Theism. How can this be? The essence of the Dualistic doctrine

मुलें माता पितरें पुत्रास भजनीय आहेत असा प्रकार परमेश्वर भक्तास भजनीय आहे. या अशा प्रकारच्या भक्तीमध्यें नऊहि प्रकारच्या भक्तींचा अंतर्भाव होतो १. परमेश्वराचेच गुणानुवाद ऐकत बसावयाचे, २. त्याच्याच गुणांचें कीर्तन करावयाचें, ३. त्याच्याच गुणांचें स्मरण करावयाचें, ४. त्याच्याच पायांचें सेवन करावयाचें, ५ त्याचाच सत्कार करावयाचा, ६ त्यालाच वंदन करावयाचें, ७ त्याचेंच दास्य करावयाचें ८. त्याच्याशींच सख्य ठेवावयाचें, ९ आपलीं सुखदुःखें त्यालाच सांगावयाचीं हीं नऊ प्रकारची भागवतांत वर्णिलेली भक्ति परंतु याच भक्तीचा दुसरा प्रकार आहे तिजमध्यें चित्ताची उत्थिति होते या उत्थित चित्तवृत्तीचा प्रकार दृष्टांतावांचून समजणार नाहीं. मुलाचें आणि आईचें वात्सल्य कसें असतें याचा विचार करावा जेव्हां जेव्हां मूल किंवा आई लाडामध्यें आलीं म्हणजे त्यांची किंवा तिची जी चित्तवृत्ति होते ती सांगता येत नाहीं तिच्या किंवा त्याच्या तोंडांतून जे उद्गार निघतात ते वाचकांपुढें मांडले पाहिजेत. आई मुलास म्हणते—"अरे माझ्या सोन्याच्या तुकड्या, अरे माझ्या प्राणा, अरे माझ्या जीवा, तुला खाऊ कारे? अशा प्रसंगीं आईस मुलगा आपल्या पासून निराळा असें भान नसतें किंवा मुलास आई आपल्या पासून निराळी असें भान नसतें हा उत्थित चित्तवृत्तीचा प्रकार. हा भक्तीचा दुसरा प्रकार. अशी उत्थित

is *adoration* (bhakti) While engaged in adoration, the mind discovers two states—the one consisting in *being intent upon* serving the Lord, in doing that which He approves, in offering to Him the best things one has, and in obeying His commands Thus as good parents are to be served by a child, in the same manner God is to be served and worshiped by his servants* This kind of worship includes all the nine sorts of adoration mentioned in the Bhâgavata Purâna 1 Exclusively listening to the praises of God, 2 exclusively singing His praises, 3 remembering and constantly thinking of them 4 falling at His feet, 5 worshipping Him, 6 His adoration 7 exclusive devotion to Him 8 constant association with Him, 9 laying one's sorrow or happiness before Him But there is a *special feature* of such adoration—a feature not included in any of these It is the ecstatic condition of the spirit—a condition which can neither be explained nor understood without an illustration Let the reader realize the love a mother has for her child A mother or her child sometimes experiences a *state of mind—an indescribable* state That which either of them expresses can alone convey an idea of their feelings when they are in the ecstatic condition The mother directly addresses the child thus —"Oh my piece of gold—oh, my soul, oh my life—can I eat you up?" Under these circumstances, the *mother* forgets that her body is different from that of her child which experiences the same feeling Such an identity is the

चित्तवृत्ति योगयाची होते म्हणून योगी महान् भक्त आहेत येशू खिस्ताच्या कथेचें अनुसंधान या ठिकाणीं करावें. योहान (१४ २०) पहा तें असें— " या दिवशीं तुम्ही जाणाल कीं, मी माझ्या बापा (परमेश्वरा) मध्ये आहे, आणि तुम्ही मजमध्यें आहां, आणि मी तुम्हामध्यें आहे " येशूखिस्त पूर्ण द्वैतवादी असून त्याची अशा प्रकारचीं वचनं आहेत भक्ताच्या उचित चित्तवृत्तीचा प्रकार समजला म्हणजे त्याची व्यवस्था सहज होते म्हणून वेदांत आणि उपनिषदांत अद्वैत सिद्धांताचें निरूपण नाहीं पुन ब्रह्मसूत्रांत हि अद्वैत सिद्धांत घातला नाहीं वैदिक परंपरेचा आणि अद्वैत सिद्धांताचा विरोध आहे. जसा जसा ब्रह्म सूत्राचा पुढ विचार होईल तसा तसा अद्वैत सिद्धांत, म्हणजे बौद्ध सिद्धांत आहे, किंवा लौकायतिक सिद्धांत आहे असें वाचकाच्या लक्षांत येईल याविषयीं विचार पुढ करू.

योग सूत्रामध्ये ज्या अध्यात्म शक्तीचें वर्णन केलं आहे, ती अध्यात्म शक्ति तशी आहे असें वेदान्तशास्त्रास मान्य आहे आणि हेंच वेदान्ताचें मुख्य अंग आहे शिस्तवार पुढाल सिद्धांत योगशास्त्रांत केले आहेत परमेश्वर किंवा परमात्मा याचा जीवात्म्याशीं संबंध आहे जीवात्म्याच्या अंगीं विशेष शक्ति आहेत मनुष्यानें आपल्या आचरणांत विशेष साधनें योजलीं असता त्याच्या अंगीं ज्या शक्ति आहेत त्या प्रकट होतात आणि त्यास त्रिकालाचें भूत आणि भविष्य कळूं लागतें आणि जो जीवात्मा देहावस्थेपासून मुक्त होतो तो, एक प्रकारें परमात्म्यामध्यें जाऊन मिळतो वेदान्तशास्त्रास योग शास्त्राचा मुख्य आधार आहे यास म्हणजे हिंदुस्थानांतील अध्यात्म ज्ञान असें मा

form of the ecstatic condition of the mind This is a special feature of adoration This sort of ecstatic identity the Yogis feel Hence there are such worshippers. The life of Jesus Christ can be referred to in this place as described in (14 20) of the Gospel of John It is this "At that day ye shall know that I am in my father, and ye in me, and I in you' Though a thorough Dualist or Dvaita, Jesus expressed himself in this way His utterances can be easily explained when this ecstatic condition of mind is understood Hence in the Vedas and in the Upanisads, the Pantheistic doctrine of the identity of the human and Supreme Spirits if ennunciated is ennunciated in this way Again, the Brahma sutra of Bâdarâyana does not inculcate it The Vedic polity properly so called conflicts with the Pantheistic polity which will be proved to be based partly on the Buddhistic polity and partly on that of the Loukâyatikas or ancient Indian Secularists As our explanation of the system of Bâdarâyana develops, this statement will be fully examined again

The characteristic feature of the Indian Vedânta is its recognition of spirit power as it is explained in the Yoga sûtras which systematically lay down the following propositions—that the Supreme Spirit or God is related to the human spirit, that the human spirit has very great potential powers that if certain methods of living be adopted, it can call out its powers, and become actually able to know the past and the future and that the human

नव्यास चिंता नाहीं. योग शास्त्राच्या अधाविषयीं आम्ही पुढें चिंतन करता करता योग्य वेळीं विचार करूं. एवढें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, जों पर्यंत योग शास्त्राचे सिद्धांत नीट समजले नाहींत, तों पर्यंत शंकराचार्यांचें आणि वल्लभाचार्यांचें म्हणणें काय हें नीट लक्षात येणार नाहीं. आत्म्याच्या अंगीं विशेष शक्ति आहेत आणि त्या शक्ति विशेष प्रकट होतात असे योग शास्त्राचे सिद्धांत आहेत त्याकडे या सबगानें विशेष लक्ष दिलें पाहिजे. या विषयाकडे आम्हीं पुष्कळ काळ खर्च केला आहे आणि जतन आणि शास्त्रीय दृष्ट्या छानून छानून ज्या ज्या अध्यात्म गोष्टी आमच्या दृष्टीस पडल्या त्यांची त्यांची आम्ही परीक्षा करीत आहों. जडवस्तु विज्ञानाचे जे सिद्धांत आहेत ते लागू केले, असताहि कांहीं एक परिशेष राहतो आणि त्या परिशेषाचें स्वरूप जडवस्तु विज्ञान शास्त्राचे आधार करून नाहीं. तो परिशेष कोणता? कांहीं मनुष्याच्या अंगीं विशेष अध्यात्म शक्ति असते आणि त्यांनीं पुष्कळ अभ्यास केला म्हणजे त्यांच्या अंगीं अशा कांहीं विभूति प्रकट होतात कीं त्यांची जडवस्तु विज्ञानाच्या योगानें उपपत्ति करतां येत नाहीं. आश्चर्यमय असोत किंवा आधिभौतिक असोत बाह्य असोत किंवा अंतरंग असोत विषयासंबंधीं असोत किंवा विषयी संबंधीं असोत, ज्या वस्तु आहेत त्यांविषयीं विवेचन आणि अनुगम शास्त्रास कर्तव्य आहे. म्हणून योगशास्त्राची शास्त्री दृष्ट्या परीक्षा होणें योग्य आहे परंतु आमच्या वाचकास आमच्या परीक्षेचें फळ सादर करण्याकरितां आम्हास कांहीं वेळ पर्यंत थांबलें पाहिजे.

spirit disenthralled from the flesh is ultimately in one sense absorbed into the Supreme Spirit. *The Yogi system is properly the* back bone of Vedânta. It is properly to be characterized as Indian spiritualism which essentially differs from modern European spiritualism. We will enter on its interpretation in the due course of our studies. In *the mean time it must be stated* that the interpretation of Shankarachârya or Vallabhâchârya is better appreciated if the propositions laid down by Yoga are thoroughly comprehended. With regard to the potential powers of the spirit and their development, *the doctrines of the Yoga system* deserve attention in this connection. We have already given ample time to this subject and carefully and from a scientific point of view crucially have been examining such psychical phenomena as we can observe. Their analysis after elimination of all that can be explained by principles in physics leaves a residual phenomenon that some human beings already endowed with great spirit power after a long preparation *acquire such powers of* mental vision as cannot be easily explained on the known principles of physics. *Science seeks* facts whether psychical or physical. Hence the Yoga system deserves a scientific examination. But we must wait before we can lay the results of our examination before our readers.

प्रथमाध्यायस्य द्वितीयः पादः ॥

सर्वत्र प्रसिद्धोपदेशात् ॥ १ ॥

पदार्थः । सर्वत्र=सर्वेषु वाक्येषु ॥

भावार्थः । प्रथमपादे ब्रह्मस्वरूपं निर्णीतं तद्विषयाणि वेदवाक्यानि व्याख्यातानि च । द्वितीये यान्यस्पष्टतया ब्रह्मस्वरूपं निरूपयंति तानि विचार्यंत इति ग्रंथसंगतिः । सूत्रार्थस्तु सर्वेषु स्थलेषु प्रसिद्धतयोपादिष्टं ब्रह्मोपासनीयमिति । तेन वेदवाक्यार्थप्रसंगे सर्वाणि वाक्यानि ब्रह्मणि पर्यवस्यंति । तेषामर्थं स्वस्वमतानुसारेण शंकराचार्यादयो व्यवस्थापयंति । तत्र सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानित्येकस्मिन् वाक्ये तज्जलानिति पदस्य वृत्तिर्द्रष्टव्या । तज्जानि च तल्लानि च तदनानि चेति । ब्रह्मणो जातानि तज्जानि । ब्रह्मणि लीनानि तल्लानि । ब्रह्मशक्त्या प्राप्तप्राणनानि तदनानि । तेन तज्जलानिति पदेन जगन्निर्दिश्यते ॥ शंकरः जीवब्रह्मणोरैक्यं जगन्मिथ्यात्वं च प्रतिपादयति ॥ रामानुजस्तु जीवब्रह्मणोः सर्वथैक्याभावेन ब्रह्मस्वरूपस्य नारायणस्य जगत्कर्तृत्वं लक्ष्मीपतित्वं च जीवो न कदापि प्राप्नोतीति ॥ मध्वस्तु जीवब्रह्मणोः सर्वथा भेद एव सेव्यसेवकसंबन्धश्चेति ॥ वल्लभस्तु तत्रार्थो द्विविधो जीवजडात्मकः प्रत्येकसमुदायाभ्यां त्रिविधइति मन्यते । तेन जीवजडयोर्ब्रह्मपरिणामत्वेनैक्यं । आविर्भावतिरोभावाभ्यां नानात्वाभासश्चेति ॥ इति वेदान्तसिद्धान्तचतुष्टयनिष्कर्षः ॥

अनुसन्धेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत अथ खलु क्रतुमयः पुरुषो यथा क्रतुरस्मिल्लोके पुरुषो भवति तथेतः प्रेत्य भवति स क्रतुं कुर्वीत ॥ १ ॥ मनोमयः प्राणशरीरः । छा० उ० (३ १४,१.) ॥ अप्राणो ह्यमनाः शुभ्रः । मु० उ० (२.१, २.) ॥

पहिल्या अध्यायाचा दुसरा पाद.

१. (वेदामध्यें आणि उपनिषदामध्यें) प्रसिद्ध उपदेश असल्यामुळें सर्व ठिकाणीं (ब्रह्माची उपासना करावी) असें वर्णिलें आहे.)

---

१ पहिल्या पादांत आणि दुसऱ्या पादांत जे विषय आले आहेत त्यामध्यें भेद काय? पहिल्या पादामध्यें वेदांतील आणि उपनिषदांतील वाक्यें घेऊन त्यांचा समन्वय करून त्या सर्वांचा अर्थ काय, असा कटाक्ष ठेवून त्याचा विचार केला. अशींच वाक्यें घेऊन, असाच कटाक्ष ठेवून आणि असाच जर विचार दुसऱ्या पादांत झाला असेल तर पहिल्या आणि दुसऱ्या पादांत अंतर नाहीं मग दुसऱ्या पादाची खटपट का? ज्या वाक्यांत स्पष्ट ब्रह्मोपासनेचें निरूपण केलें आहे तीं वाक्यें प्रथम पादांत घेतलीं आहेत दुसऱ्या पादामध्यें स्पष्टपणें ज्याचा ब्रह्मावर कटाक्ष नाहीं अशीं जीं वाक्यें दिसतात तीं वाक्यें घेतलीं आहेत अशी दोन्ही पादांची प्रवृत्ति आहे. अस्तु शंकराचार्यादिक आपआपल्या मताच्या अनुरोधानें केवळ सूत्रार्थ बसवितात इतकेंच नाहीं, परंतु वेदांतील आणि उपनिषदांतील वाक्यांचा अर्थहि आपल्या

THE SECOND CHAPTER OF THE FIRST ADHYÂYA

1. And, because of the direct injunctions (of the Veda it is plain) that the worship of Brahma is described in every place (of the Veda)

---

1 What is the distinction between the subjects treated of in the first and second chapters? In the first chapter all those texts of the Upanisads which are connected with Brahma are collated, and their bearing investigated There could be no distinction between the two chapters, if Upanisad texts be similarly collated, and their bearing similarly investigated in the second chapter also Thus all the disquisition in the second chapter would be useless But those Upanisad texts, which directly mention Brahma are examined in the first chapter, while in the second, those which indirectly bear on Brahma are taken up This is the connection between the two chapters It is necessary to state that commentators like Shankarâchârya and others do not only interpret the sûtras of Bâdarâyana in conformity with their own opinions, but alter the meaning of Upanisad texts so as to suit it to their systems. We have already indicated the distinctive features of the systems of Shankarâchârya, Madhvâchâ

मताला जुळेल असा फिरवितात. शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुज, आणि वल्लभ, यांचीं मतें काय यांचें आम्हीं पूर्वी दिग्दर्शन केलें आहे पुनः एक वेळ संक्षेपानें अनुवाद केला म्हणजे ठीक पडेल ब्रह्म आणि जीव एक आणि जगत् सारें मिथ्या असें शंकराचार्य प्रतिपादन करतात हा अद्वैत सिद्धांत मध्वाचार्य असें म्हणतात कीं, परब्रह्म म्हणजे विष्णु. त्याच्यामध्यें आणि जीवामध्यें सर्वथैव भेद आहे जीवानें विष्णूची सेवा करावी. विष्णु सर्वथैव पूजनीय आहे हें द्वैत मत या दोन्ही द्वैताद्वैत मतांची छाया रामानुजाच्या मतामध्यें आहे काहीं अशीं जीव आणि ब्रह्म यांचा भेद, आणि काहीं अशीं जीव आणि ब्रह्म यांचें ऐक्य, असें त्याचें मत आहे. परब्रह्म म्हणजे नारायण तो जगताचा कर्ता तो लक्ष्मीचा पति हे दोन गुण जीवास कधीं प्राप्त व्हावयाचे नाहींत बाकी नारायणाचे सर्व गुण जीवास प्राप्त होतात हा सर्व विचार जीव मुक्त झाला म्हणजे त्या वेळचा आहे वल्लभ म्हणतात कीं, अर्थच दोन प्रकारचे आहेत एक जीव आणि दुसरा जडात्मक हे दोन्ही भिन्न भिन्न घतले म्हणजे दोन प्रकार झाले दोन्ही मिसळले म्हणजे तिसरा प्रकार उत्पन्न होतो. शुद्ध चैतन्य, शुद्ध जड, आणि चैतन्य आणि जड यांचें मिश्रण असा तीन प्रकारें अर्थ असतो परंतु जीव आणि जड हे दोन्ही ब्रह्माचे परिणाम आहेत तरी

rya, Râmânuja and Vallabhâchârya. Yet it would be better to reproduce in this place briefly the same Shankarâchârya maintains that the human spirit and the Supreme Spirit *(Brahma)* are one, and the universe or the phenomenal existence is all a delusion This is the Advaita-system Madhvâchârya holds that Personal God is the Supreme Spirit, and is called Visnu, that the human spirit is distinct from the latter, that Personal God or *Visnu alone under all circumstances* is to be worshipped This is the Dvaita system Râmânuja combines the two systems, Dvaita and Advaita, and holds that the human spirit and the Supreme Spirit are one as well as different, that the former is like *the latter in some respects,* and different from it in other respects, and that Personal God known as Nârâyana is the Supreme Spirit—Creator of the world and the Lord of the female deity named Laksmî These two powers—that of creating the world and of owning Laksmî as a spouse, can never be acquired by the human spirit, though it is capable of acquiring all other attributes of Nârâyana. Some of these powers are possessed by the human spirit when in the state of final emancipation. Val *lalha holds that the essential* substance is seen in two forms—spiritual and material, that these two may be conceived as distinct, or that when mixed, the two forms may constitute a third form. These are—pure spirit, pure matter, and the mixture of spirit and matter All phenomenal existence is either of these But the spirit or

जगतामध्यें अर्थ तर नाना दिसतात हें कसें? अर्थ उपष्टकास येतात आणि झाकतात म्हणजे केवळ त्याचा आविर्भाव आणि तिरोभाव मात्र होतो त्याची उत्पत्ति किंवा नाश कोणत्या प्रकारें होत नाहीं चारांहि वेदान्त सिद्धांतांची इतकी ही विचार सरणी लक्षात ठेविली म्हणजे वाचकास सूत्रांचा किंवा वेदवाक्यार्थाचा विचार करण्यास अडचण पडणार नाहीं वरील सूत्र चारांहि सिद्धांतास सारखें अनुकूल आहे या सूत्राचा विचार करतांना ज्या ज्या उपनिषद्वाक्याचें अनुसंधान करतात त्या त्या उपनिषद्वाक्याचें भाषांतर केलें म्हणजे झालें "खरोखर हें सार ब्रह्म या जगताची उत्पत्ति स्थिति, आणि लयस्थान आहे म्हणून (मनुष्यानें) शांत होऊन त्याची उपासना करावी आणि खरोखर ज्ञानमय किंवा कर्ममय पुरुष आहे ज्या प्रकारें इहलोकीं ज्ञान किंवा कर्म (क्रतु) यांचें अवलंबन मनुष्य करतो त्याप्रमाणें तो मेल्यावर (येथून गेल्यावर) होतो, (म्हणून) त्यानें ज्ञान किंवा कर्म संपादावें प्राण-शरीर धारण करणारा मनोमय हा आत्मा आहे" हें वाक्य छां० उ० (३ १४,१) या ठिकाणीं येतें "प्राणरहित, मनरहित, शुभ्र तो चैतन्य पुरुष" हें वाक्य मु० उ० (२ १,२) या ठिकाणीं आलें आहे या दोन्ही वाक्यांमध्यें प्राण आणि मन या दोन्ही शब्दांचा उपयोग केला आहे तेणेंकरून त्याचा अर्थ उपनिषद्-

matter is only either the essential substance or Brahma as modified. Again, phenomenal existences are many and varied, while the essential substance is only one, yet it is to be conceived in three different forms Phenomena appear (Âvirbhâva) and disappear (Tirobhâva) But they are never created or destroyed. This is the gist of Vallabha's system of Vedânta When these distinctive features of the four systems of Vedânta are attended to, the reader will find it easy to examine the interpretation offered either of the sûtra or of the Upanisad texts The first sûtra of the second chapter thus introduced equally supports the four systems of Vedânta The following is the translation of the Upanisad texts quoted in connection with this sûtra. "Indeed, this whole Brahma (essential substance) is the cause of the creation stability and destruction of the world Man, therefore, becoming calm, is to worship Him And indeed, (that) Person is either full of intellectuality or of activity As man seeks and depends upon either intellectuality or activity in this world so he becomes after death. Therefore, he ought to acquire either intellectuality or activity This spirit (Âtmâ), when affected by thought and feeling (Manomaya), supports and holds the airy body or envelop" Five envelops are mentioned—the material (Annamaya), the airy (Prânamaya), the envelop of thought and feeling (Manomaya), the envelop of pure intellectuality (Vijnâna maya) and the envelop of pure

सूत्राणि.

विवक्षितगुणोपपत्तेश्च ॥ २ ॥

भावार्थः । विवक्षितानां गुणानामुपपत्त्याऽनुसंधास्यमानानां वाक्यानां परब्रह्मण्येव पर्यवसानमिति सामान्यसूत्रार्थः । तत्र के विवक्षितगुणा इति विचारः । यथा अपौरुषेये वेदेऽपि पौरुषेयत्वेन तस्य निरूपणानि तथैतेषां गुणानां व्यवस्थेति शंकराचार्यः ॥ वक्ष्यमाणा गुणाश्च परमात्मन्येवोपपद्यंत इति रामानुजः ॥ विवक्षितगुणोपेतस्तु विष्णुरिति मध्वः ॥ विवक्षिता लोकांतरे सादृशरूपप्राप्तिः सा प्रकृतेऽप्युपपद्यते । भगवत्सरूपलाभात् सारूप्यलाभाद्वेति वल्लभः ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

आत्माऽपहतपाप्मा + सत्यकामः सत्यसंकल्पः । छां० उ० (८.७,१.) ॥ आकाशात्मा । छां० उ० (३.१४,२.) ॥ त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी । त्वं जीर्णो दंडेन वंचयसि त्वं जातो भवसि विश्वतो मुखः । श्वे० उ० (४.३.) ॥ सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखं । सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति । श्वे० उ० (३.१६.) ॥ अप्राणो ह्यमनाः शुभ्रः । मुं० उ० (२.१,२.) ॥

मध्यें कसा समजायाचा, हें वाचकास सहज कळेल. "सर्व जगाचा कर्ता आणि दोषरहित सर्व त्याचे संदेत" छा० उ० (३ १४,२.) "जवाच्या दाण्यापेक्षा किंवा तांदुळाच्या दाण्यापेक्षा सूक्ष्म, माझ्या हृदयामध्यें हा (आत्मा) आहे. पृथ्वीपेक्षा अंतरिक्षापेक्षा आणि आरमानापेक्षां मोठा असा हा माझ्या हृदयांत आहे." छा० उ० (३ १४,३)

pleasure (Ânandamaya) In the above Upanisad-texts only two are referred to. The text occurs in the Chhândogya Upanisad(III 14, 1) "The Spiritual Person (is) white, without thought or feeling and without the airy envelop." This text occurs in the Mundaka-Upanisad (II 1, 2) In these texts the terms prâna (breath) and mana (mind) are used. They refer to the envelops we have already explained. 'Creator of the whole world—his

२. (वेद आणि उपनिषद्वाक्यांमध्यें ब्रह्माचें निरूपण आहे.) कारण ज्या गुणांचें वर्णन इष्ट आहे त्यांची उपपत्ति करतां येते.

2. Brahma is described in Vedic and Upanisad texts, because the attributes of Brahma sought to be described, can be adequately ex-explained.

---

१. मूळ संस्कृत सूत्रामध्यें विवक्षितगुण असा शब्द आहे त्याचा चार वेदान्तवादी चार प्रकारचा अर्थ करतात तो असा शंकराचार्य म्हणतात कीं, वेद अपौरुषेय म्हणजे कोणी पुरुषानें केलेले नसून, ते पौरुषेय म्हणजे कोणी पुरुषानें केले आहेत असा जो व्यवहार होतो त्याचे नांव विवक्षित गुण. जें नाहीं तें आहे असें केवळ सोयीकरितां वर्णन केलेलें असतें हा न्याय ब्रह्माचे वर्णनास लावावा. हा शंकराचार्यांचा अभिप्राय रामानुज म्हणतात कीं, ज्या गुणांचें वर्णन येणार आहे, जे गुण आम्हास इष्ट आहेत, ते गुण परमात्म्याचे, असें म्हटल्यानें त्याची संगती नीट पटते, त्याची उपपत्ति होते. मध्वाचार्य म्हणतात कीं ज्या ज्या गुणांचें वर्णन करावें म्हणून आमच्या मनांत येतें त्या त्या गुणानें संपन्न विष्णु. वल्लभ म्हणतात कीं परलोकीं जें रूप इष्ट आहे, जें रूप आम्हास तेथें प्राप्त होणार आहे, तें रूप कसें आहे हें इहलोकीं नीट समजून सांगतां येतें कारण भगवत्स्वरूपाचा लाभ होतो. मग पतासारखें रूप प्राप्त होतें. जीं उपनिषद्वाक्यें हें रूप लावतांना घेतात त्यांचें

plans are without any fault" see the Chhândogya Upanisad (III. 14, 2) "This spirit is in my heart finer than a grain of rice or of barley and larger than the firmament and the heavens" See the Chhândogya-Upanisad (III 14, 3)

2 In the original Sanskrit sûtra the term *Vivaksita-guna* (attributes sought to be described) is used It is explained in four different ways by the four different schools of Vedânta philosophy Shankarâchârya states —*that though the Vedas* are not revealed by any Personal God (Apourusya), yet in common conversation it is a practice to consider them to be revealed by Personal God This is what is meant by Vivaksita guna. What does not really exist is stated to exist merely for offering a convenient explanation This principle applies to the description of Brahma Râmânuja observes —that *Vivaksita-guna* includes those attributes which are yet to be described, and which, we see are, to be found in the Supreme Spirit. Such a position enables a thinker to offer an adequate explanation of Vedic and Upanisad texts. Madhvâchârya states that Visnu alone possesses those qualities which we are naturally prompted to esteem, and

सूत्राणि.

अनुपपत्तेस्तु न शारीरः ॥ ३ ॥

भावार्थः । अनुपपत्तिप्रसंगाच्च् छारीरो नाम जीवो नोपासनीयः । कथमनुपपत्तिप्रसंगः । ज्यायान् पृथिव्या इति चैवंजातीयका गुणा न शारीरे आञ्जस्येनोपपद्यंत इति शंकरः ॥ तमिमं गुणसागरं पर्यालोचयतां खद्योतकल्पस्य शरीरसंबंधनिबंधनापरिमितदुःखसबंधयोग्यस्य बद्धमुक्तावस्थस्य जीवस्य प्रस्तुतगुणलेशसंबंधोपि नोपपद्यत इति रामानुजः ॥ एकस्य सर्वशरीरस्थत्वानुपपत्तेरिति मध्वः ॥ न च प्राणशरीररूपो जीवो भवति। तिरोहितानदत्वेन विकारत्वादिति वल्लभः ॥

अनुसधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

सत्यसंकल्प आकाशात्मा + + अवाक्यनादरः । + + + ज्यायान् पृथिव्या ज्यायानंतरिक्षात् । छां० उ० (३.१४,३.) ॥ आकाशवत्सर्वगतश्च नित्यः ॥

मग्यातर एणेप्रमाणें "ज्यानें पापरूप पुरुषाचें हनन केलें आहे, ज्याच्या इच्छेप्रमाणें सर्व घडतें, ज्याचा सत्कल्प सत्य आहे, तो आत्मा हुडकायाचा" छां० उ० (८ ७,१.) "आकाशात्मा (ज्ञान्याच्या हृदयामध्यें आहे)" छां० उ० (३ १४,२) "तू स्त्री, तू पुरुष आहेस, तू कुमार किंवा कुमारी, तू म्हातारा होऊन काठी घेऊन चालितोस तू जन्मून चोहोंकडे तुझें मुख आहे असा होतोस" श्वे० उ० (४ ३) 'चोहोंकडून त्याला हात पाय, चोहोंकडून डोळे, मुख आणि मस्तक चोहोंकडून त्याला कान, असें सर्वांला व्यापून हा सर्वामध्यें राहिलें आहे" श्वे० उ० (१३.)

describe Vallabha observes that we obtain here that form which we seek to obtain in heaven, and, therefore, we are able to offer an adequate explanation of it We obtain the form of Brahma. We become like Brahma The following is the translation of the Upanisad-texts quoted in connection with this sûtra "That spirit is to be sought", whose design is truth, whose wheel regulates everything in this universe, and who has destroyed Personal Sin"—(Chhândogya-Upanisad (VIII 7, 3) "The ethereal spirit is in the heart of knowledge" (Chhândogya-Upanisad, II 14, 2) "Being a woman or being a man, being a boy or being a girl, being an old man, thou deceivest, leaning on a

३. पुनः, जीव (उपासनीय) नाहीं. कारण (उपनिषद् आणि वेदवाक्यांतील निरूपणाची) उपपत्ति करतां येत नाहीं.

3. Again the human spirit is not to be worshipped; because the Upanisad and Vedic texts (if referred to the human spirit) can not be adequately explained.

"प्राणरहित, मनरहित, शुभ्र तो चैतन्य पुरुष." मु० उ० (२.१,२.)

१. पूर्वी जीं उपनिषदांतील वाक्यें घेतलीं आहेत, त्यामध्यें पृथ्वीपेक्षा मोठा, आकाशापेक्षा मोठा, असें आत्म्याचें वर्णन केलें आहे. तें वर्णन शरीरांतील जिवास लागू पडत नाहीं. असें शंकराचार्यांचें म्हणणें. रामानुज म्हणतात कीं दुःखाच्या अवस्थेंत जीव सांपडला आहे. शरीर संबंधानें त्याला अनेक क्लेश भोगावे लागतात. त्याच्या अंगीं गुणाचा लेशही नाहीं. असा जीव कोणीकडे आणि गुणसागर परमात्मा तो कोणीकडे? मध्वाचार्य म्हणतात. एकच जीव सर्व शरीरामध्यें आहे असें कसें समजेल? वल्लभाचार्य असें म्हणतात कीं प्राणाशीं आणि शरीराशीं ज्याचा संबंध आहे तो जीव परब्रह्म नव्हे. कारण आनंदाचा तिरोभाव होऊन विकार झाला आहे. वल्लभाचें हें वचन विशेष लक्ष देण्याजोगें आहे, कारण परिणामवादाचें स्वरूप त्यावरून कळतें. उपनिषद्-वाक्यांचें भाषांतर करावयाचें. "ज्याचा सत्यसंकल्प असा आकाशात्मा + + त्याला शरीरादि अवयव नाहींत आणि मोह नाहीं. पृथ्वी

walking stick, (the world) Being born, thou facest all directions" (Shve-Up. IV 3) "He has hands and feet on all sides he has his eyes, face and head on all sides he has beard on all sides thus occupying all, he is seen in this world" (Shve-Up III 16) "Without breath, white is that Personal Spirituality" Mun-Up II 1, 2)

3 The Upanisad texts quoted in this connection state that the Spirit is larger than this earth, and larger than the heavens Such a description can not apply to the human spirit This is the way Shankarâchârya interprets the sûtra. Râmânuja observes that the human spirit is engrossed by much sorrow, and has to suffer much pain on account of its connection with the material body It has not got a particle of any good quality Such a human spirit can not be compared to the Supreme Spirit Madhvâchârya states that it is not possible to believe that the same spirit pervades all bodies Vallabhâchârya observes that the spirit, which connects life and human bodies, is not the Supreme Brahma; because happiness, being concealed, is modified in the case of the human spirit. This statement of Vallabhâchârya deserves particular attention, because it throws light upon his

सूत्राणि

कर्मकर्तृव्यपदेशाच्च ॥ ४ ॥

भावार्थः। ब्रह्मणः कर्मत्वेन जीवस्य कर्तृत्वेनाऽनुसंधास्यमानेषु वेद वाक्येषु व्यवहाराद् जीवो ब्रह्मणो भिद्यते। तेन न शारीरो मनोमयत्वादिगुणः। उपास्योपासकभावेऽपि भेदाधिष्ठान एवेति शंकरः ॥ प्राप्ता जीव उपासकः प्राप्य परं ब्रह्मोपास्यमिति रामानुजः ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

एतमितः प्रेत्याऽभिसंभवितास्मि ॥ छा० उ० (३.१४,४) ॥

शब्दविशेषात् ॥ ५ ॥

भावार्थः। शब्दविशेषैर्जीवब्रह्मणोर्भेदोऽधिगम्यते। रामानुज इत्थं निरूपयति। एष म आत्माऽन्तर्हृदये इति शारीरः षष्ठ्या निर्दिष्टः। उपास्यस्तु, प्रथमयेति ॥ उपक्रमबलीयस्त्वे जीवः उपसंहारबलीयस्त्वे ब्रह्मेति। यत्रैकस्याऽन्यपरत्वेनैकार्थता संभवति तद्बलीयस्त्वमिति न्यायेन जीवब्रह्मणोर्भेदं व्यवस्थापयति वल्लभः ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

व्रीहिर्वा यवो वा श्यामाको वा श्यामाकतण्डुलो वैवमयमन्तरात्मन् पुरुषो हिरण्मयः। श० ब्रा० (१०.४,६,२) ॥

पक्षा मोठा आणि आकाशापेक्षा मोठा' छा० उ० (३.१४.३) आकाशाप्रमाणें सर्व ठिकाणीं असणारा नित्य आहे "

doctrine—Parmāmavāda or the doctrine of transformation. The following is the translation of the Upanisad texts connected with this sūtra. "That ethereal Spirit whose design is truth. He has no body and is free from all delusion. He is larger than the earth and He is larger than the heavens (Chhān Up-III 14 3) Like ether He pervades all space

४. (उपनिषद् वाक्यामध्यें परब्रह्म) कर्म (आणि जीव) कर्ता असा प्रकार आढळतो म्हणून (जीव उपासनीय नाहीं.)

५. विशेष शब्दाची योजना केली आहे म्हणून (जीव उपासनीय नाहीं.)

4 The grammatical construction of an Upanisad text shows that Brahma is in the objective case, and the human spirit is in the case expressing an agent Therefore, the human spirit is not to be worshipped

5 (The human spirit is not to be worshipped), because of a particular statement (in the Upanisad text)

---

४ ज्या उपनिषद्वाक्यावर हें सूत्र बसविलें आहे, तें उपनिषद्वाक्य हें आहे "एथून गेल्यावर (मेल्यावर) मी (जीव) त्याला (ब्रह्माला) प्राप्त होईन" छां० उ० (३।१४।४) या वाक्यामध्यें ब्रह्म हें कर्म आहे जीव हा कर्ता आहे या वर्णनास अनुलक्षून जीव भिन्न आणि परब्रह्म भिन्न असें वर्णन सूत्रकारानें केलें आहे उपासक जीव आणि उपास्य ब्रह्म ब्रह्मामध्यें आणि जीवामध्यें जो उपास्य उपासक संबंध आहे तेवढाच काय तो दोहोंतील भेदाचा आधार, अशी या सूत्राची शंकराचार्यांनीं व्याख्या केली आहे रामानुज म्हणतात कीं जीव ब्रह्मप्राप्ति करून घेणारा-उपासक, आणि जें प्राप्त व्हावयाचें तें ब्रह्म उपास्य नाना ठिकाणीं बादरायण जीव आणि ब्रह्म यांचा भेद आहे असें वर्णन करतात त्या भेदाची व्यवस्था शंकराचार्य कशी करतात हें एक दोन वेळ पूर्वी

33 The gods like the Sun and the Moon ought to study the spiritual system of the Vedanta They possess the power to do so They have bodies They have spirits They ought to worship the Supreme Spirit and other gods This is the sense of the sûtra The preceding two sutras raise objections against the system of Badarâyana, which he refutes in this sûtra Upon this Shankarâchârya observes — The Veda and Smriti state it distinctly that it is in the power of gods to assume any form they like This is one argument. All substance whatever is animated This is the way the system is based This is the second argument To say that a thing is or is not is determined by experience This is the third argument The Pûrva-Mîmânsâ-system of interpretation consisting in harmonizing texts, by means of dividing them into original statements subordinate statements and re statements, is to be adopted This is the fourth argument It is authoritatively stated in the Chhandogya-Upanishad in what is called Madhuvidyâ Sanvargavidya and others that the gods like the Sun have a title to the knowledge of the Supreme Spirit This is the fifth argument The duties of different stages of life and of different castes were adjusted in ancient times These duties should not be neglected This is the sixth argument By means of occult contemplation, certain

अशा सिद्धि प्राप्त होतात हें सातवें कारण. आम्हाला ब्रह्मविद्या असावी असें देवास वाटणें संभवतें हें आठवें कारण या सर्व कारणामुळ देवादिकाला ब्रह्मविद्येचा अधिकार आहे, अशी उपपत्ति करता येते. आणि याच रीतीनें क्रममुक्तीचीहि उपपत्ति करता येते यावर रामानुज असें म्हणतात कीं ब्रह्म दोन्ही हि अवस्थमध्यें आहे असें आढळतें. एक कारणरूपी, आणि कार्यरूपी अशा ब्रह्माची उपासना करणारास कल्पांतरीं वसु आदित्य इत्यादिकांचें रूप प्राप्त होतें पुढें कारणरूप जें परब्रह्म त्याचें रूप त्यास प्राप्त होतें "अरे बा, हें ब्रह्मोपनिषद् जो जाणतो त्याला रे नेहमी उजेडच कधींहि उदय किंवा अस्त नाही ' छा० उ० (३ ११, ३) अशा ह्या साऱ्या मधुविद्येला ब्रह्मोपनिषद् असें नाव आहे म्हणून आणि त्यामध्येंच ब्रह्मप्राप्ति होई पर्यंत वसु आदित्य यांचें रूप प्राप्त होतें असें वर्णन आहे म्हणून वसु, आदित्य इत्यादिकांना पुढें प्राप्त व्हायाचें जें आदित्याचें रूप त्याचें वर्णन केलें आहे आणि त्या रूपाची उपासना करावी असेंहि सांगितले आहे ती उपासना अशा प्रकारच्या ब्रह्माची आहे असें समजत या रामानुजाच्या भाषणावर आमचें म्हणणें असें आहे कीं प्रकृतीचे सांख्य मतें दोन प्रकार आहेत एक व्यक्त आणि एक अव्यक्त अव्यक्त ती नित्य, आणि व्यक्त ती अनित्य प्रकृति ही ब्रह्माची अवस्था ही कार्यावस्था परब्रह्म म्हणजे कारण लोक पुरुषोत्तम

persons obtain the powers of assuming either a large or small form This is the seventh argument The gods are likely to aspire *after* the knowledge of the Supreme Spirit This is the eighth argument. It can be, therefore, stated with propriety that the gods have a title to the *knowledge of the Supreme Spirit*, and that there are different stages of salvation Upon this Ramânuja observes —Brahma or the Supreme Spirit is seen in two conditions that of cause and that of effect He, who worships it as both cause and effect, obtains after some revolutions of time, known as mundane revolutions, the form of the Sun, Vasu and others Then they obtain the form of the Supreme Spirit which is the cause He, who knows this Brahmopanisad is always in the light, unto him either a rise or darkness is not known All this knowledge of the Supreme Spirit known as Madhu vidyâ Sanvarga vidyâ, is Brahmopanisad, and till the Supreme Spirit is attained to the form of the Sun and Vasus is obtained, and till this form is obtained, and in the mean time, who is to be worshipped? All this is explained The worship thus referred to is the worship of the Supreme Spirit both as cause and effect We have to remark that Prakriti or essence of matter is described by the Sankhya-philosophers as existing in two conditions—manifest and non manifest or noumenal and phenomenal The one is eternal and the other, transient This Prakriti is one condition of the Supreme Spirit. This is its effect

इतकें समजलें म्हणजे रामानुजाचा लेख लक्षात येण्यास बरें पडेल. आपल्या नेहमीच्या परिपाटीप्रमाणें मध्वाचार्य आपल्या सिद्धांतास पुराणाचा आधार देतात. या प्रसंगीं त्यानीं स्कंदपुराणांतील वाक्य घेतलें आहे. तें असें. "श्रेष्ठ जें तत्व, परब्रह्म, त्याची जितकी जितकी सेवा करावी तितकें तितकें सुख प्राप्त होतें. विष्णु सोडून बाकीच्यास अप्रकाश म्हणजे अज्ञान होण्याचा संभव आहे. आणि देवादिकाच्या अंगीं सामर्थ्य आहे. म्हणून त्या देवादिकांना उपासना किंवा यज्ञादि कर्में केलीं पाहिजेत असें विधान आहे." या मताविषयीं आम्हांस असें सुचविलें पाहिजे कीं विष्णु तोच परमेश्वर देवादिक ते मनुष्याच्या वरील कोटींतील त्यांना ज्ञान विशेष आहे, सामर्थ्य विशेष आहे खरं; तथापि अज्ञान होण्याचा संभव आहे. म्हणून त्यांनीं यज्ञयागादि कर्में आणि उपासना करावी या मताप्रमाणें परमेश्वराचा अवतार होतो या मताचें आणि रोमन क्याथलिक मताचें साम्य आहे याचा वाचकांनीं विचार करावा यावर वल्लभाचार्य असें म्हणतात कीं वसु हे जे देव ते परब्रह्माचे अवयवच आहेत त्यांना भक्षणादि नाहींत बरें, असें नव्हे म्हटलें तर विरोध येतो तो कसा? वसूंना प्रातःसवन अर्पण करावें याचा अर्थ देवाना तें प्रातःसवन अर्पण करावें, म्हणजे यज्ञ पुरुष परमेश्वराला तें अर्पण करावें मग वसु कोणी जीवविशेष आहेत असें म्हणून कसें चालेल? या कारणामुळे

The Supreme Spirit is always the supreme and first cause It is the Highest Person. After this explanation we believe that the statements of Râmânuja will be easily understood Madhvâchârya, as is usual with him, quotes Purânas in support of his statements On this occasion he refers to the Skanda-purâna, the text from which is—the more one worships the Highest Spirit, the more happiness he obtains; but all except Visnu are likely to be affected by darkness or ignorance. Gods and others possess power, therefore, they should worship other gods and perform sacrifices as well This is an injunction About this statement of Râmânuja we have to observe that by Visnu the Highest Person is meant The gods are only beings higher than men, and though they possess special knowledge and special powers, yet they are likely to be affected by ignorance, or to fall. Hence it is their duty to perform sacrifices or to worship According to this school, the Highest Personal God becomes incarnate. The reader may well compare these doctrines with those of the Roman Catholics, because there is considerable analogy between them Upon this Vallabhâchârya observes —gods like the Vasus are so many parts of the Supreme Spirit They are above food. A contradiction to this involves us in an absurdity. To say that the morning libation should be offered to Vasus, is to say that it should be offered to God—to Personal sacrifice Then it would not do to say that Vasus are higher celestial beings

हें जें छांदोग्य उपनिषदांतील वाक्य घेतलें आहे त्यामध्यें ब्रह्मविचारच आहे. देवासारखी ज्याची उपासना करावयाची तो परब्रह्माचा अंश आहे. तो आधिदैविक आहे. वसु म्हणजे कोण? निरनिराळ्या ग्रंथामध्यें यांनीं निरनिराळीं नावें आढळतात. सागर, (आप) ध्रुवनक्षत्र, वायु, अग्नि, प्रातःकाल (उषा), आणि तेज. या वल्लभाच्या मतावर आमचें असें म्हणणें आहे. वल्लभमतें परब्रह्म म्हणजे शुद्ध आनंदराशि, प्रलयसमयीं हें परब्रह्मच शुद्ध अवशिष्ट राहतें. उत्पत्ति होऊं लागली म्हणजे त्याचीं तीन रूपें प्रकाशमान होतात. या तिहींमध्येंहि साक्षात् ब्रह्मानंद आहे. प्रथम शुद्ध ब्रह्म. याच्या खालीं देव-कोटी. त्यामध्यें आनंद आणि दुसरीं ऐश्वर्यें कमी आहेत. कारण जीवन ते. याच्या खालीं मनुष्य-कोटी. मनुष्यामध्यें आनंद अतिशय कमी, आणि तो क्षणांत कमी जास्ती होतो. इतका हा परब्रह्म आणि मनुष्य यामधील आनंदाच्या तारतम्याविषयीं विचार. आतां परब्रह्म म्हणजे आनंद सत् आणि चित्, म्हणजे सच्चिदानंद. त हा सत् आणि चित्, या दोन अंशाचा वल्लभमतें विचार व्हावयाचा आहे. सत् म्हणजे प्रकृति आणि चित् म्हणजे पुरुष. मग पुरुष आणि प्रकृति एकत्र होऊन जगत् आविर्भूत झालें. जगत् नित्य. हीं सारीं देवादि सृष्टि नित्य. हा सारा ब्रह्मपरिणाम. ब्रह्मपरिणामाचा निराभार झाला का ब्रह्मरूपत्व होतो आणि ब्रह्माचा परिणाम झाला का ब्रह्म आविर्भाव होतो म्हणजे

The consequence of this is then that all statements made in the Chhândogya-Upanisad in the course of the Brahmopanisad refer to the Supreme Spirit, direct parts of which are the gods to be worshipped—yes—the parts in which the Supreme Spirit predominates (Adhidaivika). Who are these gods called Vasus? In different works they are differently enumerated,—the Ocean (waters) the Polar Star, Air, Agni, Morning (Usâ), and Light. Upon this statement of Vallabhacharya, we have to observe that according to him, the Supreme Spirit is a mass of pure delight. When everything else is destroyed on the occasion of a mundane revolution the Supreme Spirit, pure and simple, remains. On the occasion of the re-creation of the world it manifests itself in three forms, in which delight is directly to be seen. The first and the highest is the Supreme Spirit, abounding in pure delight, below it are the gods, who have delight and powers inferior to that of the Supreme Spirit, because they are mere beings created or manifested, below them are human beings, who possess little delight capable of decrease or increase in a moment. This is the comparative scale of the degrees of delight as it is possessed by the Supreme Spirit, by gods and by human beings. Now the Supreme Spirit is delight (Ânanda), existence (Sat), and knowledge (Chit). He is Sachchidânanda. The Supreme Spirit as Delight is already explained. The Existent and the Knowing—these two attributes of the Supreme Spirit are to be

जगत् उत्पन्न होतें. या सूत्रसंबंधानें जी उपनिषद्वाक्यें आलीं आहेत त्यांचें भाषांतर एणेंप्रमाणें. "पुढें देवांमधून ज्यानें ज्यानें तें ओळखलें तेंच तो झाला; तसेंच ऋषीमधून (ज्याने ज्यानें ते ओळखलें तेच तो झाला) तसेंच मनुष्यांमधून." "अरे, ते म्हणाले इहहा! तो आत्मा म्हणजे काय हे आम्हास कळावें अशी इच्छा आहे. ज्या आत्म्याला ओळखल्यापासून जीवास सर्व लोक प्राप्त होतात; त्याच्या सर्व कामना परिपूर्ण होतात; असें म्हणून देवांमधील इंद्र आणि असुरांमधील विरोचन हे दोघेजण बाहेर पडले" "हे मेधातिथीच्या मेंढ्या, (म्हणजे हे इन्द्रा असें संबोधन त्यास कां दिलें? (कोणी एका प्रसंगी) कण्वाचा नातु, ज्याचें नाव मेधातिथि, ह्या मेधातिथीला इंद्रानें मेंढा होऊन उपटून नेलें." "आदित्य पुरुष होऊन त्यानें कुंतीशीं समागम केला." 'माती बोलली,' "जलें बोलला" "वायुदेवतेस अर्पण करायाचा पांढरा बोकड त्यानें मारावा. (त्यानें म्हणजे कोणी?) ज्याला ऐश्वर्याची इच्छा आहे त्याने वायु रे अतिशय जलद देवता आहे. म्हणून यज्ञभाग घेऊन वायुजवळ धावत (तो) जातो. आणि तो वायु याला ऐश्वर्याप्रत पोंहोचवितो." "ज्या देवतेस उद्देशून हवि हातामध्यें घेतला असेल, तो वषट्कार म्हणून त्या देवतेचें ध्यान करावें" "स्वाध्यायानें अध्ययन केलें असता इष्ट देवता प्राप्त होते." "पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश या पांचांची धारणा (शरीराच्या पांच भागी) केली

explained according to Vallabhâchârya The (*Sat*) or the Existent is the Prakriti or the essence of matter, and *Chit* or the Knowing is the Person. Thus the Prakriti and the Purusa together manifest the world The world or the universe is eternal. All the gods above are eternal. These are *all the Supreme Spirit* transformed When the Supreme Spirit, draws itself into itself, the whole universe or the phenomenal existence disappears By a transformation of the Supreme Spirit it manifests itself, and the universe or the phenomenal existence appears The following is the translation of the Upanisad-texts quoted in this connection.

Out of the gods he, that knew it became it himself In like manner out of the *Risis* (he, that knew it, became it himself) In like manner out of the human beings" "Ah! they said—we desire to know what the soul is From knowing the soul or the spirit, the human spirit attains to all regions, and has all his desires fulfilled—so saying Indra from among the gods and Virochana from among the Asuras, set out" "Oh thou ram of Medhatithi, (this is the way Indra was once addressed, and the cause of this is—once) the grandson of Kanva named Medhâtithi was carried away by Indra in the form of a ram" "The Sun assumed the form of man and joined Kunti in conjugal love' "The earth stated' 'The waters stated" "He, who desires prosperity ought to kill a white goat to be offered to the god Vâyu" "Well, Vâyu is an extremely swift deity. He, there-

असतां अणिमादि ऐश्वर्य प्राप्त होऊन त्या योग्याला रोग होत नाहीं, म्हातारपण येत नाहीं, दुःख प्राप्त होत नाहीं, योगापासून प्राप्त झालेलें शरीर त्याला मिळालेलें असतें म्हणून." (पूर्वी वर्णिलेले शरीराचे पांच भाग ते कोणते? तळव्यापासून गुडघ्यापर्यंत हा एक भाग, गुडघ्यापासून बेंबीपर्यंत दुसरा भाग, बेंबीपासून मानेपर्यंत तिसरा भाग, मानेपासून केसापर्यंत चवथा भाग, आणि त्यापासून ब्रह्मरंध्रापर्यंत पांचवा भाग.

fore, runs to Vâyu with a sacrificial portion, and this Vâyu grants him prosperity." "He ought to contemplate that Deity for whom he holds an oblation in his hand, and to whom he pronounces the sacrificial form Vasat." "One sees the desired deity by studying the Svâdhyâya" "The earth, the waters, the light, the air, and æther—when these are steadily contemplated in reference to the five parts of the human body, the Yogi obtains the powers of becoming gross or subtle and is not affected by any disease, does *not become old, does not become* sorry; because he has a body, which Yoga-contemplation secures. (What are the five parts of the human body *already* referred to? The one part is from the sole of the foot to the knees, another part is from the knees to the navel; the third part is from the navel to the neck; the fourth part is from the neck to the hair, and the fifth part is from the hair to the *Brahmarandhra*, the spiritual aperture in the crown of the head)"

सूत्राणि.

शुगस्य तदनादरश्रवणात् तदाद्रवणात् सूच्यते हि ॥ ३४ ॥

भावार्थः। कश्चित् पूर्वपक्षकारो ब्रवीति। यदि सर्वेषां मनुष्याणां देवानां च ब्रह्मविद्यायामधिकारस्तर्हि मनुष्यांतःपातित्वाच्छूद्राणामधिकारः स्यादिति प्राप्ते बादरायणो ब्रवीति । जानश्रुतेराख्यायिकायां शूद्रशब्दस्य यः प्रयोगः कृतः स तु योगतो न रूढितः। शुक् शोकः। जानश्रुतेः शोकः स्वानादरोक्त्या। तया च स दुद्राव । तेन शूद्रपदं सिध्यति। एतादृशं शूद्रपदं जानश्रुतिमुद्दिश्य ऋषिः प्रयुक्तवान्। वस्तुतस्तु जानश्रुतिर्न शूद्र इति छांदोग्योपनिषदाख्यायिकाया व्यवस्था ॥ तत्र तदाद्रवणाच् छुचमभिदुद्राव शुचा वाऽभिदुद्रुवे शुचा वा रैंकमभिदुद्रावेति शूद्रावयवार्थसंभवाद् रूढार्थस्य चाऽसंभवादिति शंकरः ॥ अतः शूद्रशब्देन विद्योपदेशयोग्यताख्यापनार्थं शोक एवाऽस्य सूचितो न चतुर्थवर्णत्वमिति रामानुजः ॥ तस्माच्छुचं प्रत्याद्रवणादेव शूद्रपदप्रयोगो न जातिशूद्रवाचीति वल्लभः ॥ शुग् द्र एव शूद्रो रुद्र इतिवदिति मध्वः ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

तस्माच्छूद्रो यज्ञेऽनवक्लृप्तः। तै० सं० (७.१,१,६.) ॥ कं वर एनमेतत् संत॰ सयुग्वानमिव रैकमात्थेति । + + + अह हारे त्वा शूद्र तवैव सह गोभिरस्त्विति। छां० उ० (४.२,३.) ॥

३४. त्याचा अनादर वर्णिला आहे आणि त्याचें पलायन (वर्णिलें) आहे; ह्मणून ह्याचा शोक असें निष्पन्न होतें.

34. His sorrow is suggested; because of the description of disrespect to him, and because of his flight.

३४. कोणी पूर्वपक्षकार असें म्हणतो कीं सर्व मनुष्यांना आणि देवांना जर ब्रह्मविद्येचा अधिकार आहे, तर मनुष्य म्हटलें कीं त्यामध्यें शूद्रहि आले. मग शूद्रालाहि अधिकार आहे असें प्राप्त झालें. या पूर्वपक्षाचें बादरायण या सूत्रीं खंडन करतात असें भाष्यकार म्हणतात. आणि या धोरणानेंच या सूत्रावर व्याख्या करतात. परंतु चारीहि भाष्यकारांचें म्हणणें आम्हास प्रामाणिक दिसत नाहीं. ज्यास आपली आत्मस्थिति पाहून शोक झाला, ज्याला संसाराविषयीं अनादर उत्पन्न झाला आहे, आणि ज्यानें संसारापासून पलायन केलें आहे, त्यास अधिकार, असें मागें जें निरूपण झालें आहे त्यावरून शूद्राधिकार सुचविला जातो. 'हि' पद सूत्रांत आहे त्याचा अर्थ 'कारण' असा करावा. मागाल सूत्रांत जो वादविवाद झाला आहे त्या वादविवादाचा उपसंहार या सूत्रांत केला आहे. आणि असा सूत्राचा अर्थ लावण्यास अडचण कोणतीच नाहीं. कारण चोखामेळ्यासारखे ब्रह्मज्ञानी होऊन संतमालिकेमध्यें शोभतात. ब्राह्मण्याचा उत्कर्ष करणें आणि बौद्धांचें खंडन करणें अशा समयीं जी व्यवस्था करावी

34 An opponent states — if all men and gods are entitled to the knowledge of the Supreme Spirit, then Shûdras, being men, are necessarily included The conclusion is—the Shûdra is entitled to the knowledge of the Supreme Spirit. These statements of the opponent, Bâdarâyana seeks to refute in this sûtra. Commentators develop this refutation. But we find it difficult to accept the conclusion of all the four commentators. He, who was distressed at the condition of his soul, in whom disregard for the world was produced, and who fled from the world, has a title. All this is suggested by what has already been stated. The term *hi* is used in the sûtra. It means *because*. The sûtra under examination gives the summary of the controversy in the preceding sûtras. Thus the sûtra can be properly interpreted and adjusted, because good men like Chokhâmelâ knew the secret of the knowledge of Brahma, and are known to be saints The social adjustments, made at the time of the Brahmanical revival and of the decline of the Buddhists, are not now recognized throughout India. On the contrary, it is now established that all castes have a title to the

लागली ती व्यवस्था आज सर्व भरतखंडभर जनास पटत नाहीं. ब्रह्मज्ञानाचा अधिकार सर्वांस आहे. अशीच सर्व जनाची समजूत आहे. आमच्या संप्रदायाप्रमाणे चारहि भाष्यकाराच्या मतानं आम्ही निरूपण करतों यावर शंकराचार्य असें म्हणतात कीं छांदोग्य उपनिषदामध्यें जानश्रुतीची कथा आहे त्या कथेचें अनुसंधान या सूत्रीं केलें आहे ती कथा अशी "उन्हाळ्यामध्यें जानश्रुति नावाचा राजा वाड्याच्या गच्चीवर निजला होता. त्यानें अन्नसंतर्पण फार केलें होतें म्हणून ऋषिजन संतुष्ट होऊन हंसाचें रूप धारण करून या राजाचें कांहीं कल्याण करावें म्हणून त्या तटमजल्यात येऊन बसले. सर्वांच्या मागें जो हंस होता तो सर्वांतील पुढील हंसास म्हणाला —अरे, का पहात नाहींस या जानश्रुतीचें तेज स्वर्गास व्यापून अवशिष्ट राहिलें आहे? तें तुला जाळून टाकील पुढें जाऊं नको त्याला सर्वांतील पुढील हंसानें उत्तर दिलें कीं कोणी एक विद्याहीन, नीच, असा जो हा जानश्रुति राजा त्याला गाडीपाशीं निजलेला जो रैक त्याची उपमा कशी देतोस? आणि हें काय बोललास? रैक जो आत्मज्ञानी त्याचें असें तेज, या आत्मज्ञानहीन राजाचें तें तेज कोठलें? असल्या हंसानें म्हणण्याचा अभिप्राय काय? हा राजा त्या गाडीवरून रैकाला ओळखून काढील आणि त्याच्या पाशीं जाईल मग राजा पुढें जागा झाला आणि त्यानं द्वारपाळास म्हटलें, अरे गड्या, ऐवढा

knowledge of the Supreme Spirit (Brahma vidya) At least this is universally believed As is usual with us, we shall lay before the reader explanations of the sûtra by all commentators. Shankarâchârya observes —there is the story of Jânashruti in the Chhândogya Upanisad The story is referred to in the sûtra. It is as follows "On a day in summer, a king of the name of Janashruti slept in his turret Because he had dispensed large quantities of food to the poor, the Risis assumed the form of swans, and appeared on the first story that the king might be benefited A swan in the rear addressed a swan in the van" Why do you not see how the glory of Janashruti fills heaven itself and it is not yet exhausted? "Take care lest you be consumed by it Do not approach him ' The swan in the van thus replied "How do you compare king Jânashruti, ignorant and low, to Ranka lying near a cart, and what do you say? Ramka has such a glory—Ramka, who possesses spiritual knowledge Jânashruti, who is innocent of all spiritual knowledge, cannot possess it What is the purpose of this speech of the swan? That the king may go to the cart finds out Saint Ramka and approach him ' (All this is heard by the king in a dream) When awakened, he called to a warder. Well, who is this Ranka so famous! Go and find him out ' The warder searched for him but could not find him He returned and said to the king that he could not find him Upon this the king told him to search

कोठा हा रैक कोण आहे ? जा, त्याला हुडकून काढ इकडे तिकडे द्वारपालानें शोध केला परंतु रैक त्याला सांपडला नाहीं. मग मला रैक सांपडत नाहीं म्हणून तो राजास म्हणूं लागला पुन ज्या ठिकाणीं ब्राह्मण वास करतात त्या ठिकाणीं याचा शोध कर मग पुन द्वारपालानें शोध केला आणि त्याला रैक भेटला तो रैक आपला गाडीला आंग खाजवीत बसला होता मग काय हो दुर्दीन रैक का असें द्वारपालानें त्यास विचारलें तो म्हणाला होय मीच रैक मग रैकाचा शोध लागला असे राजापाशीं येऊन द्वारपालानें सांगितलें पुढ राजानें तो दरिद्री आहे असें समजून पुष्कळ द्रव्य, पुष्कळ गायी, आणि एक खेचरांची गाडी इतकीं घेतली आणि राजा रैकास देण्याकरता गला, आणि म्हणाला, हे रैक, हें सारें द्रव्य घ आणि ज्या देवतेची तू उपासना करतोस ती देवता कोण हें मला सांग त्याला रैकानें उत्तर दिल अरे शूद्रा ह्या गायी तुझ्या तुज पाशीं असू द पुन पुष्कळ द्रव्य घेऊन, अधिक गायी घऊन, तीच खेचराची गाडी घेऊन आणि आपली एक मुलगी घऊन राजा रैकाकडे गेला आणि त्याला म्हणाला ह द्रव्य, ह्या गायी ही गाडी, आणि ही मुलगी आणि ज्यांत बसला आहेस तो गाव, हीं सारी घे आणि मला ती विद्या शिकीव पुढें त्या रैकानें तें द्रव्य स्वीकारलें आणि राजकन्येच्या मुखास हात लाविला आणि म्हणाला हे शूद्र, ह्या मुखानें तू मजशीं बोलशील

for Rainka in a place where Brahmanas generally resided Upon this, the warder made a search and found Rainka—Rainka who was scratching his back against the cart. The warder asked him if he was Rainka. Rainka said that he was he The warder returned to the king and said that Rainka was discovered The king knew that Rainka was extremely poor, and taking with him for gifts to Rainka an immense quantity of money, thousands of cows and a cart to which mules were yoked, approached him, and said to him—*oh Rainka, take all this wealth, and tell me who the god is whom you worship* Rainka replied—oh Shûdra, let these cows remain with you as they are The king went to Rainka the second time with more money, with more cows the same cart to which mules were yoked, and with one of his daughters and said—Oh Rainka, teach me that science, take all this money, these cows this cart, this daughter, and even the village in which you are Rainka upon this, accepted the gifts and touching the face of the daughter of the king said—'oh Shudra you will talk with me through this mouth The places where all this happened, are still known as Rainka Parna They are situated in a country called Mahâvrisa The science which Rainka thus explained to Jânashruti, is known as Sanvarga vidyâ the essence of which is that air is principal among the gods and breath is principal among the senses The question is—was Jânashruti a real Shûdra or is he referred to in the story

ज्या स्थळीं ही वार्ता घडली त्या स्थळाची अद्यून रैकपर्ण अशी प्रसिद्धि आहे आणि ती स्थळें महावृष देशामध्यें आहेत" मग त्या रैकाने त्या जानश्रुति राजास जी विद्या सांगितली तिचें नाव सवर्ग-विद्या तिचें मुख्य तत्त्व इतकेंच की देवामध्यें वायु मुख्य, आणि इंद्रियामध्यें प्राण मुख्य ही कथा घेऊन द्विज मध्यें जो शूद्र शब्दाचा प्रयोग केला आहे तो केवळ लाक्षणिक आहे शूद्र म्हणजे खरा शूद्र-जातीचा मनुष्य नव्हे, शूद्र म्हणजे ज्याला शोक झाला (शुक्) आणि म्हणून जो पळाला (द्र) असा तो जानश्रुति, म्हणून रैक त्याला शूद्र असें म्हणाला वास्तविक जानश्रुति शूद्र नव्हता अशा रीतीनें या कथेची शंकराचार्य व्यवस्था करतात रामानुज याच कथेची अशी व्यवस्था करतात कीं शूद्र शब्दाचा एव्हढाच अर्थ की तो राजा अज्ञान होता आणि विज्ञान प्राप्त होण्याकरता जो शोक लागतो तो त्याच्या अंगीं होता. म्हणून शूद्र म्हणजे खरोखर शूद्र नव्हे यावर वल्लभ असें म्हणतात कीं शोक झाला आणि पळाला असा शूद्र शब्दाचा अर्थ. शूद्र म्हणजे शूद्र-जाति नव्हे. मध्वाचार्य म्हणतात—रुद्र शब्दाची जशी व्युत्पत्ति तशीच शुक् आणि द्र यापासून शूद्रशब्दाची व्युत्पत्ति या संबंधीं उपनिषद्वाक्याचें भाषांतर एणप्रमाणें "म्हणून शूद्राची यज्ञामध्यें योजना नाहीं" "अरे गाडीपाशीं बसलेल्या रैकाची उपमा देऊन आणि ह्या विषयीं असें बोलतोस + + + गायी

(६—४)

merely by way of metonymy? The Shûdra is not a real Shûdra, but one who is afflicted (shuk) and who fled (dra) (Shuk+dra= Shûdra) Such was Jânashruti and, therefore, Raınka addressed him as Shûdra, while he was not a real Shûdra. This is the way Shankarâcharya explains away this story Râmânuja observes —the term *Shûdra* used in the story simply signifies that the king was ignorant, and felt that mental pain, which precedes the acquisition of knowledge. Hence a real Shûdra is not meant in the story Vallabha remarks —the term *Shûdra* consisting of *Shuk* and *dra*, means one afflicted and flying, and not Shûdra by caste Madhvachârya observes —Shûdra is to be derived as the word Rudra is derived The following is the translation of the Upanisad texts quoted "Hence a Shûdra is not employed in a sacrifice" 'Well, comparing to Raınka sitting near a cart, do you say this about him? + + + He said—oh Shûdra, let these cows and this wealth remain with you' This story of Raınka or Raıkka' is given in the Chhândogya-Upanisad (IV 1 1) The examination of the story will show to the reader how it fits in with the sûtra

सूत्राणि.

क्षत्रियत्वगतेश्चोत्तरत्र चैत्ररथेन लिंगात् ॥ ३५ ॥

भावार्थः । जानश्रुतेः क्षत्रियत्वं सिध्यति । तेन न स शूद्रः । कथं सिध्यति । आख्यायिकायामुत्तरत्र चैत्ररथेन समं जानश्रुतेर्वर्णनात् । आख्यायिकायां यथा चैत्ररथस्तथा जानश्रुतिरिति निरूपणाद् जानश्रुतिर्न शूद्रः ॥ तत्र समानाऽन्वययाजिनां च प्रायेण समानाऽन्वया याजका भवंति । तस्माच्चैत्ररथिर्नामैकः क्षत्रपतिरजायत इति च क्षत्रजातिलावगमात् क्षत्रियत्वमस्याऽवगंतव्यमिति शंकरः ॥ रामानुजस्तु सूत्रं विभज्योपक्रमोपसंहाराभ्यां जानश्रुतेः क्षत्रियत्वं स्थापयति ॥ तेन प्रकृतेप्येतौ गुरुशिष्यौ ब्राह्मणक्षत्रियावेवेति गम्यते । तस्मात् न जातिशूद्रः संवर्गविद्यायामधिकारीति वल्लभः ॥ यत्र वेदो रथस्तत्र न वेदो यत्र नो रथ इति च ब्रह्मवैवर्ते इति मध्वः ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

अथ ह शौनकं च कापेयमभिप्रतारिणं च काक्षसेनिं परिविष्यमाणौ ब्रह्मचारी बिभिक्षे । छां० उ० (४.३,५.) ॥ एतेन वै चैत्ररथं कापेया अयाजयन् ॥ तस्माच्चैत्ररथिर्नामैकः क्षत्रपतिरजायत ॥

आणि द्रव्य, हे शूद्र, तुझें तुला असो असें म्हणाला." ही सारी रैंकाची किंवा रैकानी कथा छां. उ. (४. १ १.) या ठिकाणीं आहे. त्या कथेचें चिंतन केल्यावर सूत्रार्थाची आणि तिची कशी जुळणी बसते हें वाचकाच्या लक्षात येईल

३५. कारण (जानश्रुति) क्षत्रिय असें कळतें, कारण (गोष्टीमध्यें) पुढें चैत्र-रथा-वरून असें सिद्ध होतें.

35 Because it is seen that (Jânashruti was) a Ksatriya, because of there being in the latter place an inference from Chaitra-ratha

३५ जानश्रुतीची जशी गोष्ट उपनिषदात आली आहे, तशीच आम्ही वरील सूत्रीं सांगितली आहे. त्या गोष्टीवरूनच जानश्रुति क्षत्रिय होता आणि शूद्र नव्हता, असें सिद्ध होतें कारण जानश्रुतीचें आणि चैत्ररथाचें मिळून वर्णन झालें आहे. म्हणजे ज्या संबधानें जानश्रुतीचें वर्णन झाल आहे त्याच संबधानें चैत्ररथाचें वर्णन झालें आहे या वर्णनास शंकराचार्यांनीं एक न्याय लावला आहे तो असा दोन पुरुषाच आजे जर एक कालीं असल-एक यज्ञ करणारा आणि एक यज्ञ करविणारा-तर त्या दोन पुरुषाचे नातूहि एक कालीं असतात. आणि त्यामध्यें एक यज्ञ करणारा आणि एक यज्ञ करविणारा असाच संबध असतो चैत्ररथ क्षत्रिय होता, कारण वर्णन असें आहे कीं चैत्ररथि नावाचा एक क्षत्रिय उत्पन्न झाला चैत्ररथि क्षत्रिय म्हणून जानश्रुतिहि क्षत्रिय यावर रामानुज असें म्हणतात कीं, या सूत्राचे दोन भाग करावेत आणि उपक्रम आणि उपसहार याकडे लक्ष दिलें असता जानश्रुति क्षत्रिय होता असें सिद्ध होतें, कारण "तो आपल्या सारथ्याला बोलला, त्याच्या पाशीं पुष्कळ द्रव्य होतें, पुष्कळ गाया होत्या," अशा

35 We have already narrated the story of Jânashruti as it is given in the Upanisad It shows that Jânashruti was a Ksatriya and not a Shûdra, because Jânashruti and Chaitra ratha are mentioned together, and thus in the same relationship Shankarâchârya tests their description by a maxim It is thus—if the grand-fathers of two persons be contemporary, one a sacrificer and the other assisting at a sacrifice their grand-children also are contemporary, one a sacrificer and the other assisting at a sacrifice Thus the relationship between the two is not changed Chaitra ratha was a Ksatriya, because Chaitra rathi a grandson of Chaitra-ratha is mentioned as Ksatriya, because Chaitra-rathi is a Ksatriya, Janashruti is a Ksatriya. Râmânuja observes —the sûtra consists of two parts, the commencement and the end of the book being considered, Janashruti was a Ksatriya, because he is said to have a coachman, whom he addressed and because he is described to have possessed immense wealth and many cows Vallabhâcharya observes—the story of Jânashruti shows that Rainka was a Brahmana, and that Jânashruti was a Ksatriya The conclusion is—a Shûdra by caste has no title to the knowledge of Sanvarga-vidya already described

सूत्राणि.

संस्कारपरामर्शात् तदभावाऽभिलापाच्च ॥ ३६ ॥

भावार्थ. । विद्यासंबंधेनोपनयनादिसंस्कारा विहिताः । शूद्रसंबंधेन तेषां निषेध । तस्माच्छूद्रस्य न ब्रह्मविद्यायामधिकारः ॥ तत्र न शूद्रस्याऽधिकारो यद् विद्याप्रदेशेषूपनयनादय. संस्काराः परामृश्यते । + + + शूद्रस्य च संस्काराऽभावोऽभिलप्यते इति शंकर.॥मध्वबल्लभरामानुजैर्विशेषतः सूत्रं न निरूपितं ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

• (त होपनिन्ये) अधीहि भगव इति होपससाद । छा० उ० (७.१,१.) ॥ सुकेशा च भारद्वाजः शैब्यश्च सत्यकाम· सौर्यायणी च गार्ग्य. कौशल्यश्चाश्वलायनो भार्गवो वैदर्भि. कबंधी कात्यायनस्ते हैते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठा परं ब्रह्माऽन्वेषमाणा एष ह वै तत् सर्वं वक्ष्यतीति ते ह समित्पाणयो भगवंतं पिप्पलादमुपसन्ना· । प्र० उ० (१.१.) ॥ शूद्रश्चतुर्थो वर्ण एकजाति ॥ स्मृ० ॥ न शूद्रे पातकं किंचिन् न च संस्कारमर्हति ॥

तदभावनिर्धारणे च प्रवृत्तेः ॥ ३७ ॥

भावार्थ । यद्यपि जाबालः स्वगोत्राऽनभिज्ञः तथापि तस्मै ब्रह्मविद्यामुपदिदेश । एतस्माद् गौतमाचरणाद् ब्रह्मविद्यायां शूद्रस्याऽनधिकारो निश्चीयते ॥ तत्र यत् सत्यवचनेन शूद्रत्वाऽभावे निर्धारिते जाबालं गौतम उपनेतुमनुशासितुं च प्रवृत्त इति शंकरः ॥ इतरेषां मतं तु समान ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

नैतदब्राह्मणो विवक्तुमर्हति समिधं सोम्याहरोप त्वा नेष्ये न सत्याद्गाः । छा० उ० (४.४,५.) ॥

३६. कारण (ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांच्या संबंधानें) संस्कार सांगितले आहेत; आणि (शूद्राला) संस्कार नाहींत; असें सांगितलें आहे.

३७. शूद्र नव्हे असा निश्चय प्रवृत्तिवरून होतो.

36. Because observances are prescribed in the case of a Brâhmana, Ksatriya and Vaishya, and not in the case of a Shûdra.

37. (That he was) not a Shûdra, is determined by the conduct (of Goutama)

प्रकारचें वर्णन त्याचें आहे; म्हणून तो क्षत्रिय होता असें सिद्ध होतें यावर वल्लभाचार्य असें म्हणतात कीं जानश्रुतीच्या गोष्टीवरून रैक ब्राह्मण होता आणि जानश्रुति क्षत्रिय होता असें सिद्ध होतें म्हणून जातिशूद्राला स्वर्ग–विद्येचा अधिकार नाहीं. यावर मध्वाचार्यांनीं ब्रह्मवैवर्त पुराणातील एक वाक्य घेतलें आहे तें असें. "ज्याला वेदाचा अधिकार त्याला रथाचा अधिकार ज्याला वेदाचा अधिकार नाहीं त्याला रथाचा अधिकार नाहीं" या संबंधीं उपनिषद्वाक्याचें पुढील भाषांतर. "पुढें, रे, कपि-गोत्रातील शौनक आणि कक्षसेनाचा मुलगा अभिप्रतारी याचीं पानें मांडलीं आहेत, तों एक ब्रह्मचारी भिक्षेस आला." "कपि-गोत्रातील जे कापेय त्या ब्राह्मणानीं चैत्ररथाकडून हा यज्ञ करविला." "म्हणून चैत्ररथ नावाचा एक क्षत्रपति उत्पन्न झाला."

३६ ज्याला वेदादि विद्या संपादन करण्याची आहे त्याजवर उपनयनादि

Madhvâchârya quotes a text from the Brahma-vaivarta purâna. It is this "He, who has a title to the Veda, has a title to a car. He, who has no title to the Veda, has no title to a car." The following is the translation of the Upanisad texts quoted "Well then, Shounaka belonging to the Gotra *Kapi* and Abhipratâri, son of Kaksasena, were about to sit to dinner, when a celibate came and asked for alms." "The Brâhmanas belonging to the clan (Gotra) Kapi, caused Chaitraratha to perform a sacrifice" "*Therefore Chaitra-ratha, lord of* a Ksatra, (Ksatra-pati or satrap) was born"

36 He, who has to acquire the knowledge of the Veda, must be invested with the sacred thread, and it is distinctly prescribed that such operations, as the investiture of the sacred thread, must not be *performed* upon a Shûdra A Shûdra, therefore, has no title to the knowledge of Brahma This is the sense of the sûtra Upon this Shankarâchârya observes .—

संस्कार केले पाहिजेत आणि असे उपनयनादि संस्कार शूद्रावर करू नयेत असा निषेध आहे, म्हणून शूद्रास ब्रह्मविद्येचा अधिकार नाहीं इतका सूत्रार्थ यावर शंकराचार्य म्हणतात — ज्या विद्येला उपनयनादि संस्कार लागतात, त्या विद्येचा शूद्राला अधिकार नाहीं आणि शूद्रावर संस्कार करू नयेत असा निषेध आहे रामानुज, वल्लभ, आणि मध्व, या सूत्रावर विशेष लिहीत नाहींत या संबंधी उपनिषद्वाक्याचें पुढील भाषांतर "त्याचें उपनयन केलें, आणि हे भगवान्, आम्हास शिकीव म्हणून तो जवळ जाऊन बसला " "सुकेश नावाचा आणि भारद्वाज-गोत्राचा, सत्यकाम नावाचा आणि शिबि-गोत्राचा, सौर्यायणी नावाचा आणि गर्ग-गोत्राचा, कौशल्य नावाचा आणि आश्वल गोत्राचा, भृगुचा मुलगा आणि विदर्भ देशांत राहणारा, कबंधीनावाचा आणि कताच्या गोत्राचा, असो ऋषिमंडळी ब्रह्मपर, ब्रह्मनिष्ठ, परब्रह्माचा शोध लावणारी, अरे, हा सर्व आम्हास सांगेल असी म्हणाली आणि हातांत समिधा घेऊन भगवान् " पिप्पलाद याकडे गेली " "शूद्र हा चवथा वर्ण आहे आणि ही एक जाति आहे (हिला उपनयन नाहीं)" ' शूद्राला पाप म्हणून नाहीं आणि शूद्राला संस्काराचा अधिकार नाहीं "

३७ या सूत्राच्या संबंधानें जाबालाच्या गोष्टीचें अनुसंधान केलें आहे ती गोष्ट अशी "सत्यकाम नावाचा जाबाल असा कोणीएक पुरुष होता त्याची आई

Shûdras are not entitled to that knowledge which requires the previous investiture of the sacred thread, and it is distinctly stated that such operations should not be performed upon a Shûdra. Râmanuja, Vallabha, and Madhva do not offer special comments on this sûtra. The following is the translation of the Upanisad texts quoted "He was invested with the sacred thread and he sat down near (a preceptor) saying oh lord, teach me." Sukesha of the clan of Bhâradvâja, Satyakama of the clan of Shibi, Souryayani of the clan of Garga Koushalya of the clan of Âshvala, a son of Bhrigu residing in the country of Vidarbha, Kabandhi of the clan of Kata— these Risis saying—well, this (teacher) will explain all to us—approached lord Pippalada with sacred fuel (Samidha) in their hands, inquiring about Brahma, devoted to Brahma intent upon Brahma" "The Shûdra is the fourth colour and is a caste by itself (not entitled to the investiture of the sacred thread) A Shudra knows no sin a Shûdra is not entitled to religious observances

37 The story of Jâbâla is referred to in this sûtra. There was a man of the name of Satyakâma because his mother was called Jabâlâ, he was called Jabâla. Jâbala approached his mother and said—mother, entering into the state of Brahmacharya, I will stay with a preceptor, then tell me what my clan is She replied—I do not know your clan. You were born, when I was young and had to serve many persons, and to perform much busi

जबाला ह्मणून त्याला जाबल म्हणत जाबाल आपल्या आईकडे जाऊन तिला म्हणाला—आई, मी ब्रह्मचर्य धारण करून आचार्याच्या घरीं वास करणार. ह्मणून माझें गोत्र काय तें मला सांग ती म्हणाली—अरे, तुझें गोत्र काय, हें मला ठाऊक नाहीं तरुण मी असताना पुष्कळांची सेवा करणारी आणि पुष्कळ खटपट करणारी, त्या वेळेस तूं झालास म्हणून तुझें गोत्र काय, हें मला ठाऊक नाहीं माझें नाव जबाला आणि तुझें नाव सत्यकाम सत्यकाम जाबाल मी असें तेथें म्हण हरिद्रुमानाचा मुलगा गौतम याजकडे तो गेला आणि म्हणाला आपल्यापाशीं राहून मी ब्रह्मचर्य करीन आपल्यापाशीं मला राहू द्या तो गौतम त्या जाबालाला ह्मणाला, अरे बाबा, तुझें गोत्र काय? तो जाबाल म्हणाला अहो माझें गोत्र काय हें मला ठाऊक नाहीं हें मी आईला विचारतें तिनें मला असें उत्तर दिलें कीं तरुण मी असताना पुष्कळांची सेवा करणारी आणि पुष्कळ खटपट करणारी त्या वेळेस तूं झालास म्हणून तुझें गोत्र काय हें मला ठाऊक नाहीं माझें नाव जबाला आणि तुझें नाव सत्यकाम म्हणून अहो सत्यकाम मी जबालेचा पुत्र आहें म्हणून गौतम त्याला म्हणाला जो अब्राह्मण तो असें बोलत नाहीं अरे बाबा तू सत्यापासून ढळला नाहीस म्हणून तू समिधा आण, मी तुझें उपनयन करीन असें म्हणून त्याचें उपनयन करून आणि त्याच्या स्वाधीन रो-

ness I, therefore, do not know what your clan is My name is Jabâla and your name is Satya kama Go and say then that you are Satyakâma son of Jabâlâ He then went to Goutama son of Haridruman and said—I will stay with you and practise Brahmacharya (I will study) Let me stay with you Goutama said to Jâbâla—boy, what is your clan? Jabala replied—I do not know what my Gotra is I asked my mother about it, and she thus replied— when young I had much to do and to serve many persons you were born then I do not know what your clan is I am named Jabâlâ, and you are named Satyakâma I am therefore Satyakâma son of Jabalâ. Then Goutama said to him—he, who is not a Brâhmana does not talk in this way you have not fallen from truth therefore, bring sacrificial fuel (Samidha), and I will invest you with the sacred thread. This said he was invested with the sacred thread Being put in charge of four hundred lean cows he was told to tend them When the cows were about to go out he was told not to return home to the hermitage till the cows had multiplied and become a thousand For some years Jâbala stayed in the forest and the cows had become a thousand. Then his preceptor explained to him the Brahma-vidya. This is the story on which the sûtra is based Though Jabâla did not know his clan, yet Goutama explained to him the Brahma-vidyâ This conduct of Goutama proves that the Shûdras have no title to the knowledge of Brahma vidyâ Shankara

सूत्राणि.

श्रवणाऽध्ययनाऽर्थप्रतिषेधात् स्मृतेश्च ॥ ३८ ॥

भावार्थः । वेदस्य श्रवणमध्ययनमर्थविचारश्च शूद्रैर्न करणीयः । कुतः । स्मृतौ प्रतिषेधादिति सूत्रार्थः ॥ तत्र शंकरः पूर्वकृतसंस्कारवशाद् विदुरधर्मव्याधप्रभृतीनां ज्ञानोत्पत्तिस्तेषां न शक्यते फलप्राप्तिः प्रतिबद्धुं । ज्ञानस्यैकांतिकफलत्वात् । श्रावयेच्चतुरो वर्णानिति चेतिहासपुराणाऽधिगमे चातुर्वर्ण्याऽधिकारस्मरणात् । वेदपूर्वकस्तु नास्त्यधिकारः शूद्राणामिति स्थितमिति शंकरः ॥ भवभयभीतानां सांख्यादय एव प्रत्यक्षानुमानाभ्यां वस्तुनिरूपणं कुर्वतः प्रत्यक्षाऽनुमानवृत्तंबुभुत्सां जनयंति। बुभुत्सायां जातायां प्रत्यक्षाऽनुमानाभ्यामेव विविक्तस्वभावाभ्यां नित्यशुद्धस्वप्रकाशाऽद्वितीयकूटस्थचैतन्यमेव सदन्यत् सर्वं तस्मिन्नध्यस्तमिति सुविवेचनं । + + + यथोक्तया नीत्या शूद्रादेरनधिकार उपपद्यते इति रामानुजः ॥ स्मार्तपौराणिकज्ञानादौ तु कारणवशेन शूद्रयोनिगतानां महतामधिकारः । तत्रापि न कर्मं जातिशूद्राणां । तस्मान् नास्ति वैदिके क्वचिदपि शूद्राधिकार इति स्थितमिति वल्लभः ॥ विदुरादीनां तूत्पन्नज्ञानत्वान् न कश्चिद् विशेष इति मध्व ॥

अनुसंधेयान्युपनिषद्वाक्यानि ॥

अथाऽस्य वेदमुपशृण्वतस्त्रपुजतुभ्यां श्रोत्रप्रतिपूरणं ॥ पद्यु ह वा एतत् श्मशानं यच्छूद्रस्तस्माच्छूद्रसमीपे नाऽध्येतव्यं ॥ भवति चोच्चारणे जिव्हाच्छेदो धारणे शरीरभेदः ॥ न शूद्राय मतिं दद्यात् ॥ द्विजातीनामध्ययनमिज्या दानमिति ॥ श्रावयेच्चतुरो वर्णान् ॥

३८. कारण स्मृतीमध्यें (वेदाचें) श्रवण, अध्ययन, अर्थ (करण्याचा शूद्राना) निषेध आहे.

38. In the Smritis the right of hearing and studying the Vedas is denied to the Shûdras.

इक्या चारशें गायी केल्या आणि त्याला म्हणाला ह्या गायी वळ. बाहेर गायी जेव्हां पडूं लागल्या, तेव्हा तो त्याला म्हणाला-हजार झाल्या वाचून तू परत येऊ नकोस. काही वर्षेपर्यंत जाबालानें प्रवास केला आणि त्या गायी हजार झाल्या. पुढें गुरुने त्याला ब्रह्मविद्या शिकविली." ह्या गोष्टीचे अनुसंधान करून वरील सूत्र रचलें आहे. जरी जाबालाला आपले गोत्र ठाऊक नव्हते, तरी गुरूनें त्याला ब्रह्मविद्या शिकविली. इत्यादि जें गौतमाचें आचरण त्यावरून असें सिद्ध होतें की शूद्राना ब्रह्मविद्येचा अधिकार नाही. यावर शंकराचार्य असे म्हणतात की जाबाल सत्य बोलला म्हणून तो शूद्र नव्हे. म्हणून गौतमानें जाबालाचें उपनयन केले, आणि त्यास शिकविण्यास प्रवृत्त झाला. दुसऱ्या भाष्यकाराची मतें अशीच आहेत. वरील कथेपैकीं मुख्य मुद्याचे वाक्य पुढील आहे; आणि त्यावर भाष्यकाराचा कटाक्ष आहे. ते वाक्य असे. "म्हणून गौतम त्याला म्हणाला कीं जो अब्राह्मण तो असें बोलत नाहीं. अरे बाबा, तूं सत्यापासून सुटला नाहींस, म्हणून तू समिधा आण, मी तुझें उपनयन करीन."

३८. स्मृति म्हणून जे प्रसिद्ध ग्रंथ आहेत त्यांमध्यें शूद्रानी वेदाचें अध्ययन

chârya observes —Jâbâla spoke the truth, and, therefore, he was not a Shûdra, and, therefore, Goutama invested him with the sacred thread, and made up his mind to instruct him. All the commentators offer similar remarks on this sûtra. The Upanisad text, on which all commentators *lay stress, is the following*. "Therefore, Goutama said to him—he, who is not a Brâhmana, does not thus speak. Boy, thou hast not fallen from truth; then bring me sacrificial fuel and I will invest you with the sacred thread"

38. The works called Smritis are well known. They declare that the Shûdra should not study the Vedas, should not hear them, and should not think of what they teach, because he has no title to their knowledge. This is the sense of the sûtra On *this Shankarâchârya observes* — great men like Vidura and Dharma-vyâdha acquired knowledge, and knowledge produced its own fruit, because the fruit of knowledge invariably follows it. It is not proper to state that men like Vidura and Dharmavyâdha acquired knowledge and thus attained to Brahma But the knowledge that they obtained was itself a fruit of what they had done and the influences brought to bear upon them in their former lives But the Itihâsa

करूं नये, श्रवण करूं नये, अर्थविचार करूं नये, असा निषेध आहे. म्हणून शूद्रांना वेदाचा अधिकार नाहीं इतका सूत्रार्थ. यावर शंकराचार्य असें म्हणतात कीं विदुर, धर्मव्याध, या मंडळीला ज्ञान प्राप्त झालें. आणि ज्ञानापासून जें फल निष्पन्न होतें तें झालेंच पाहिजे. जेथें जेथें ज्ञान तेथें तेथें त्याचें फल अशी व्याप्ति आहे. विदुर, धर्मव्याध, या मंडळीला या जन्मीं ज्ञान प्राप्त झालें आणि त्याचें फलहि झालें, असें म्हणणें सयुक्तिक नाहीं. विदुर, धर्मव्याध, यांच्या पूर्वजन्मांतरीं जे संस्कार झाले होते, त्यामुळें त्यास ज्ञान प्राप्त झालें, असें कारण आहे. बरें, इतिहासपुराणांमध्यें चारहि वर्णांस शिकवावें असें निरूपण आहे म्हणून चारहि वर्णांस अधिकार आहे हा अधिकार इतिहासपुराण-श्रवण करण्याचा, आणि वेदाध्ययनाचा नव्हे. यावर रामानुज असें म्हणतात कीं ज्यांना संसाराचें भय वाटलें आहे त्यांच्याकरितां सांख्य, योगादि शास्त्रांनीं उपाय रचून ठेविला आहे. तो उपाय असा प्रत्यक्ष आणि अनुमान हीं प्रमाणें घेऊन सद्वस्तूचें ज्ञान होतें तें कसें? प्रत्यक्ष आणि अनुमानें यांच्या योगानें ज्ञानाचा बोध व्हावा अशी इच्छा उत्पन्न होते. ती इच्छा उत्पन्न झाली कीं मनुष्य शोध जिज्ञासु होऊं लागतो. प्रत्यक्ष प्रमाणाची तऱ्हा निराळी, आणि अनुमानाची तऱ्हा निराळी. यांच्या योगानें असें दिसून येतें कीं चैतन्य म्हणून कांहीं आहे. तें नित्य आहे. तें शुद्ध आहे. तें स्वयंप्रकाश

and the Purâna declare that all the four castes ought to be instructed. But this permission includes not the study of the Vedas, but a title merely to hear the Itihâsa or the Purâna read or explained. On this Râmânuja observes —those, who have become world weary, have a remedy provided for them by the Sânkhya and Yoga systems of philosophy. The remedy is this—direct observation and inference produce the knowledge of that which really exists. How is this? Direct observation and inference produce a desire for knowledge. When such a desire is produced, the enquirer comes to know that there is such a substance as Chaitanya or Spirit, because he finds that the method of direct observation, though it differs from inference, leads to the same result. The Spirit is eternal, pure, and self-resplendent, unequalled and unaffected. It is the substratum of all that exists. All, without this Spirit, does not really exist, but seems to exist, because of its connection with the Spirit. All this explanation is in its place, and to such knowledge the Shûdra has a title. But he has no title to that knowledge which follows the investiture of the sacred thread and the study of the Vedas. On this Vallabha observes —great men among the Shûdras successfully acquired a special knowledge of the Smritis and of the Puranas, yet the Shûdra by caste has no title to the performance of sacrificial rites. He has, therefore, no title to the acquisition of the knowledge, which follows the study of the

आहे तें अद्वितीय आहे आणि तें निर्विकार असून सर्वांचें अधिष्ठान आहे त्याच्या शिवाय बाकी जे जे राहिलें ते तें त्याच्या योगानें भासत अशा प्रकारचें जें विवेचन आहे, ते ठीक असा एक प्रकार आहे अशा प्रकारची उपासना शूद्रानी करावी परंतु वेदपूर्वक उपनयन करून, ज्ञानप्राप्तीचा अधिकार शूद्रास नाही यावर वल्लभ असें म्हणतात कीं, स्मृति, पुराण यांचें ज्ञान महान् महान् जे शूद्रजातीतील पुरुष होऊन गले त्यास विशेष कारणामुळे झालें हें खरें तथापि जातिशूद्राना कर्माचा अधिकार नाही म्हणून वेदपूर्वक अध्ययन करण्याचा त्यास अधिकार नाही. यावर मध्वाचार्य म्हणतात – विदुर आणि दुसरी जी मंडळी झाली त्याच्यामध्यें सहज ज्ञान उत्पन्न होऊन गेलें होतं म्हणून या गोष्टीमध्ये काहीं विशेष नाही या सबंधी उपनिषद्वाक्याचें भाषांतर एणेंप्रमाणें "पुढे हा जर शूद्र वेद ऐकू लागला तर त्याच्या कानामध्यें शिसे किंवा लाख ओतावी" "अरे, शूद्र हा चालतें स्मशान आहे. म्हणून त्याच्या जवळ वेदाध्ययन करू नये" 'शूद्राने वेदाचारण केलें असता जिव्हा कापावी अध्ययन केल असता शरीर तोडावें' 'शूद्रास ज्ञान देऊ नये' "ज्याचें उपनयन होत त्यानाच अध्ययनाचा, यज्ञकरण्याचा, दानाचा अधिकार आहे" 'चारी वर्णांकडून ऐकावं'

Vedas On this Madhvâcharya observes —men like Vidura and others naturally obtained the knowledge of Brahma, and therefore, there is nothing particular about this *The following is the* translation of the Upanisad texts quoted 'The ears of the Shûdra, hearing the Veda explained, are then to be filled with lead and lac "Well the Shûdra is a moving burning ground and therefore, the Veda is not to be studied when he is near 'The tongue of the Shûdra is to be cut if he pronounces the Veda If he studies it his body is to be cut Never teach a Shûdra

He, who is invested with the sacred thread has alone a title to *the study of the Veda* to the performance of sacrifices and to receiving gifts Let the four castes hear it

सूत्राणि.

कंपनात् ॥ ३९ ॥

भावार्थः । प्रसंगाद् देवादीनामधिकारविचारे कृते वाक्यसमन्वयमाचार्यः पुनः करोति । अनुसधास्यमानोपनिषद्वाक्ये एजतिधातुः प्रयुक्तः । तस्य कोऽर्थः । एजति नाम कंपते । सर्वं जगत् कंपते । कदा । सति प्राणे । तेन प्राणस्य कंपनकारित्वात् प्राणो न तु वायुर्न वाऽशनि. । प्राणस्तु परमेश्वरः। अन्येषामुपनिषद्वाक्यानामेकवाक्यतया तदुपनिषद्वाक्यस्योपक्रमोपसंहाराभ्यां च वायुः परमेश्वर इति सिध्यति ॥ तत्र शंकरः। पूर्वोत्तरयोर्हि ग्रंथभागयोर्ब्रह्मैव निर्दिश्यमानमुपलभामहे । इहैव कथमकस्मादंतराले वायुं निर्दिश्यमानं प्रतिपद्येमहीति ॥ रामाऽनुजस्तु कृत्स्नस्य जगतोऽग्निसूर्यादीनां चाऽस्मिन्नगुष्ठमात्रे पुरुषे प्राणशब्दनिर्दिष्टे स्थितानां सर्वेषां ततो निःसृतानां तस्मात् सजातमहद्भयनिमित्तमेजनं कंपनं श्रूयते । + + + परस्य ब्रह्मणः पुरुषोत्तमस्यैवविधैश्वर्यावगतेरितश्चांगुष्ठप्रमित. पुरुषोत्तम इति ॥ वल्लभः अविशेषेण सर्वेजगत्कंपनं भगवद्धेतुकमेव भवतीति ॥ मध्वः एजतीति कंपवचनाद्बलवज्जो भगवानिति ॥

अनुसधेया-न्युपनिषद्वाक्यानि ॥

न प्राणेन नाऽपानेन मर्त्यो जीवति कश्चन । इतरेण तु जीवति यस्मिन्नेतावुपाश्रितौ । क० व० (५.५.) ॥ तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवाऽमृतमुच्यते । तस्मिन् लोकाः श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन । + यदिदं किंच जगत् सर्वं प्राण एजति निःसृतं । महद्भयं वज्रमुद्यतं य एतद् विदुरमृतास्ते भवंति । भयादस्याऽग्निस्तपति भयात् तपति सूर्यः । भयादिंद्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पंचमः । क० व० (६.३.) ॥ भीषाऽस्माद् वातः पवते । भीषोदेति सूर्यः । भीषाऽस्मादग्निश्चेंद्रश्च । मृत्युर्धावति पंचम

इति । ब्र० वि० (८)॥ अन्यत्र धर्मादन्यत्राऽधर्मादन्यत्राऽस्मात् कृताऽकृतात्। अन्यत्र भूताच्च भव्याच्च यत् तत् पश्यसि तद् वद। क० व० (२.१४.)॥ तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पंथा विद्यतेऽयनाय। श्वे० उ० (३.८.)॥ तस्माद् वायुरेव व्यष्टिर्वायुः समष्टिरप पुनर्मृत्यु जयति य एव वेद। बृ० आ० उ० (३.३,२.)॥

३९. कारण कंपन आहे.

३९ उपनिषद्वाक्यामध्य कंपनार्थधातूचा प्रयोग केला आहे प्राण असला म्हणजे सर्व जगताचें कंपन होतें असाहि संबंध त्याच वाक्यामध्यें आढळतो म्हणून प्राणशब्दाचा अर्थ वायु किंवा वज्र असा करू नये प्राण म्हणजे परमेश्वरच सा या उपनिषद्वाक्याची एकवाक्यता केली आणि उपक्रम उपसंहाराकडे लक्ष दिलें म्हणजे वायु शब्दाचा अर्थ परमेश्वर असा होतो यावर शंकराचार्य असें म्हणतात की उपनिषदादि ग्रंथाचा पूर्व किंवा अपर भाग पाहिला असता जिकडे तिकडे ब्रह्मनिर्देश आहे असें आढळतें म्हणून एखाद्या वाक्यात मध्येच वायूचें निरूपण आहे असें म्हणणं असमंजस आहे. रामानुज यावर असे म्हणतात — सर्व जगत् आणि अग्निसूर्यादि देवता अंगुष्ठ-मात्र पुरुषाच्याठायी वास करीत आहेत. या अंगुष्ठमात्र पुरुषाचा प्राणशब्दानें निर्देश केला आहे तसेच सर्व जगत्, आणि देवादि त्या पुरुषापासूनच निघाले आहेत, आणि निघताना त्यास मोठें भय वाटलें, म्हणून वेदादिकामध्यें कंपनाचें निरूपण केलें

39. Because of (the root *eja* which means) to shake

